जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

गोध्रा जळीतकांड प्रकरणातील दोषींची शिक्षा स्थगित



सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली / वृत्तसंस्था- २००२ साली गुजरातमधील गोध्रा मध्ये झालेले ट्रेन जाळण्यात आल्याच्या काळ्या आठवणी अजूनही देशातील जनतेच्या मनात ताज्या आहेत. याच प्रकरणात सोमवारी (२३ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान एक मोठा निर्णय दिला आहे. गोधरा जाळण्याच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका दोषीची शिक्षाच रद्द करण्यात आली आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. ही याचिका प्रामुख्याने आरोग्याच्या कारणास्तव दाखल करण्यात आली होती. दोषीची प्रकृती लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने त्याची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत.

बार अँड बेंचने दिलेल्या माहितीनुसार, खंडपीठाने आपल्या आदेशात नमूद केले की, याचिकाकर्त्याची विनंती प्रामुख्याने वैद्यकीय कारणांवर आधारित होती. राज्य सरकारच्या वकिलांनी मान्य केले की, दोषीच्या वकिलांनी मांडलेल्या आरोग्याच्या समस्या वस्तुस्थितीला धरून आहेत. या परिस्थितीचा विचार करता, न्यायालयाने वैद्यकीय कारणास्तव दोषीची शिक्षा स्थगित करण्याचा निर्णय दिला. सुनावणीदरम्यान, राज्य सरकारच्या वकिलांनी या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित केले. त्यांनी स्पष्ट केले की, त्या प्रकरणाच्या गुणवत्तेवर कोणतेही भाष्य करत नाहीत; मात्र, वैद्यकीय कारणास्तव शिक्षा स्थगित करण्यास सरकारचा कोणताही आक्षेप नाही, असे त्यांनी पुन्हा एकदा नमूद केले. गोध्रा जळीतकांड प्रकरणात संबंधित आरोपी इरफान सिराज पाडा हा गेल्या १८ वर्षांपासून जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. २००२मध्ये साबरमती एक्स्प्रेसला आग लावण्यात आली होती. यामध्ये एकूण ५९ कारसेवकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात जातीय दंगली भडकल्या होत्या. या प्रकरणात मार्च २०११ मध्ये ट्रायल कोर्टाने ३१ जणांना दोषी ठरवले होते. यापैकी ११ जणांना फाशीची, तर उर्वरित २० जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. इतर, ६३ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. २०१७ मध्ये गुजरात उच्च न्यायालयाने ११ दोषींची फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली होती. उर्वरित २० दोषींची जन्मठेपेची शिक्षा कायम ➪(पान २ वर)

पुसदच्या चाणक्य ट्रॅव्हल्सचा समृद्धीवर भीषण अपघात

दोघांचा मृत्यू; ३० प्रवासी जखमी





यवतमाळ/प्रतिनिधीः- पुसदहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या चाणक्य ट्रॅव्हल्सचा समृद्धी महामार्गावर छत्रपती संभाजीनगरजवळील हर्मूल-सावंगी परिसरात भीषण अपघात झाला. रविवार, २२ नोव्हेंबरच्या मध्यरात्री पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला. या दुर्घटनेत ३० प्रवासी जखमी झाले असून दोघांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये रघुनंदन दत्ता सांगळे (वय वर्ष ३५, रा. भगतसिंग नगर, मुंबई) आणि उत्तम दामू जाधव वय (वर्ष ३५, रा. पुसद,यवतमाळ) यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पुसदहून मुंबईकडे जाणारी चाणक्य ट्रॅव्हल्सची बस (क्रमांक एमएच ४१ (९९५५) समृद्धी महामार्गावरील चॅनेल ➪(पान २ वर)

पुसद, यवतमाळ, वाशिम येथील एकूण ३० प्रवाशांचा समावेश

बाटलीबंद पाण्याची होणार चाचणी; सरकारॲक्शन मोडमध्ये

नवी दिल्ली /वृत्तसंस्था- भारतातील सर्वात जास्त लोकप्रिय पाणी ब्रँड असलेली 'बिस्लेरी' कंपनी सध्या चर्चेत आली आहे. 'बिस्लेरी'च्या पाण्याचा नमुना पहिल्या चाचणीत अयशस्वी ठरला आणि पाण्यात रसायने आढळली. आता कंपनीला मोठा दिलासा मिळाला आहे. पाण्याचा नमुना दुस-या चाचणीत यशस्वी ठरला असून त्यात कोणतीही रसायने आढळून आली नाहीत. पाणी पूर्णपणे सुरक्षित आहे. हे बाटलीबंद पाणी अन्न सुरक्षा मानकांचे पालन करते.' बिस्लेरी इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड'साठी दिलासादायक बातमी आहे. कारण त्यांच्या पाण्याचे नमुने जे पूर्वी असुरक्षित असल्याचे घोषित करण्यात आले होते ते आता एका नवीन चाचमीत अन्न सुरक्षा मानकांनुसार असल्याचे आढळून आले. पण या ➪(पान २ वर)



लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण -मंत्र्यांच्या कबुलीने खळबळ

नांदेड / प्रतिनिधी- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर मोठा ताण आला आहे, मात्र या योजनेपासून आता सरकारला मागे हटता येणार नाही, अशी थेट कबुली अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली आहे. नांदेड जिल्ह्यातील लोहा येथे आयोजित एका जाहीर कार्यक्रमात ते बोलत होते. निवडणुकीपूर्वी कोणीही सांगितले नसताना ही योजना सुरू केली आणि आता अनेक 'लाडक्या बहिणी' झाल्याने त्यांच्यापासून दूर जाता येणार नाही, असे त्यांनी सांगितले. लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक भारासोबतच आता राज्यात दुष्काळाची स्थिती निर्माण झाल्याने तिजोरीवरील ताण आणखी वाढला आहे. पाण्याचे संकट गडद झाल्यास विमानाने किंवा रेल्वेने पाणी पोहोचवण्यासारख्या उपाययोजनांसाठी मोठा निधी खर्च करावा लागेल, असेही ते म्हणाले. तरीही दुष्काळाचा सामना करण्यासाठी ➪(पान २ वर)



राज्यात ९ ठिकाणी नवीन 'अपर तहसीलदार' कार्यालये सुरू

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील महसूल प्रशासन अधिक गतिमान, सक्षम आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नागपूर आणि नाशिक विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये नवीन अपर तहसीलदार कार्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. त्यानुसार चिंचोली, खापरखेडा, घोट, सिन्नर, शिरपूर शहर, शहादा, जळगाव शहर, चाळीसगाव आणि पहूर या ठिकाणी नवीन कार्यालये सुरू करण्याचे नियोजन आहे. याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महसूल विभागाकडून शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे. या कार्यालयांच्या निर्मितीमुळे संबंधित भागातील नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी दूरच्या तहसील कार्यालयांमध्ये वारंवार जाण्याची गरज कमी होणार आहे. तसेच महसूल विषयक प्रकरणे, विविध दाखले, जमिनीशी संबंधित कामे आणि प्रशासकीय प्रक्रियांना अधिक वेग मिळण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना महसूलविषयक कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणी किंवा दूरवरच्या कार्यालयांमध्ये जाण्याची गरज कमी होणार आहे. ग्रामीण भागातील प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ करण्यासोबतच महसूल यंत्रणेवरील कामाचा ताण कमी करण्याचाही या निर्णयामागील उद्देश आहे. दरम्यान, महसूल विभागाच्या या निर्णयामुळे संबंधित जिल्ह्यांमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अजय-अतुल संगीतबद्ध करणार नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याचं मुख्य गीत; १ कोटींचा निधी मंजूर

मुंबई/प्रतिनिधी- कुंभमेळ्याचे मुख्य गीत आणि इतर गाणी घडवण्यासाठी राज्य शासन तसेच नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाने १ कोटी रुपये अधिक जीएसटी इतक्या रकमेला मान्यता दिली आहे. आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी पोषक वातावरण तयार करण्याची जबाबदारी सुप्रसिद्ध संगीतकार जोडी अजय-अतुल यांच्यावर सोपवण्यात आली आहे. कुंभमेळ्याचे मुख्य गीत आणि इतर गाणी घडवण्यासाठी राज्य शासन तसेच नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाने १ कोटी रुपये अधिक जीएसटी इतक्या रकमेला मान्यता दिली आहे.



निविदेविना थेट निवडीमुळे विविध तर्कवितर्क- कोणतीही निविदा न काढता थेट अजय-अतुल यांना हे काम देण्यात आल्याने प्रशासकीय व राजकीय वर्तुळात या निर्णयाची मोठी चर्चा रंगली आहे. पारंपरिक प्रक्रियेला फाटा देत थेट निवडीचा मार्ग का स्वीकारला गेला, याबाबत उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

गीतांची संकल्पना आणि मंजूर निधीचा तपशील- गोदावरी नदीचे महात्म्य आणि कुंभमेळ्याचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व उलगडणारे मुख्य गीत तसेच काही पूरक गाणी तयार करण्याचा प्रस्ताव अजय-अतुल यांनी शासनाकडे दिला होता. मंजूर करण्यात आलेल्या १ कोटी ➪(पान २ वर)

मुंबई, पुणे, कोकणात थंडीचा कहर!

मुंबई : एकीकडे एल-निनोचा प्रभाव अन् दुसरीकडे एकामागून एक धडकणारी चक्रीवादळे यांचा प्रभाव राज्यातील तापमानावर पडत आहे. यामुळे सातत्याने वातावरणात बदल होत असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच मुंबई, ➪(पान २ वर)



नांदेड-नागपूर महामार्गावर कारने घेतला पेट; तिघे बचावले

नांदेड : नांदेड-नागपूर महामार्गावरील हादगाव तालुक्यातील बरडशेवाळा येथे धावत्या कारने अचानक पेट घेतल्याची घटना घडली. कारने अचानक पेट घेतल्याने महामार्गावर काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, कारमधील तिघांनी प्रसंगावधान राखत वेळीच बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याने मोठी दुर्घटना टळली असून तिघेही सुखरूप बचावले.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नांदेड-नागपूर महामार्गावरून कार जात असताना बरडशेवाळा परिसरात अचानक कारमधून धूर येऊ लागला. काही क्षणांतच कारने पेट घेतला. ही बाब लक्षात येताच कारमधील तिघांनी तातडीने कारमधून बाहेर पडत आपला जीव वाचविला. त्यानंतर आगीने कारला वेढा घातल्याने वाहनाचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.या घटनेमुळे महामार्गावरून जाणा-या वाहनधारकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. कारला आग लागण्याचे नेमके कारण आणि वाहनाच्या नुकसानीचा तपशील समजू शकलेला नाही.



ध्रुव राठी यांच्या अडचणी वाढल्या!

न्यायालयाकडून अजामीनपात्र वॉरंट जारी

नवी दिल्ली / वृत्तसंस्था- प्रसिद्ध यूट्यूबर ध्रुव राठी यांच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. सोमवारी, २३ नोव्हेंबर २०२६ रोजी, दिल्लीतील साकेत जिल्हा न्यायालयाने २०१८ मधील फौजदारी मानहानीच्या एका प्रकरणात ध्रुव राठी यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी अनम रईस खान यांच्या न्यायालयाने, तक्रारदार विकास पांडे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश दिलाय. न्यायालयाने या प्रकरणातील➪(पान २ वर)



राहुल नार्वेकरांनी अदिवासींच्या जमिनी लाटल्या- खा.संजय राऊत

मुंबई/ प्रतिनिधी- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर आदिवासींच्या जमिनी लाटण्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांनी सोमवारी (२३ नोव्हेंबर) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहित काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. अलिबागच्या म्हात्रोळी गावातील गरीब आदिवासींच्या जमिनी लाटण्याचा आरोप यावेळी पत्रातून करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी तातडीची दखल घेत नार्वेकरांना तंबी द्यावी, अशी मागणी त्यांनी पत्रात केली आहे.

पत्रात खासदार संजय राऊत म्हणाले आहेत की, संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिक जीवनात वावरताना किमान मर्यादांचे पालन केले पाहिजे हे आपणही मान्य कराल. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या मनमानी वर्तनाविरोधात अलिबाग तालुक्यातील आदिवासी समाज गेल्या काही काळापासून आंदोलन करीत आहे व पोलिस यंत्रणा त्या आदिवासींवर जबरदस्ती करत त्यांना पळवून लावत आहेत. हे सर्व विधानसभा अध्यक्षांच्या दबावाखाली घडत असेल तर नार्वेकर यांना त्यांच्या पदावरून तत्काळ दूर करणे गरजेचे आहे. राहुल नार्वेकर आणि त्यांचे नगरसेवक भाऊ मकरंद यांनी गेल्या काही काळापासून अलिबाग तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदीचा सपाटा चालवला आहे. या 'सपाट्या'तून गरीब आदिवासींच्या जमिनीही सुटलेल्या नाहीत. असा गंभीर आरोप त्यांनी यावेळी केला आहे.➪(पान २ वर)





मत चोरण्याची परंपरा निवडणूक आयोगाच्या साथीने सुरू

नांदेड /प्रतिनिधी -जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा खासदार निवडून येतो आणि अवघ्या ४ महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार ४० ते ५० हजार मतांच्या फरकाने पराभूत होतात. या निकालांमागे मतचोरीची परंपरा असून, मोदी सरकारने निवडणूक आयोगाच्या साथीने ही परंपरा सुरू केल्याचा सणसणीत आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केला. लोकशाही व्यवस्था नष्ट करण्याचा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला.

येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले यांनी केंद्र सरकार, भाजप आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली. महाराष्ट्रासारख्या फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांच्या भूमीत लोकशाहीचा गळा घोटण्याचे पाप नरेंद्र मोदी आणि तत्कालीन निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केल्याचा आरोप त्यांनी केला.पटोले म्हणाले की, २०१९ ते २०२४ या ५ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात सुमारे ५० लाख मतांची वाढ झाली. म्हणजे प्रत्येक वर्षी सरासरी १० लाख मतांची वाढ झाली. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या ४ महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात तब्बल ४६ लाख मते वाढली.

५ वर्षांत ५० लाख आणि केवळ ४ महिन्यांत ४६ लाख मते वाढण्यामागचे नेमके कारण काय? मतदारसंख्येतील या प्रचंड तफावतीचा हिशेब निवडणूक आयोगाने जनतेला दिला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.सध्या सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेचा उल्लेख करताना पटोले यांनी महाराष्ट्रात २ कोटी १७ लाख मते कमी झाल्याचा दावा केला. ही मते नेमकी कोणाची कमी झाली? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. भंडारा जिल्ह्यातही दीड लाख मते कमी झाल्याचे सांगत, काँग्रेस, मुस्लिम आणि दलित मतदारांची नावे मात्र पूर्वीप्रमाणेच कायम असतील, तर कमी झालेली मते कोणाची आणि कुठून आली होती? याचा खुलासा निवडणूक आयोगाने करावा, असे ते म्हणाले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक असणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. निवडणूक झाल्यानंतर मतदानाचे फुटेज, मतमोजणीचा संपूर्ण हिशेब आणि संबंधित माहिती राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिली जात नाही, असा आक्षेपही त्यांनी घेतला. तर काँग्रेसने देशाच्या उभारणीत मोठे योगदान दिले आहे. निवडणुकीतील हार-जीत आमच्यासाठी महत्त्वाची नसून देशातील लोकशाही टिकली पाहिजे, यासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरून लढा देईल, असा इशाराही पटोले यांनी दिला.राज्यातील शेतक-यांच्या प्रश्नांवरही नाना पटोले यांनी सरकारला धारेवर धरले.



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांचा सणसणीत आरोप

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय

'ॲग्री वेल्फेअर पोर्टल ': शेतकऱ्यांसाठी डिजिटल व्यासपीठ

केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी नवे डिजिटल व्यासपीठ म्हणजेच 'ॲग्री वेल्फेअर' हे नवे संकेतस्थळ सुरु केले आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून आता शेतकऱ्यांना सर्व योजना, अनुदान आणि शेतीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या संकेतस्थळाबद्दलची ही माहिती...

प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान ही एक अनिवार्य अशी बाब आहे. शासनाचा कारभार अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक आहे. माहिती आणि तंत्रज्ञान हे जबाबदार आणि उत्तरदायित्व असलेले प्रशासन निर्माण करते. लोकाभिमुख प्रशासन, विकासात्मक प्रशासन आणि सुप्रशासन अस्तित्वात येण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानाशिवाय भविष्यात दुसरा चांगला पर्याय उपलब्ध होवू शकणार नाही. म्हणून शासन आणि त्यामधील विविध घटक यांनी सदैव माहिती आणि तंत्रज्ञान याच्या वापरात्या प्राधान्य आणि प्रोत्साहन दिले पाहिजे. तरच एक लोकाभिमुख, जबाबदार, उत्तरदायी, पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक असे सुप्रशासन अस्तित्वात येवू शकेल. ही बाब लक्षात घेऊन अनेक विभागांचे संकेतस्थळ आणि पोर्टल तयार करण्यात येत आहेत.

माहिती व तंत्रज्ञान विकसित करून, त्याचा शासकीय कामकाजात जास्तीत जास्त वापर करून शेतकरी, शेतमजूर, कामगार, दीन-दलित, मागासवर्गीय इत्यादी समाजघटकांना शासन-प्रशासनाकडून प्राधान्याने चांगल्या सेवा सुविधा देण्यावर भर दिला जात आहे. याच उदात्त हेतूने शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारचे नवे डिजिटल व्यासपीठ 'ॲग्री वेल्फेअर पोर्टल' (agriwelfare.gov.in) हे नवे संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून या संकेतस्थळाच्या माध्यमातून आता शेतकऱ्यांना सर्व योजना, अनुदान आणि शेतीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेला आणि शेतकरी कल्याणाच्या धोरणाला अनुसरून केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकासमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली 'ॲग्री वेल्फेअर' या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.अद्ययावत अशा या 'ॲग्री वेल्फेअर'चे लोकार्पण १९ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले. या संकेतस्थळाच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या विविध कृषी योजना, आर्थिक मदत, अनुदाने आणि शेतीविषयक विश्वसनीय माहिती थेट मोबाईलवर उपलब्ध होत आहे. त्यामुळे विविध योजनांची माहिती मिळविण्यासाठी सामान्य माणसाची व शेतकऱ्यांची शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार जाण्याची गरज कमी होणार असून मध्यस्थांवरील अवलंबित्वही घटणार आहे.केंद्र सरकार शेतकरी आणि नागरिकांना त्यांच्या मोबाईलच्या माध्यमातून सदैव उपलब्ध असावे, ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची स्पष्ट संकल्पना आहे. तंत्रज्ञानाचा खरा उपयोग तेंव्हाच होतो, जेव्हा त्याचा लाभ शेतापर्यंत आणि ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचतो. असे मत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकार्पण प्रसंगी व्यक्त केले आहे.या नव्या संकेतस्थळामुळे वेगवेगळ्या शासकीय संकेतस्थळांवर माहिती शोधण्याची कसरत शेतकऱ्यांना करावी लागणार नाही. 'ॲग्री वेल्फेअर' या संकेतस्थळावर पीएम-किसान, ॲग्रीस्टॅक आणि प्रधानमंत्री पीक विमा योजनेसह विविध महत्त्वाच्या कृषीविषयक योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध असणार आहे. पात्रता तपासणी, ऑनलाईन अर्ज आणि थेट लाभ हस्तांतरणाच्या (डीबीटी) सुविधांमुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.संकेतस्थळावरील माहिती अचूक आणि नियमितपणे अद्ययावत ठेवण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले गेले आहेत. अपूर्ण किंवा कालबाह्य माहितीमुळे नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होऊ शकतो, यामुळे सदैव जागरूक राहून पोर्टलवरील माहिती नेहमी अद्ययावत राहील याची दक्षता घेण्यात येत आहे.



ग्रामीण भागातील मर्यादित इंटरनेट सुविधांचा विचार करून पोर्टल हलके आणि वापरण्यास सुलभ बनविण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींनाही त्याचा वापर करता यावा, यासाठी स्क्रीन रीडर आणि सुलभ नेव्हिगेशनसारख्या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

हे नवीन संकेतस्थळ MeitY च्या DBIM ३.० आणि GIGW ३.० मानकांचे पालन करून विकसित करण्यात आले आहे. हे अत्यंत सुरक्षित, मोबाईलवर वापरण्यास सोपे आणि दिव्यांग व्यक्तींसाठी पूर्णपणे सुलभ आहे. हे व्यासपीठ 'पीएम-किसान', 'ॲग्रीस्टॅक' आणि 'प्रधानमंत्री पिक विमा योजना' या सारख्या प्रमुख उपक्रमांसाठी एक 'सिंगल-विंडो' म्हणजे एकाच ठिकाणी सर्व सुविधा देणारे प्रवेशद्वार म्हणून काम करणार आहे.या संकेतस्थळामुळे पारदर्शकता निर्माण होईल आणि मध्यस्थांची पूर्णपणे हकालपट्टी होणार आहे. ऑनलाइन पात्रता तपासणी, थेट अर्ज सादर करण्याची सुविधा आणि थेट बँक खात्यात आर्थिक मदत जमा करणे (डीबीटी) यासारख्या वैशिष्ट्यांमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक होते आणि मध्यस्थांची भूमिका पूर्णपणे संपते. कमी इंटरनेट गतीवरही हे पोर्टल कार्यक्षम राहील याची काळजी घेतली गेली आहे. ग्रामीण भागाचा विचार करून तयार केलेले हे पोर्टल वजनाला हलके आणि वापरण्यास सोपे आहे. हे साध्या स्मार्टफोनवर आणि जिथे नेटवर्क कमकुवत आहे, अशा ठिकाणीही सुरळीतपणे काम करते.वेळेवर आणि अचूक माहिती हे पोर्टलचे वैशिष्ट्य आहे. शेतकऱ्यांना हवामानाची स्थिती, आधुनिक वैज्ञानिक शेती पद्धती, बियाणे व खतांची उपलब्धता आणि बाजारभाव याविषयी थेट आणि विश्वासार्ह माहिती मिळेल. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हे संकेतस्थळ शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. पुढील काळात शेती आणि शेतकरी-शेतमजूर यांच्या उन्नतीसाठी हे प्रयत्न अधिक उपयुक्त ठरतील यात शंका नाही.

-अनिल आलुरकर,
उपसंचालक (माहिती) -
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.

दिपाली को-ऑप बँक लि. अमरावती.
निविदा
दि. ... डिजिटल निविदा ... दिनांक: २३/११/२०२६
दिनांक: २३/११/२०२६
मुख्य कार्यकारी अधिकारी
दिपाली को-ऑप. बँक लि. अमरावती.

पान १ व १० वरून

गोध्रा जळीतकांड प्रकरणातील

ठेवली होती. दोषींची अपील १०१८ पासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

आतापर्यंत आरोपींना जामीन- इरफानला २०२५ मध्येही मुदतपूर्व सुटकेच्या मागणीवर राज्य सरकारने विचार करावा यासाठी अंतरिम पॅरोल मिळाला होता. दरम्यान, १३ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दोषी अब्दुल रहमान धंतिया उर्फ कंकट्टो उर्फ जंबूरोला ६ महिन्यांचा अंतरिम जामीन दिला होता. त्याच्या पत्नीला कर्करोग शेवटच्या टप्प्यात होता आणि त्याच्या मुली मानसिकदृष्ट्या दिव्यांग होत्या. ११ नोव्हेंबर २०२२ रोजी न्यायालयाने त्याचा जामीन ३१ मार्च २०२३ पर्यंत वाढवला होता. डिसेंबर २०२२ मध्ये आणखी एक दोषी फारूकला जामीन देण्यात आला. न्यायालयाने त्याच्या प्रकरणात या बाबीचा विचार केला होता की, त्याने १७ वर्षांहून अधिक काळ तुरुंगात घालवला आहे. ट्रेनवर दगडफेक करण्यात त्याची भूमिका होती. त्यानंतर २१ एप्रिल २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आणखी ८ दोषींना जामीन दिला होता.

पुसदच्या चाणक्य ट्रॅव्हल्सचा

क्रमांक ४२६ जवळ आली असता हा अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या बसचालकाला अचानक झोपेची डुलकी लागली किंवा चक्कर आल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले असावे, असा प्राथमिक अंदाज आहे. त्यानंतर बस पुलाच्या कठड्यावर आदळून उलटली. मात्र, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.या भीषण अपघातात पुसद, यवतमाळ, वाशिम तसेच मुंबई-ठाणे परिसरातील एकूण ३० प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींमध्ये पुसद व यवतमाळ परिसरातील मोहम्मद, करण खडसे, अनुज खडसे, शिवनेरी राठोड, नंदिनी राठोड, भुरन विनायक आणि वैभव ढोलकर यांच्यासह अन्य प्रवाशांचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, जखमींच्या नावांची अधिकृत खातरजमा अद्याप प्रशासनाकडून केली जात आहे. अपघातातील सर्व जखमींना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. दरम्यान, या दुर्घटनेत पुसदच्या उत्तम जाधव यांच्यासह दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्याने पुसद परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातातील मृतांची आणि जखमींची अधिकृत माहिती तसेच दुर्घटनेचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

बाटलीबंद पाण्याची होणार

घटनेनंतर केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण कारवाई करत एक आदेश जारी केला आहे. देशातील सर्व 'ब्रँड'च्या बाटलीबंद पाण्याची चाचणी होणार आहे.

एका सरकारी आदेशानुसार, आता देशभरातील बाटलीबंद पिण्याच्या पाण्याच्या 'ब्रँड्स'ची तपासणी केली जाणार आहेत. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण आणि बिस्लेरी इंटरनॅशनल यांच्यातील वादानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. 'बिस्लेरी इंटरनॅशनल'नेही एक निवेदन जारी करत याबाबत स्पष्टिकरण दिले. त्यांनी सांगितले की, जनतेला सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवणे हे कंपनीचे सर्वोच्च प्राधान्य आहे आणि सध्याचा वाद मिटवण्यासाठी नियामकाला शक्य त्या सर्व प्रकारे सहकार्य करण्यास कंपनी तयार आहे.

बिस्लेरी इंटरनॅशनलने असा युक्तिवाद केला की, सप्टेंबर २०२५ मध्ये भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरने कंपनीच्या गोवा युनिटमध्ये उत्पादित केलेल्या बाटल्यांच्या एका बॅचमधून ६ नमुने गोळा केले होते. यापैकी ५ नमुने विहित मानकांची पूर्तता करणारे होते पण सहावा नमुना तसा नव्हता आणि त्याऐवजी त्यातील ब्रोमेटची पातळी विहित मर्यादेपेक्षा जास्त होती. कंपनीने या निकालाला आव्हान दिले आणि ते नमुने तपासणीसाठी एका संदर्भ प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. त्या प्रयोगशाळेला पाण्यातील ब्रोमेटची पातळी विहित मर्यादेत आढळली परंतु पाण्यात पॉलीसायक्लिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स आढळून आले

लाडकी बहीण योजनेमुळे

निधीची कमतरता पडू देणार नाही आणि सरकार यातून मार्ग काढेल, असा विश्वासही झिरवाळ यांनी व्यक्त केला.

निवडणुकीपूर्वी आम्हाला कोणी सांगितले नव्हते, मात्र महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली, असे झिरवाळ म्हणाले. आता या योजनेबाबत 'धरलं तर चावतं आणि सोडलं तर पळतं' अशी अवस्था झाली आहे. लाडक्या बहिणींना बाजूलाही करता येत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या योजनेमुळे आर्थिक परिस्थितीवर ताण आला असला तरी सरकार यातून नक्कीच मार्ग काढेल आणि कोठेही कमी पडणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि संबंधित नेत्यांच्या नेतृत्वात सरकार एका विचाराने काम करत असून कोणतीही अडचण येणार नाही, अशी खात्रीही त्यांनी दिली.

अन्नाचा दुष्काळ होता, मात्र आज अन्नाची टंचाई नाही

दुष्काळाच्या संभाव्य परिस्थितीवर बोलताना झिरवाळ यांनी १९७२ च्या दुष्काळाचा दाखला दिला. त्यावेळी अन्नाचा दुष्काळ होता, मात्र आज अन्नाची टंचाई नाही, तर पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो, असे ते म्हणाले. पिण्याचे पाणी रेल्वे किंवा विमानाने पोहोचवण्यासारख्या उपाययोजना कराव्या लागेल. त्यासाठी त्यासाठी मोठा निधी लागेल. त्यामुळे यंदाच्या आणि पुढच्या वर्षातही काहीशी आर्थिक चणचण जाणवू शकते, असे मत त्यांनी मांडले.

अजय-अतुल संगीतबद्ध करणार

रुपये अधिक जीएसटीच्या तरतुदीमध्ये मूळ संगीत निर्मिती, स्टुडिओ रेकॉर्डिंग आणि साउंड मिक्सिंग आदी कामांचा अंतर्भाव आहे.

थेट निवडीमागील कारण आयुक्तांनी केले स्पष्ट- निविदा प्रक्रिया का राबवली नाही, याचे उत्तर देताना कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले की निविदा काढली असती तर अजय-अतुल या प्रक्रियेत उतरले नसते. जागतिक स्तरावर महाराष्ट्राची ओळख अधिक उंचावणाऱ्या या जोडीची सांगीतिक प्रतिभा आणि राज्याच्या सांस्कृतिक वारशाची सखोल जाण लक्षात घेऊनच प्राधिकरणाने हा थेट निर्णय घेतला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

मुंबई, पुणे, कोकणात

पुणे, कोकणासह राज्यातील अनेक भागातील तापमानात मोठी घट झाली आहे. साधारण आठवडाभर राज्यात थंडी कायम राहू शकते, असे अंदाज वर्तवण्यात आला आहे.मुंबईसह राज्यात थंडीचा जोर वाढू लागला आहे. सांताक्रूझ वेधशाळेत शनिवारी किमान तापमानाची नोंद १६.२ अंश सेल्सिअस झाली. हे तापमान सरासरीपेक्षा ५ अंशांनी कमी आहे. त्यामुळे मुंबईकरांना यंदाच्या हंगामातील सर्वाधिक थंडीचा अनुभव आला. तर जळगावमध्ये राज्यातील सर्वात कमी म्हणजे ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्याच्या विविध भागांतही तापमानाचा पारा घसरला आहे.

पुण्यात थंडीचा जोर वाढला आहे. भारतीय हवामान विभागाच्या शिवाजीनगर केंद्रावर हंगामातील सर्वात कमी म्हणजेच ११.३ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. पाषाणमध्येही ११.३ अंश, तर लोहगावमध्ये ११.७ अंश तापमानाची नोंद झाली. चिंचवड १६.२ अंश तर मगरपट्टा १७ अंश तापमान नोंदले गेले. पुढील काही दिवस पुण्यात सकाळी थंडी आणि दुपारी उकाडा असा विरोधाभास जाणवेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

कोकणातील वातावरणातही मोठा बदल झाला असून, थंडीचा कडाका वाढल्याने रत्नागिरी जिल्हा गारठला आहे. दापोली, खेड आणि चिपळूण तालुक्यांत थंडीचा जोर अधिक जाणवत आहे. कोकणातील घाटरस्त्यांवर सकाळच्या सुमारास धुक्याची दाट चादर पसरत असून दृश्यमानताही कमी होत आहे. हवामान खात्याच्या नोंदीनुसार, १७.२ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. वाढत्या थंडीमुळे कोकणातील आंबा बागायतदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

राहुल नार्वेकरांनी अदिवासींच्या

राऊतांच्या आरोप तथ्यहिन; नार्वेकर

संजय राऊत यांच्या आरोपांवर बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, राऊतांच्या आरोपांवर काहीही तथ्य नाही. ज्या जमिनीवरून आरोप केले जात आहेत, ती आदिवासी जमीन नसून भोगवटा क्रमांक १ ची जमीन आहे. आदिवासींनी २०२४ पूर्वी केलेल्या सर्व तक्रारींचा निपटारा झाला आहे. २९पर्यंत झालेल्या तक्रारींमध्येही कुठेही नार्वेकर कुटुंबाचा नावाचा उल्लेख नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

ध्रुव राठी यांच्या अडचणी

पुढील सुनावणी ३ डिसेंबर २०२६ रोजी होणार आहे. हा कायदेशीर वाद मे २०१८ मध्ये ध्रुव राठी याने यूट्यूबवर अपलोड केलेल्या एका व्हिडिओपासून सुरू झाला. 'भाजप आयटी सेल भाग-२' या व्हिडिओमध्ये राठीने असा आरोप केला होता की, भाजपच्या आयटी सेलने तक्रारदार विकास पांडे यांना लाच देण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान विकास पांडे यांनी या आरोपांना खोटे आणि निराधार असल्याचं म्हटले आहे. हे आरोप आपली प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने केल्याचा दावा त्यांनी केला आहे. विकास पांडे हे 'आय सपोर्ट नरेंद्र मोदी' या सोशल मीडिया पेजचे संस्थापक विकास पांडे यांनी ध्रुव राठीच्या विरोधात न्यायालयात फौजदारी मानहानीचा खटला दाखल केला आहे.

लिव्ह-इन पार्टनरकडून महिलेची हत्या

आणली आणि बारकाईने पुरावे गोळा केले. पंचनामा कारवाई पूर्ण केल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या हत्याकांडानंतर मेमना गावासह संपूर्ण परिसरात खळबळ आणि भीतीचे वातावरण आहे. हत्येमागचं नेमकं कारण काय आहे, याचा उलगडा करण्यासाठी पोलिस ताब्यात घेतलेल्या संशयित तरुणाची कडक चौकशी करत आहेत. प्रकरणाची सर्व बाजूंनी तपासणी सुरू आहे.

मनपा कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद

मारहाण केली. सरकारी कामात अडथळा निर्माण झाला. याबाबत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे की, सरकारी कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी- अधिकाऱ्यांवर अशा प्रकारे हल्ला करणे, त्यांना धमकावणे आणि कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करणे ही चिंताजनक बाब आहे.

सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना करावी.या मागण्यांना घेऊन कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे.आंदोलन करणाऱ्यांमध्ये रमेश पांडे, राजेश उसरे, आकाश तिरथकर, मानविराज दंदे, कमलाकर जोशी, आशिष अवसरे, अजय पंधरे, ज्योती पारडशिंगे, अजय राठोड, विष्णू लांडे, डॉ. प्रतिभा आत्राम, अतुल भेरडे, शेखर सोनकांबळे, संजय निकम, शैलेश शर्मा, धरम दिवार, भागीरथ खैरकर, अशोक बारागोले, नरेंद्र देवनकर, संजय बागडे, प्रतिभा घंटेवार, मनोज सारवान, राजेश मालटे, दीपक सरसे, नामदेव मुंडे, श्रीकृष्ण ढगे, विजय भातकुलकर, विलास नकाशे, उमा जाधव आदींचा समावेश होता.

कर्जबाजारीपणाला कंटाळून

आहे. यावर्षीच्या नापिकीमुळे संकटात सापडलेल्या त्यांच्या कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

नांदेड बुछ्रामपंचायतीत भष्ट्राचार,

रुपये किंमतीचा आर ओ खरेदी केला. मात्र ज्या ठिकाणी तो बसवायचा होता. त्या ठिकाणी बसलाच नाही. तसेच घनचकरा संकलन करीता गाडी खरेदी केल्याचे ग्रामपंचायत रेकार्डला नोद आहे. परंतु घनकचरा पण संकलन केलेलाच नाही.ती गाडीसुद्धा मागिल दोन वर्षापासून एकाच ठिकाणी उभी आहे. त्यामुळे गावात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे.याबाबत गावातील नागरीक हर्षद नेहर,साजीद शेख,गोपाल वसू,रुपेश देवके, यांनी गटविकास अधिकारी दर्यापूर व मुख्यकार्यपालन अधिकारी, जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे तिन महिन्यापासून लेखी तक्रारी दाखल केल्यात पण त्या तक्रारीची दखलच घेतल्या गेली नाही. भ्रष्टाचार करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी सोनाली बूथ यांना तात्काळ निलंबित करुन त्याची खाते चौकशी करण्यात यावी व शासनाच्या विकासनिधीचा झालेला गैरप्रकाराबाबत दोषीवर गुन्हा दाखल करावा यासाठी गावातील युवक हर्षद नेहर, साजीद शेख, गोपाल वसू, रुपेश देवके हे आमरण उपोषनाला बसले असून त्यांच्या या आमरण उपोषणाला ग्रामस्थांचा मोठया प्रमाणात पाठींबा मिळत आहे. तीन महिन्यापासून तक्रारीची दखल न घेणाऱ्या प्रशासनाला उपोषणाकर्त्यांनी उपोषण करण्यासंबंधी पत्र देताच गट विकास अधिकारी, दर्यापूर यांनी तात्पुरती दखल घेत सोनाली बूथ यांचे तात्पुरते स्थानांतर केल्याचे पत्र काढले. परंतु भ्रष्टाचार करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या विरोधात जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचे सांगितले.

विशेष लोकअदालतीत ६४ ßाकरणांमध्ये

नेतृत्वाखाली ही विशेष लोकअदालत पार पडली.

लोकअदालतीसाठी जिल्हा व तालुका न्यायालयांतील न्यायाधीश, अधिवक्ता आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. पक्षकारांना वेळेवर माहिती देणे, सामोपचाराने वाद मिटविण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि आवश्यक समन्वय साधण्याचे काम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व न्यायालयांच्या माध्यमातून करण्यात आले.

दर्यापूर बाजार समितीत हरभऱ्याला

हरभरा विक्रीसाठी दर्यापूरच्या बाजार समितीमध्ये आला होता. अडते मंगेश देशमुख यांच्या अडतीवर आलेल्या या हरभऱ्याची अनिस ?ग्रो या खरेदीदाराने ९,५०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी केली. नविन हंगामातील हरभऱ्याला मिळालेल्या या चांगल्या दराबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांच्या हस्ते शेतकरी सचिन अपाले, अडते मंगेश देशमुख आणि खरेदीदार अनिस ?ग्रो यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे संचालक राजेश शेठ राठी, असिफभाई खान, प्रभाकर पाटील ताराळ यांच्यासह व्यापारी, अडते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाहनांना 'एचएसआरपी' नंबर प्लेट

यासह सर्व प्रकारच्या जुन्या वाहनांची कसून तपासणी केली जाणार आहे.या मोहिमेदरम्यान प्रमुख रस्ते, महामार्ग, तपासणी नाके तसेच गर्दीच्या ठिकाणी वाहने थांबवून नियमानुसार 'एचएसआरपी' पाटी बसवण्यात आली आहे की नाही, याची पडताळणी केली जाईल. शासनाच्या नियमांनुसार जुन्या वाहनांना ही नंबर प्लेट बसवणे अनिवार्य आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर परिवहन विभागाच्या पथकामार्फत जागेवरच कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.तरी, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत असलेल्या सर्व वाहनधारकांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी आपल्या वाहनांना तातडीने 'उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी' (एचएसआरपी) बसवून घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

विद्युत खांबावरून पडून खाजगी मजूर

नागरिकांना वीज पुरवठा केला जातो.मात्र सकाळपासून येथील नागरिकांचा वीज पुरवठा खंडित असल्यामुळे नागरिकांनी लाईनमन कर्मचारी यांच्याशी संपर्क केला,मात्र ते रजेवर असल्यामुळे एका खाजगी मजुराला वीज पुरवठा सुरु करण्यासाठी कर्मचाऱ्याने सांगितले. त्यामुळे श्री. इंगळे यांनी रोहित्र यंत्रास्थळी येऊन खांबावर चढले. काही क्षणातच त्यांना जबरदस्त असा शॉक लागला व ते पंधरा फुटावरून खाली पडले.ज्यामुळे त्यांच्या दोन्ही पायाला गंभीर दुखाप्त झाली. त्यांना तातडीने तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र गंभीर मार असल्यामुळे पुढील उपचारासाठी अमरावती रुग्णालयात हालविण्यात आले. या घटनेमुळे विज वितरण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

धुक्यामुळे अमरावती-मुंबई फ्लाईट

आले, अशी माहिती विमानतळ व्यवस्थापनाकडून देण्यात आली. विमान ऐनवेळी रद्द करण्यात आल्याने आठवड्याच्या पहिल्या दिवशी मुंबईतील कामांचे नियोजन करणाऱ्या प्रवाशांना त्याचा मोठा फटका बसला. प्रवाशांना ऐनवेळी पर्यायी व्यवस्था करावी लागली. रविवारी देखील विमानोड्डाण होऊ शकले नाही.

अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरील दृश्यमानता ८०० ते १ हजार मीटर होती. ही दृश्यमानता सरासरी ३ हजार मी. असते. ८०० ते १ हजार दृश्यमानता ही विमान उतरवण्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे रविवारी आणि सोमवारी मुंबई- अमरावती विमान रद्द करण्यात आले.

छ्रामस्थांच्या सूचनांवरून तयार

गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, तालुका कृषी अधिकारी, मृदा व जलसंधारण अधिकारी तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान स्थानिक ग्रामस्थांनी शेती,पिण्याचे पाणी आणि जलसंधारणाशी संबंधित विविध समस्या मांडल्या, तसेच त्यावर स्थानिक पातळीवरील प्रभावी उपाययोजनाही सुचवल्या. ग्रामस्थांनी मांडलेल्या सर्व समस्या आणि सूचनांचा एकत्रित विचार करून एक सर्वसमावेशक गावस्तरीय व तालुकास्तरीय दुष्काळ निवारण आराखडा तयार करण्यात आला आहे.या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी आणि आवश्यक निधीसाठी राज्य शासनाकडे तातडीने मागणी व पाठपुरावा केला जाईल,अशी ग्वाही आमदार चंदू यावलकर यांनी यावेळी दिली.सभेदरम्यान नागरिकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना आमदार साहेबांनी स्वतः सविस्तर उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.तसेच प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्याचे निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

प्रत्येक गावात होणार आढावा बैठका:- दुष्काळ निवारणाचे काम केवळ कागदावर न राहता तळागाळातील प्रत्येक गावापर्यंत पोहोचावे, यासाठी अशाच पद्धतीने तालुक्यातील प्रत्येक गावात,प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये आणि मोठ्या गावांमध्ये आमदार चंदूभाऊ यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकांचे आयोजन केले जाणार आहे.यावेळी या बैठकीला भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत,हिवरखेड ग्रामपंचायत सरपंच सविता गोपाल मालपे, उपसरपंच सचिन तायडे, बेलोना सरपंच उषा प्रवीण धोटे,माजी उपसभापती हरिभाऊ सुखसोहळे, बाळासाहेब भोजने, गोपाल टाकळे,शुभम तडस,राजूभाऊ भोजने, ज्ञानेश्वर फुटाणे,विजय तापडिया,धनंजय उमप, उत्तम उपासे यासह अनेक भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते तथा गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चांदूर रेल्वेत दुष्काळ, पाणी टंचाई

आणि तुषार सिंचनाद्वारे पिकांना पाणीपुरवठा करण्याबाबत चर्चा करण्यात आली. कृषीसाठी वीज जोडणी, वीज फीडर दुरुस्ती व नवीन फीडर जोडणी, तसेच चारा निर्मिती आणि जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता करण्यावर भर देण्यात आला. शेतकऱ्यांची पीक कर्जमाफी, तसेच जिल्हा मध्यवर्ती बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून नवीन पीक कर्ज वाटपाची सद्यस्थिती यावेळी जाणून घेण्यात आली.

याबाबत आमदार अडसड यांनी दुष्काळाच्या स्थितीमध्ये प्रस्तावित जलसंधारणाची कामे तातडीने पूर्ण करावीत. जनावरांना चाऱ्याची टंचाई भासू नये यासाठी चारा लागवडीकरिता शेतकऱ्यांना वैरण बियाणे उपलब्ध करून द्यावे. पीक कर्जमाफी व नवीन पीक कर्जाचे प्रलंबित प्रस्ताव तसेच प्रलंबित फार्मर आयडी आणि ई-केवायसी तातडीने निकाली काढावीत, असे निर्देश दिले. तसेच नागरिकांनी त्यांच्या तक्रारी MLApratapadsad.com या ऑनलाईन पोर्टलवर दाखल कराव्यात, असे आवाहन केले.सभेला चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यांतील तहसील कार्यालय, पंचायत समिती, कृषी, पाणीपुरवठा, जलसंधारण, वन, पशुसंवर्धन, सहायक निबंधक सहकारी संस्था, पाटबंधारे, नगर परिषद तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

समान नागरी कायद्याबाबत रविवारी

दुपारी १.३० वाजता, बुलढाणा जिल्ह्यासाठी दुपारी २.३० ते दुपारी ३.३० वाजता, यवतमाळ जिल्ह्यासाठी दुपारी ४ ते सायंकाळी ५ वाजता आणि अमरावती जिल्ह्यासाठी सायंकाळी ५.३० ते सायं. ६.३० वाजता जनसुनावणी घेण्यात येणार आहे.

संबंधित गट, संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांना नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती किंवा संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुनावणीच्या वेळेपुर्वी एक तास आधी उपस्थित राहावे लागेल. अमरावती येथील उपस्थितांची सुनावणी समितीसमोर समक्ष घेण्यात येईल. विभागातील जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या नागरीकांची सुनावणी दुरदृष्य प्रणालीद्वारे घेण्यात येईल. ज्या नागरीकांना केवळ ऑनलाईन पद्धतीने मत सादर करावयाचे आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या ucc.maharashtra.g

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

नागपुर येथे २७ ते ३० नोव्हे.ला होणा–या ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनी

विदर्भासह महाराष्ट्रातील शेतकरी, कृषी उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – मा.आमदार ॲड. विजयराव जाधव यांची पत्रकार परिषद

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भारतीय शेतीसमोर आज हवामानातील बदल, अनियमित पाऊस, दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाच्या बाजारभावातील अनिश्चितता आणि शेतीसमोरील आर्थिक आव्हाने अशी अनेक आव्हाने उभी आहेत. या पार्श्वभूमीवर शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) प्रभावी वापर करणे, शेतकऱ्यांना संशोधनाधारित शेतीची माहिती देणे आणि शेतीला अधिक फायदेशीर व शाश्वत बनविणे ही काळाची गरज आहे. याच व्यापक उद्देशाने आयोजित करण्यात येणारे ॲग्रोव्हिजन २०२६ हे १७ वे भव्य राष्ट्रीय कृषी प्रदर्शन दिनांक २७ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरातील मैदान, अमरावती रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती माजी आमदार ॲड. विजयराव जाधव, संचालक ॲग्रोव्हिजन फाउंडेशन, नागपूर यांनी सोमवारी (दि. २३)पत्रकार परिषदेत दिली. यावेळी राम जाधव आदर्श शेतकरी दत्ता लोणसुणे, प्रयोगशील शेतकरी बोलवार व सुभाष नानवटे यांची प्रचिती होती

पुढे बोलतांना माजी आमदार विजयराव जाधव यांनी सांगितले की केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नामदार नितीन गडकरी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि ॲग्रोव्हिजन फाउंडेशन व एम.एम. ॲक्टिव्ह साय-टेक कम्युनिकेशन्स यांच्या संयुक्त आयोजनातून हे प्रदर्शन साकारण्यात येत आहे. यंदाच्या ॲग्रोव्हिजनची मध्यवर्ती संकल्पना 'AI आणि स्मार्ट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकात्मिक कृषी परिसंस्थेची निर्मिती' अशी असून, आधुनिक शेती, डिजिटल तंत्रज्ञान, कृषी यांत्रिकीकरण, संशोधन, कृषी उद्योजकता आणि शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून करण्यात येणार आहे.

ॲग्रोव्हिजन २०२६ मध्ये ५०० हून अधिक सहभागी संस्था आणि कृषी क्षेत्रातील विविध घटक एकाच व्य ज्ञानवर्धक कार्यशाळा. यंदाच्या प्रदर्शनात ४२ हून अधिक कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था, शासकीय विभाग आणि कृषी उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. विदर्भातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असल्याने दुष्काळी परिस्थिती, पाण्याची कमतरता आणि हवामानातील बदल यांचा शेतीवर परिणाम होत असतो. त्यामुळे यंदाच्या प्रदर्शनामध्ये कमी पाण्यात अधिक उत्पादन घेणे, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक नियोजन, जलसंधारण, फळबागांचे व्यवस्थापन आणि शाश्वत शेती पद्धती यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. विशेषतः वाशिम पॅटर्नच्या माध्यमातून जलसंधारण व ग्रामविकास, पाणी संवर्धन, शेततळे आणि जलव्यवस्थापनाच्या यशोगाथा मांडण्याचाही कार्यशाळांच्या विषयांमध्ये समावेश आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ड्रोन आणि स्मार्ट तंत्रज्ञानाने शेतीचे बदलते स्वरूप यांची माहिती राहणार आहे.

शेतीपूरक उद्योग, कृषी प्रक्रिया आणि ग्रामीण रोजगाराच्या संधी

विदर्भ आणि महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे हे ॲग्रो व्हिजन राहणार आहे. ॲग्रोव्हिजन हे शेतकरी, शास्त्रज्ञ, संशोधक, कृषी उद्योजक, कंपन्या आणि शासनाच्या विविध विभागांना एकत्र आणणारे महत्त्वपूर्ण राष्ट्रीय व्यासपीठ आहे. विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान आत्मसात करून बदलत्या काळानुसार शेतीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आवश्यक आहे. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन न राहता ती एक सक्षम आणि फायदेशीर उद्यमशील व्यवस्था बनली पाहिजे, हा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह विदर्भातील शेतकरी बांधव, तरुण शेतकरी, महिला शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी उद्योजक, कृषी विद्यार्थी आणि शेती क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी मोठ्या संख्येने नागपूर येथे उपस्थित राहून ॲग्रोव्हिजन २०२६ चा लाभ घ्यावा.

मानोरा बसस्थानकावर महिलेचे अडीच लाखांचे दागिने लंपास

सात संशयित महिला विठोलीतून ताब्यात

■ प्रतिनिधी | मानोरा ■



बसप्रवासादरम्यान महिलेच्या पर्समधील सोन्या-चांदीचे सुमारे २ लाख ७८ हजार रुपयांचे दागिने चोरी झाल्याची घटना २३ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. या प्रकरणी मानोरा पोलिसांनी तातडीने कारवाई करीत विठोली येथून सात संशयित महिलांना ताब्यात घेतले आहे.

सुरेखा हनुमान इंगोले (वय ४५, रा. मोहगव्हाण, पारवा) या २३ नोव्हेंबर रोजी सकाळी बोरी येथे माहेरी जाण्यासाठी भोयणी फाटा येथून मानोरा जाणाऱ्या बसमध्ये बसल्या होत्या. यावेळी त्यांच्या आजूबाजूच्या आसनांवर लहान मुलांसह सहा ते सात अनोळखी महिला बसल्या होत्या. सकाळी सुमारे १०.४५ वाजता मानोरा बसस्थानकावर उतरल्यानंतर त्यांनी मोठ्या पर्समधील लहान पर्स तपासली असता सोन्याचे दागिने असलेली पर्स गायब असल्याचे निदर्शनास आले.

चोरी गेलेल्या दागिन्यांमध्ये सोन्याची अंगठी, कानातील टापसे, शिपला, सोन्याची पोत, बाळ्या तसेच चांदीचे जोडवे असा एकूण २१.५० ग्रॅम सोन्याचा व २० ग्रॅम चांदीचा ऐवज होता. सोन्याच्या दागिन्यांची किंमत अंदाजे २ लाख ७५ हजार रुपये, तर चांदीच्या दागिन्यांची किंमत ३ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी सुरेखा इंगोले यांच्या फिर्यादीवरून सात अनोळखी महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान चोरीतील संशयित महिला ऑटोने विठोलीच्या दिशेने गेल्याची गोपनीय माहिती ठाणेदार नैना पोहेकर यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तातडीने पोलीस पथकासह विठोली येथे धाव घेत सात महिलांना ताब्यात घेतले.

ही कारवाई ठाणेदार नैना पोहेकर, जमादार शेषराव राठोड, पोलीस शिपाई रोहन तायडे, फिरोज शेख, चेतन भोयर व महिला पोलीस सुषमा लोखंडे यांनी केली. पुढील तपास मानोरा पोलीस करीत आहेत.

सोयजना येथे दोन गटांत तुंबळ हाणामारी

परस्परविरोधी तक्रारींवरून दहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल

■ प्रतिनिधी | मानोरा ■



तालुक्यातील सोयजना येथे २२ नोव्हेंबर रोजी दोन गटांत हाणामारीची घटना घडली. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून एकूण दहा जणांविरुद्ध मानोरा पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले असून, पुढील तपास सुरू आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत एक महिला सासऱ्याचा जेवणाचा डबा शेतात घेऊन जात असताना आरोपी निलेश कोल्हे याने तिचा हात धरल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यावेळी महिलेचे नातेवाईक घटनास्थळी आले असता आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर नातेवाईकांना बोलावून लाठीने मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी निलेश कोल्हे, विजय कोल्हे व तीन महिलांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास जमादार सुनील नेमाने करीत आहेत.

दरम्यान, दुसऱ्या घटनेत निलेश कोल्हे, त्यांचे काका, पत्नी व काकू यांना बकऱ्या नेण्याच्या कारणावरून तसेच पोलीस ठाण्यात तक्रार का दिली, या वादातून गैरकायद्याची मंडळी जमवून लोखंडी पाईप व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याची फिर्याद निलेश कोल्हे यांनी दिली आहे. या तक्रारीवरून दीपक कोल्हे, शुभम कोल्हे, महादेव कोल्हे व दोन महिलांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही प्रकरणांचा तपास ठाणेदार नैना पोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, दुसऱ्या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक रमेश पवार करीत आहेत.

अकोट तालुक्यातील ४९ गावांत पाणीटंचाईचे संकट; टंचाईग्रस्त क्षेत्र घोषित!

एप्रिल ते जून २०२७ या तीन महिन्यांसाठी भूजल उपशावर निर्बंध; उपविभागीय अधिकाऱ्यांची अधिसूचना

■ प्रतिनिधी | अकोट ■

आगामी उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईची गंभीरता लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. अकोट तालुक्यातील तब्बल ४९ गावांना एप्रिल ते जून २०२७ या कालावधीसाठी पाणीटंचाईग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी मनोज लोणारकर यांनी महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम २००९ अंतर्गत अधिसूचना जारी केली आहे.

या निर्णयानुसार, पाणीटंचाईग्रस्त क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांपासून एक किलोमीटरच्या परिसरातील विहिरींद्वारे होणाऱ्या भूजल उपशावर तात्पुरते निर्बंध लागू राहणार आहेत. सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवर विपरीत परिणाम होऊ नये आणि उपलब्ध भूजलाचा वापर प्राधान्याने पिण्याच्या पाण्यासाठी करता यावा, हा या निर्बंधांमागील मुख्य उद्देश आहे.

४९ गावांचा यादीत समावेश

अकोट तालुक्यातील केलपाणी बु., मोहाळा, धारगड, पोपटखेड, मुंडगाव, बळेगाव, लोहारी खुर्द, अडगाव खुर्द, नेव्हरी बु., वणी, अकोली जहांगीर, महागाव, पणज, उमरा, बोर्डी, बेलुरा, शिवपूर कासोद, वरूर, कवठा बु., कुटासा, आसेगाव बाजार, चोहोट्टा बाजार यांसह एकूण ४९ गावांचा या अधिसूचनेत समावेश आहे.

उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई तीव्र होण्यापूर्वीच भूजलसाठ्यांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संबंधित गावांमध्ये विहिरींच्या माध्यमातून होणाऱ्या भूजल उपशावर नियंत्रण राहणार असून, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संवर्धन करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाच्या तालुकास्तरीय कृती दलावर पत्रकार अजय ढवळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■



राज्य शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या वाशिम तालुकास्तरीय कृती दलाच्या सन्माननीय सदस्यपदी पत्रकार अजय ढवळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समिती अध्यक्ष तथा गटविकास अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सक्षम करणे, नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती वाढविणे आणि गावांना आरोग्यदृष्ट्या सक्षम बनविणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून पत्रकार श्री. ढवळे यांना नियुक्तीचे अधिकृत पत्र देण्यात आले असून, कृती दलाच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे निमंत्रणही देण्यात आले आहे. ग्रामीण भागातील आरोग्यविषयक समस्या, आरोग्य सुविधांची उपलब्धता, जनजागृती आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी या कृती दलाच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत. पत्रकार अजय ढवळे यांच्या नियुक्तीमुळे अभियानाच्या जनजागृती उपक्रमांना माध्यम क्षेत्रातील सहभागाची जोड मिळणार आहे. त्यांच्या नियुक्तीचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

हरणीच्या पाडसाला भटक्या कुत्र्यांच्या तावडीतून जागरूक नागरिकांनी सोडविले

वन प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आले जखमी वन्य प्राणी



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील तीर्थक्षेत्र पोहरादेवी - अमरगड (वाई गौळ) मार्गाच्या मध्ये संत सेवालाल महाराज निसर्ग पर्यटन केंद्राजवळ भटक्या कुत्र्यांच्या जिवघेण्या हल्ल्यात सापडलेल्या हरणीच्या पाडसाला कुत्र्यांच्या तावडीतून अमरगड (वाई गौळ) चे जागरूक नागरिक अतुल अंबादास आडे आणि अश्विन प्रकाश महाराज यांनी समयसूचकता दाखवून वाचविल्याने एका वन्य प्राण्याच्या पाडसाला जीवदान मिळाले आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या हरिणीचे पिल्लू वन प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

घटना रात्रीच्या वेळी घडली. संत सेवालाल महाराज निसर्ग पर्यटन केंद्राजवळील रस्त्यालगत हरणीचे पाडस भटकत असताना अचानक भटक्या कुत्र्यांच्या टोळीने त्यावर हल्ला चढविला. कुत्र्यांनी पाडसाला घेरून चावा घेण्यास सुरुवात केली. भीतीने पाडस जीवाच्या आकांताने ओरडत होते. त्याचा आवाज परिसरात घुमला. हा आवाज ऐकून पोहरादेवी ला जाणारे अतुल आडे आणि अश्विन महाराज हे तात्काळ धावत त्या ठिकाणी पोहोचले. त्यांनी आरडाओरड करून, दगड मारून कुत्र्यांना पळवून लावले. त्यांच्या या धाडसामुळे पाडसाचे प्राण वाचले. अन्यथा कुत्र्यांनी काही क्षणातच त्याला ठार केले असते.

जखमी अवस्थेत सापडले पाडस

कुत्र्यांच्या हल्ल्यात पाडसाच्या अंगावर ठिकठिकाणी जखमा झाल्या होत्या. ते घाबरलेले, थरथरत जमिनीवर पडले होते. दोन्ही नागरिकांनी त्याला हळुवारपणे उचलून सुरक्षित ठिकाणी आणले. पाणी पाजले, जखमांकडे पाहणी केली व त्याला आधार दिला.

श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची उत्तुंग झेप कायम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या शैक्षणिक सत्र २०२५-२६ च्या गुणवत्ता यादीमध्ये श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम येथील तब्बल पाच विद्यार्थिनींनी स्थान मिळवून महाविद्यालयाच्या शैक्षणिक यशात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थिनींनी संपादन केलेल्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात पुन्हा एकदा भर पडली आहे.

विद्यापीठाच्या BSW (Bachelor of Social Work) अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीमध्ये कु. साक्षी गिरी हिने चौथा क्रमांक, तर कु. निकिता लबडे हिने आठवा क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच MSW (Master of Social Work) अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीमध्ये कु. भूमिका भगत हिने तृतीय क्रमांक, कु. दुर्गा व्यवहारे हिने पाचवा क्रमांक, तर कु. रेणुका सरकुंडे हिने दहावा क्रमांक प्राप्त करून विशेष यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, एकाच शैक्षणिक सत्रात ऐं आणि श्ऐं या दोन्ही अभ्यासक्रमांतील पाच विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविणे ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. विद्यार्थिनींची मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि चिकाटी यांचे हे फलित असून महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरणाची साक्ष देणारे आहे.

खंडणीच्या आरोपांना न्यायालयात दिलासा; ताथुरकर दाम्पत्याला अटकपूर्व जामीन

वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल पोलिसांच्या कार्यपद्धतीवर न्यायालयाचे प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोला ■

कथित खंडणीच्या आरोपावरून सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात विद्या नरेंद्र ताथुरकर आणि नरेंद्र पुरुषोत्तम ताथुरकर या दाम्पत्याला अतिरिक्त सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश तेजवंत सिंग ए. संधू यांनी २१ नोव्हेंबर रोजी दोघांनाही प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ॲड. मनोज वर्मा यांनी प्रभावी युक्तिवाद करीत न्यायालयासमोर बचावाची बाजू मांडली.

सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०६८६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०८(२), ३५१(२) आणि ३(५) अंतर्गत कथित खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. २२ जून २०२६ रोजी झालेल्या शस्त्रक्रियेतील कथित वैद्यकीय निष्काळजीपणावरून हा वाद निर्माण झाल्याचा बचाव अर्जदारांच्या वतीने करण्यात आला. न्यायालयाने संबंधित कॉल रेकॉर्डिंग स्वतः ऐकून त्यामध्ये १० लाख रुपये उकळण्याचा खंडणीचा हेतू स्पष्ट होत नसल्याचे निरीक्षण नोंदवले. डॉक्टरांच्या उपचारपद्धतीवर प्रश्न उपस्थित करणे किंवा वैद्यकीय निष्काळजीपणाबाबत जाब विचारणे म्हणजे खंडणी ठरत नाही, असा अर्जदारांचा युक्तिवादही सुनावणीदरम्यान मांडण्यात आला.

या प्रकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे, ताथुरकर दाम्पत्याने २९ सप्टेंबर २०२६ रोजीच पोलीस अधीक्षकांकडे कथित वैद्यकीय निष्काळजीपणाबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. मात्र, या तक्रारीवर काय कारवाई झाली, याबाबत प्रश्न उपस्थित होत असतानाच डॉक्टरांच्या तक्रारीवर तत्काळ गुन्हा दाखल करण्यात आल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. तक्रार दाखल करण्यास सात दिवसांचा विलंब झाल्याची बाबही न्यायालयाने नोंदवली. त्यामुळे पोलिसांच्या तपास प्रक्रियेवरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले.

'डॉक्टर हे तपासणी किंवा उत्तरदायित्वाच्या पलीकडे नाहीत,' असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत न्यायालयाने वैद्यकीय क्षेत्रातील जबाबदारीचा मुद्दा अधोरेखित केला. तसेच आवश्यक डिजिटल पुरावे पोलिसांनी जप्त केलेले असल्याने आरोपींची पोलीस कोठडीत चौकशी करण्याची आवश्यकता नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

ॲड. मनोज वर्मा यांनी कायदेशीर तरतुदी, उपलब्ध पुरावे आणि प्रकरणातील घटनाक्रमाच्या आधारे केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे ताथुरकर दाम्पत्याला अटकपूर्व जामिनाच्या स्वरूपात दिलासा मिळाला. जामीन मंजूर करताना साक्षीदारांवर दबाव न आणणे, न्यायालयाच्या परवानगीशिवाय ठिकाण न सोडणे, तपासासाठी उपस्थित राहणे आणि आवाजाचे नमुने देणे अशा अटी घालण्यात आल्या आहेत.

शिवाई इलेक्ट्रिक बसमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना प्रवास सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार!

■ प्रतिनिधी | रिसोड ■



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) 'शिवाई' वातानुकूलित इलेक्ट्रिक बस सेवेमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनाही इतर एसटी बसप्रमाणे मोफत अथवा नियमानुसार प्रवास सवलत लागू करण्यात यावी, या मागणीसाठी भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव लखनसिंह ठाकुर यांनी आज मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले.

यावेळी पत्रकारांच्या या रास्त मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक भूमिका घेत एसटी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना (MD) यासंदर्भात तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत सकारात्मक शेरा व निर्देश दिले.

एसटी महामंडळाच्या साध्या, निमआराम, शिवशाही तसेच इतर वातानुकूलित बस सेवांमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना शासनाच्या नियमानुसार प्रवास सवलत उपलब्ध आहे. मात्र, महामंडळाच्या ताफ्यात नव्याने दाखल झालेल्या अत्याधुनिक व पर्यावरणपूरक 'शिवाई' इलेक्ट्रिक बस सेवेमध्ये ही सवलत लागू नसल्यामुळे पत्रकारांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविणे, ग्रामीण व शहरी भागातील जनसमस्या शासनापर्यंत मांडणे तसेच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यामुळे एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस सेवांमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना समान प्रवास सवलत मिळणे आवश्यक असल्याची भूमिका लखनसिंह ठाकुर यांनी परिवहन मंत्र्यांसमोर मांडली.

तसेच 'शिवाई' इलेक्ट्रिक बसमध्ये ही सवलत लागू करण्यासाठी एसटी महामंडळाच्या सर्व आगारांना स्पष्ट परिपत्रक जारी करावे, ई-तिकीट प्रणालीमध्ये आवश्यक तांत्रिक सुधारणा कराव्यात आणि वाहक व तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना योग्य सूचना द्याव्यात, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

जाहीर नोटीस

वि. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय कमांक २, वाशिम जि.वाशिम यांचे न्यायालयात

फौ. कि. अर्ज क्र. ५१०/२०२६ चौकशी तारीख २६/११/२०२६

शेख राजीक शेख बाशीद

.....वि.....

मुख्याधिकारी तथा निबंधक, जन्म मृत्यू विभाग, नगर परिषद वाशिम ता. जि. वाशिम

अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये अर्ज कलम १३(३) जन्म मृत्यु नोंदणी आधिनियम १९६९ प्रमाणे जन्माची नोंद होणे बाबत अर्ज केला आहे.

सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, वरील प्रकरणात अर्जदार हिचा जन्म दि. ०१/०७/१९७२ रोजी वाशिम ता. जि. वाशिम येथे झाल्याची नोंद नगर परिषद, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग वाशिम येथे घेणेसाठी कोर्टास निर्देश देणेकरीता अर्ज केला आहे.

तरी कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी दि. २६/११/२०२६ रोजी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर प्रकरण कायद्यानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ०३/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

शिक्का

सहा अधिक्षक,
मुख्यन्यायदंडाधिकारी, वाशिम

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्ष १४ ■ अंक ३५६ ■ मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

रब्बी हंगामासाठी कालव्याचे पाणी तातडीने सोडा - अतुल वांदिले



शेतकऱ्यांना केवळ १० टक्के पाणी मिळणार असेल, तर शेती करायची कशी आणि शेतकरी जगणार कसा

शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्या ; राष्ट्रवादी काँग्रेसची वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

हिंगणघाट जनमाध्यम - वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी कालव्याद्वारे तातडीने पाणी सोडण्यात यावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत वर्धा जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

वर्धा जिल्हा हा प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असून, या भागातील हजारो शेतकऱ्यांची शेती सिंचनाच्या पाण्यावर अवलंबून आहे. खरीप हंगामानंतर रब्बी हंगामाला सुरुवात झाली असून,गहू, हरभरा, चणा, भाजीपाला तसेच इतर पिकांच्या पेरणीसाठी आणि वाढीसाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. मात्र, अद्याप कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आले नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

वडगाव प्रकल्प तसेच नांद (शेंडेस्वर) प्रकल्पाच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून असलेल्या अनेक गावांतील शेतकरी सध्या पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. शेतकऱ्यांनी मोठा आर्थिक खर्च करून पिकांची लागवड केली आहे. मात्र, ऐन गरजेच्या वेळी सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. विहिरी व बोअरवेलच्या मर्यादित पाण्यावर संपूर्ण शेती करणे शक्य नसल्याने कालव्याचे पाणी वेळेत मिळणे अत्यंत गरजेचे आहे.यासंदर्भात दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांच्यामार्फत जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. मात्र, निवेदन देऊनही आजपर्यंत कालव्याद्वारे पाणी सोडण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.जिल्हा प्रशासनाने तातडीने संबंधित पाटबंधारे व सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वडगाव व नांद (शेंडेस्वर) प्रकल्पाच्या कालव्याद्वारे पाणी सोडण्याचे नियोजन करावे. तसेच हिंगणघाट, समुद्रपूर, सिंदी रेल्वेसह वर्धा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील शेतकऱ्यांना रब्बी पिकांसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध करून द्यावे. कालव्याच्या शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांनाही समान न्यायाने पाणी मिळेल, याची दक्षता घ्यावी.

शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ पाणीपुरवठ्याचा नसून त्यांच्या वर्षभराच्या कष्टाचा आणि उपजीविकेचा आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन कालव्याला पाणी सोडण्याचे आदेश द्यावेत. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी दिला आहे.

यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, सुनील राऊत, महेश झोटिंग पाटील, मिलिंद हिवलेकर,राजेंद्र शर्मा, संदीप किटे, योगिता इंगळे, प्रणय कदम, संजय नेहारोत्रा, प्रशांत घवघवे, प्रवीण पेठे, अशोक वांदिले, सुनील राऊत, महेश झोटिंग पाटील, हिवलेकर, राजेंद्र शर्मा, संदीप किटे, योगिता इंगळे, प्रणय कदम, संजय नेहारोत्रा, प्रशांत घवघवे, प्रवीण पेठे, अशोक वांदिले, सुनील डोंगरे, संदीप भांडवलकर, आशिष देवतळे, विनोद वानखेडे, खलील खतीप, मिलिंद कोपुलवार, राकेश चंदनखेडे, शारदा केणे, ज्योत्स्ना तडस, दुर्गा बेलखोडे, वर्षा बोबले, निखिल शेळके,आदी पदाधिकारी व कार्यकर्ते, मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

महिलांचा इशारा धुडकावला, अखेर पोलिसांनी भट्टी उद्ध्वस्त केली

५५ हजारांचा मुद्देमाल जप्त, दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले



साहूर जनमाध्यम : गावातील संसार उद्ध्वस्त करणाऱ्या अवैध दारूविक्रीविरोधात अखेर महिलांनी रणशिंग फुंकले आणि पोलिसांनीही दारू विक्रेत्याच्या अड्ड्यावर धडक दिली. दृगवाडा येथे दारूबंदी महिला मंडळाच्या माहितीवरून आष्टी पोलिसांनी अवैध दारूभट्टीवर छापा टाकत ५५ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.वर्धा जिल्ह्यात दारूबंदी असतानाही दृगवाडा आणि साहूर परिसरातील अनेक गावांमध्ये खुलेआम दारूविक्री सुरू असल्याचे चित्र आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, संसार उघड्यावर आले, तर गावांमध्ये भांडणे, वाद आणि महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने महिलांमध्ये तीव्र संताप होता. दारूविक्री बंद करण्याचा इशारा देऊनही विक्रेत्यांवर त्याचा परिणाम होत नव्हता. दृगवाडा येथील महिला एकवटल्या आणि त्यांनी दारूबंदी महिला मंडळाची स्थापना करून अवैध दारूभट्ट्यांविरोधात लढा उभारला. गावात नितेश वामन खंडाळे (३५) हा अवैधरीत्या दारू तयार करून विक्री करीत असल्याची माहिती महिलांना मिळाली. त्यांनी तत्काळ आष्टीचे ठाणेदार देविदास गजरे यांना माहिती दिली. महिलांच्या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी तातडीने छापा टाकला.

या कारवाईत २४ हजार ३६० लिटर कच्चा मोहा सडवा, टिनाचे २४ पत्रे आणि दोन लोखंडी ड्रम असा एकूण ५५ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ठाणेदार देविदास गजरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद वानखडे, बालाजी सांगळे आणि अश्विन चव्हाण यांनी ही कारवाई केली.

महिलांच्या निर्धाराला पोलिसांची साथ

नव्याने रुजू झालेले ठाणेदार देविदास गजरे यांनी अवैध दारूविक्रीविरोधात कठोर भूमिका घेतल्याने महिला मंडळाला मोठे बळ मिळाले आहे. या कारवाईबद्दल दृगवाडा येथील महिलांनी ठाणेदार गजरे, पोलीस उपनिरीक्षक वानखडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले. गावातील व्यसनाधीनता आणि अवैध दारूविक्रीचा विळखा मोडण्यासाठी महिलांनी पुकारलेला हा एल्गार आता निर्णायक ठरणार का, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

महात्मा फुले महामंडळाच्या कर्ज योजनांच्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण होणार

व्यवसाय, रोजगार व उत्पन्नवाढीची माहिती संकलित करणार

लाभार्थ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन

वर्धा जनमाध्यम : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण आणि योजनांच्या परिणामांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये पायलट प्रकल्प राबविण्यात येणार असून लाभार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

मागासवर्गीय समाजातील घटकांचे सामाजिक व आर्थिक उत्थान करणे, त्यांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हा महामंडळाचा प्रमुख उद्देश आहे. या उद्देशाने महामंडळामार्फत विविध कर्ज व आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येतात.

या सर्वेक्षणासाठी मे. प्रायमूव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट्स प्रा. लि. या संस्थेची तांत्रिक सहाय्य संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वेक्षणादरम्यान कर्ज योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून कर्जाचा वापर कोणत्या व्यवसायासाठी करण्यात आला, संबंधित व्यवसायाची सद्यस्थिती काय आहे, रोजगार व उत्पन्नामध्ये किती वाढ झाली, तसेच कर्ज परतफेडीची स्थिती काय आहे, याची माहिती संकलित करण्यात येणार आहे. याशिवाय कर्ज वितरणानंतर व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी, व्यवसायाची प्रगती आणि योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींचाही अभ्यास केला जाणार आहे.

या सर्वेक्षणासाठी महामंडळाच्या नियुक्त प्रतिनिधींना लाभार्थ्यांनी आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे. सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे महामंडळाच्या योजनांची परिणामकारकता वाढविणे, भविष्यातील योजनांचे अधिक प्रभावी नियोजन करणे आणि लाभार्थ्यांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

सोलर कंपनीच्या कार्यालयात तोडफोड; कर्मचाऱ्याला मारहाण

तळेगाव (शा.पं.) : शेतातील कपाशीच्या पऱ्हाटीचे नुकसान कंपनीतील माकडांमुळे झाल्याचा आरोप करीत एका शेतकऱ्याने सोलर कंपनीच्या कार्यालयात तोडफोड केली. तसेच एरिया ऑफिसरला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना २२ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास इंदरभारी शिवारात घडली. हरिश्चंद्र मानमोडे असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी भूषण नौकरकार यांच्या तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. कंपनीच्या सुरक्षा केबिनमधील घड्याळ, टॅब, सीसीटीव्ही कॅमेरा, सोलर पॅनल आणि खिडकीच्या काचा फोडून साहित्याचे नुकसान करण्यात आले. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

शेतात कापूस वेचताना शेतकरी महिलेला धमक्या

देवळी : शेतात कापूस वेचण्याचे काम सुरू असताना जुन्या वादातून दोघांनी महिलेला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. कविता रेवतकर यांच्या तक्रारीनुसार, अमोल पारोदे आणि मनोज पारोदे यांनी शेतात येऊन वाद घातला. एका आरोपीने अश्लील भाषेत शिवीगाळ करीत मारून टाकण्याची धमकी दिली, तर दुसऱ्यानेही धमकावले. याप्रकरणी देवळी पोलिसांनी दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

संशयास्पद हालचाली करणारा युवक पोलिसांच्या ताब्यात

वर्धा : मध्यरात्रीच्या सुमारास घराच्या अंगणात अंधारात लपून संशयास्पद हालचाली करणाऱ्या युवकाला रामनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. कृष्णकुमार रामनरेश मिश्रा (२८) असे युवकाचे नाव आहे. २२ नोव्हेंबर रोजी रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास पेट्रोलिंगदरम्यान पोलिसांना तो यश लालवानी यांच्या घरासमोरील अंगणात आढळला. पंचांसमक्ष चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो तेथे असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. याप्रकरणी महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १२२ (क) अन्वये कारवाई करण्यात आली.

पत्रकार स्व. प्रवीण वानखेडे यांच्या स्मृतींनिमित्य २५ रोजी राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा



वर्धा जनमाध्यम : समाजभान जपणारे आणि लेखणीच्या माध्यमातून सामाजिक विचारांना दिशा देणारे दिवंगत पत्रकार प्रा. डॉ. प्रवीण वानखेडे यांच्या स्मृती जपताना त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम परिवर्तनधारा साहित्य कला मंच, वर्धा यांच्या वतीने राबविण्यात येत आहे. आत्मसन्मान दिनाचे औचित्य साधून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ खुल्या राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून शुक्रवार, २५ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय, वर्धा येथे स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आजचा युवक आणि उद्याचा भारत' हा स्पर्धेचा विषय आहे.

प्रथम पुरस्कार १० हजार, द्वितीय ७ हजार आणि तृतीय ५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे स्वरूप आहे. याशिवाय तीन प्रोत्साहनपर पुरस्कारही दिले जाणार आहेत.

सायंकाळी ६ वाजता आंबेडकरी विचारवंत प्रशिक आनंद यांच्या व्याख्यानाने समारोप होईल. स्पर्धेसाठी २५० रुपये प्रवेश शुल्क असून प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर आहे.

युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक परिवर्तनधारा साहित्य कला मंचने केले आहे.

भूजल विभागाच्या ई-निविदांना कंत्राटदारांचा 'दे धक्का'

९० टक्के कंत्राटदार उच्च न्यायालयात; जाचक अटींविरोधात दंड थोपटले

पाच लाखांची अनामत, रोटरी मशीनची सक्ती आणि मोजक्या कंत्राटदारांच्या निवडीवर आक्षेप; २५ च्या सुनावणीकडे लक्ष

आर्वी जनमाध्यम

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या माध्यमातून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या रिचार्ज शाफ्ट व इतर अनुषंगिक कामांच्या ई-निविदा प्रक्रियेने आता न्यायालयीन वळण घेतले आहे. निविदेतील कथित जाचक अटी, तांत्रिक पात्रतेचे निकष, पाच लाख रुपयांची अनामत रक्कम, रोटरी मशीनची सक्ती आणि प्रत्येक महसूल विभागातून केवळ सात कंत्राटदारांची निवड करण्याच्या धोरणाविरोधात कंत्राटदारांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. राज्यातील सुमारे ९० टक्के भूजल कंत्राटदारांनी या निविदा प्रक्रियेला आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केल्याची माहिती आहे. त्यामुळे भूजल विभागाच्या निविदा प्रक्रियेवरून राज्यभर खळबळ उडाली असून, आता या वादाचा फैसला न्यायालयात होण्याची शक्यता आहे. येत्या २५ नोव्हेंबरला या प्रकरणाची प्रथम सुनावणी होणार असल्याने भूजल क्षेत्रातील कंत्राटदारांचे लक्ष न्यायालयाकडे लागले आहे.

भूजल पातळी वाढविणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे आणि जलसंधारणाला चालना देणे या उद्देशाने रिचार्ज शाफ्टसह विविध कामे केली जातात. या कामांसाठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी तसेच जलयुक्त शिवार योजनेतून निधी उपलब्ध होत असतो. मात्र, या कामांच्या निविदा प्रक्रियेत जिल्हास्तरावरील गरजा, स्थानिक परिस्थिती आणि अनुभवी कंत्राटदारांची क्षमता विचारात घेण्याऐवजी महसूल विभागनिहाय केंद्रीकृत पद्धतीने अटी निश्चित करण्यात आल्याचा कंत्राटदारांचा आरोप आहे.

सात कंत्राटदारांची मर्यादा, इतरांचे काय

या संपूर्ण वादातील सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रत्येक महसूल विभागातून केवळ सात कंत्राटदारांची निवड करण्याची तरतूद. यामुळे अनेक वर्षांपासून भूजल क्षेत्रात काम करणारे अनुभवी स्थानिक कंत्राटदार निविदा प्रक्रियेबाहेर फेकले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. कामाचा प्रत्यक्ष अनुभव, यापूर्वी केलेल्या कामांची गुणवत्ता आणि स्थानिक पातळीवरील उपलब्ध साधनसामग्री यापेक्षा काही ठरावीक तांत्रिक व आर्थिक निकषांना अधिक महत्त्व दिले जात असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.

पाच लाखांची अनामत आणि मशीनची सक्ती वादाच्या केंद्रस्थानी

निविदेसाठी पाच लाख रुपयांची अनामत रक्कम निश्चित करणे तसेच रोटरी मशीनची सक्ती करणे हेही वादाचे प्रमुख मुद्दे बनले आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील भूगर्भीय रचना, जमिनीचा प्रकार आणि कामाचे स्वरूप वेगवेगळे असताना एकाच प्रकारच्या यंत्रसामग्रीचा आग्रह धरणे तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याचे कंत्राटदारांचे म्हणणे आहे. याशिवाय सर्व जिल्ह्यांसाठी एकच मॉडेल अंदाजपत्रक वापरण्याऐवजी स्थानिक परिस्थितीनुसार स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली आहे.

मोठ्या एजन्सींनाच संधी देण्याचा आरोप

या निविदा प्रक्रियेसोबतच ६ नोव्हेंबर २०२६ रोजी पाणीपुरवठा विभाग, मंत्रालय मुंबई यांनी जारी केलेल्या शासन परिपत्रकालाही याचिकेत आव्हान देण्यात आल्याची माहिती आहे. सदर निविदा आणि परिपत्रक मोठ्या आर्थिक क्षमता असलेल्या एजन्सींना केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आल्याचा आरोप कंत्राटदारांनी केला आहे. सध्याचे निकष कायम राहिल्यास स्थानिक पातळीवर वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटदारांना पुढील पाच वर्षे कामापासून वंचित राहावे लागू शकते, अशी भीतीही याचिकेत व्यक्त करण्यात आली आहे.

जिल्हास्तरावरील नियोजनाला प्राधान्य द्या

कंत्राटदारांनी निविदा प्रक्रियेत बदल करण्याची मागणी केली आहे. जिल्हास्तरावर मंजूर झालेल्या आराखड्यानुसार कामांच्या निविदा काढण्यात याव्यात. कंत्राटदारांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव, यापूर्वी पूर्ण केलेल्या कामांची संख्या आणि कामाचा दर्जा यांचा विचार करण्यात यावा. अनामत रक्कम आणि आर्थिक उलाढालीचे प्रमाणपत्र नियमानुसार निश्चित करावे. प्रत्येक जिल्ह्याची भौगोलिक व तांत्रिक परिस्थिती लक्षात घेऊन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करावीत, तसेच स्थानिक अनुभवी कंत्राटदारांना समान संधी द्यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

आता न्यायालयीन निर्णयाकडे नजरा- भूजल संवर्धनासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील कामांच्या निविदा प्रक्रियेवरून निर्माण झालेला हा वाद आता न्यायालयाच्या दारात पोहोचला आहे. राज्यातील सुमारे ९० टक्के कंत्राटदारांनी एकत्र येत न्यायालयीन लढाईचा मार्ग स्वीकारल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. २५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या प्रथम सुनावणीत न्यायालय काय भूमिका घेते, निविदा प्रक्रियेतील आक्षेपांवर काय निरीक्षण नोंदवते आणि पुढील कार्यवाहीला कोणती दिशा मिळते, याकडे संपूर्ण भूजल कंत्राटदार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. जलसंधारणाच्या कामांना गती देताना स्थानिक अनुभवी कंत्राटदारांना डावलले जाणार का, की निविदा प्रक्रियेत बदल होणार, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे

ॲड. निलेश हेलोंडे उद्या वर्धा जिल्हा दौऱ्यावर

सुकळी व मदन तलाव सिंचन प्रकल्पांना देणार भेट; चारा लागवडीच्या कामाचा घेणार आढावा



वर्धा जनमाध्यम : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ?ड. निलेश सुधाकरराव केशवराव हेलोंडे पाटील उद्या, २५ नोव्हेंबर रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते वर्धा आणि सेलू तालुक्यातील तलावांच्या गाळपेर क्षेत्राची पाहणी करून चारा लागवडीच्या कामाचा आढावा घेणार आहेत. दौऱ्यादरम्यान दुपारी १.४५ वाजता त्यांचे वर्धा येथील विश्राम भवनात आगमन होईल. त्यानंतर दुपारी २.१५ वाजता वर्धातील सुकळी तलाव सिंचन प्रकल्पाच्या गाळपेर क्षेत्राला भेट देऊन चारा लागवडीची पाहणी करतील. दुपारी ३.१५ वाजता सेलू तालुक्यातील मदन तलाव सिंचन प्रकल्पाच्या गाळपेर क्षेत्राला भेट देऊन तेथील चारा लागवडीच्या कामाची पाहणी करणार आहेत. तलावांमधील गाळपेर क्षेत्राचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने या पाहणी दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. पाहणीनंतर ते सोयीनुसार काटोलकडे प्रयाण करतील. .

शेताच्या धुऱ्याच्या वादातून मोठ्या भावाने कुऱ्हाडीने केला हल्ला

पुलगाव जनमाध्यम - शेताच्या धुऱ्यावरून सुरू असलेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. लहान भाऊ शेतात जेवण करीत असताना मोठ्या भावाने तेथे येऊन शिवीगाळ केली. त्यानंतर कुऱ्हाडीच्या दांड्याने उजव्या हाताच्या मनगटावर वार करून त्याला जखमी केले. ही घटना २२ नोव्हेंबर रोजी दुपारी पुलगाव परिसरातील सावळा शिवारात घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी वाल्मीक विठोबाजी नहावी (रा. एकांबा, ता. देवळी) यांची दोन एकर शेती असून ते स्वतः शेती करतात. त्यांच्या शेजारीच त्यांचे मोठे भाऊ मारोती विठोबाजी नहावी यांची शेती आहे. धुऱ्याच्या कारणावरून दोघांमध्ये यापूर्वीही वाद होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

घटनेच्या दिवशी वाल्मीक हे शेतातील ओलीताचे काम आटोपून पळसाच्या झाडाखाली जेवणासाठी बसले होते. त्यावेळी मोठा भाऊ मारोती तेथे आला. त्याने कारण नसताना बडबड सुरू केली. वाल्मीक यांनी त्याला येथून निघून जाण्यास सांगितले असता त्याने शिवीगाळ केली. त्यानंतर जवळ असलेल्या कुऱ्हाडीच्या दांड्याने वाल्मीक यांच्या उजव्या हाताच्या मनगटावर मारून त्यांना जखमी केले.आरडाओरड ऐकून पत्नी देवीबाई आणि शेतात काम करणारे रोशन उजाला घटनास्थळी धावले. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेला. जखमी वाल्मीक यांनी पुलगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथे धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी मारोती नहावी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

न्याय-हक्क ट्रॅक्टर मोर्चा

रोहित पवारांना पक्षातून पहिला पाठिंबा



मुंबई/प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष सध्या वेगवेगळ्या कारणांमुळं चर्चेत आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांना सध्या ब्रेक लागला आहे. मात्र, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या एनडीएमधील समावेशाच्या चर्चा सुरुच आहेत. मोदी सरकारच्या डीलिमिटेशन विधेयकाला शरद पवारांची राष्ट्रवादी पाठिंबा देण्याची भूमिका घेऊ शकते यामुळं पक्ष चर्चेत असतानाच पक्षाचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवारांच्या 'न्याय-हक्क ट्रॅक्टर मोर्चा' मध्ये विदर्भातील नेत्यांना सहभागी होऊ नये अशा सूचना प्रदेश पातळीवरुन दिल्या गेल्याची सूत्रांची माहिती आहे. यामुळे रोहित पवारांच्या मोर्चाची रसद पक्षातूनच रोखण्यात आल्याची चर्चा सुरु होती. मात्र, वर्ध्याचे खासदार अमर काळे यांनी रोहित पवार यांच्या मोर्चा संदर्भात केलेली पोस्ट चर्चेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात एकीकडे विदर्भातील नेत्यांना 'ट्रॅक्टर रॅली'त सहभागी न होण्याच्या प्रदेश पातळीवरून सूचना असताना दुसरीकडे खासदार अमर काळे यांचा मात्र वेगळा सूर पाहायला मिळतोय. खासदार अमर काळे यांनी ट्विट केलं आहे. रोहित पवारांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांसाठी होणारा मोर्चा महत्त्वाचा ठरणार असल्याचं म्हटलं आहे. अमर काळे यांच्या पोस्टमधून ते मोर्चात सहभागी होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यामुळं अमर काळे यांचं ट्विट महत्त्वाचं मानलं जातंय. शेतकरी आणि शेतमजुरांच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार मा. श्री. रोहितदादा पवार यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात येणाऱ्या 'न्याय-हक्क ट्रॅक्टर मोर्चा'च्या नियोजन बैठकीस नागपूर येथे उपस्थित राहिलो.येत्या ४ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथून सुरू होणारा हा मोर्चा ९ डिसेंबर रोजी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळावर धडकणार आहे. विदर्भातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या विविध समस्या, वाढत्या आत्महत्या, प्रलंबित कर्जमाफी, पीकविमा भरपाई दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत आणि शेतीमालाला योग्य हमीभाव अशा महत्त्वपूर्ण प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शेतकरी, शेतमजुरांच्या हक्कासाठी,त्यांच्या न्यायासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा अधिक बुलंद करूया! शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विदर्भातील जिल्हाध्यक्ष आणि शहराध्यक्ष यांना रोहित पवारांच्या आंदोलनात सहभागी न होण्याच्या पक्षातील वरिष्ठ नेत्याकडून सूचना दिल्या गेल्याची माहिती एबीपी माझाला विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली होती. रोहित पवारांनी नागपूरमध्ये विदर्भातील पक्षाच्या शहराध्यक्ष ग्रामीण आणि शहरी जिल्हाध्यक्ष यांची रविवारी बैठक घेतली होती. रोहित पवारांची बैठक पार पडल्यानंतर पक्षाच्या वरिष्ठ नेत्याकडून जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्षांना सूचना दिल्या गेल्या होत्या. प्रदेश कार्यालयातून ज्या सूचना देण्यात येतील होतील, त्याच पाळण्याच्या सूचना तसेच रोहित पवारांच्या कोणत्याही चळवळीत सहभागी न होण्याच्या सूचना दिल्या गेल्या होत्या.

मेळघाटातील जलविद्युत प्रकल्पाला केंद्र सरकारच्या समितीसमोर आदिवासींचा विरोध



अमरावती/प्रतिनिधी- मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील प्रस्तावित अदानी समूहाच्या आडनदी उदंचन जलविद्युत प्रकल्पाला विरोधाची धार तीव्र झाली असून केंद्राच्या व्यवस्थापन परिणामकारकता मूल्यांकन समितीसमोर कामापूर गावातील आदिवासी युवकांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवला. जंगलात वनविभागाच्या परवानगीशिवाय साधा खड्डा खोदता येत नाही. एखादा रस्ता तयार करण्यासाठी वर्षानुवर्षे परवानगी मिळत नाही. मात्र, प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाचे काम सुरू झाले असताना त्याची स्थानिक लोकांना पुरेशी माहिती देखील मिळत नाही, असे या युवकांनी सांगितले. मेळघाटातील वाघांचे संरक्षण, वन्यजीवांचा अधिवास, जंगलातील परिस्थिती, प्रशासकीय यंत्रणेची कार्यपद्धती, स्थानिक आदिवासींचा सहभाग अशा विविध मुद्यांवर आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारची व्यवस्थापन परिणामकारकता मूल्यांकन समिती मेळघाटच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आहे. ही समिती आदिवासी समूदायाचे प्रश्न, रोजगाराच्या संधी, गावांच्या पुनर्वसनाच्या मुद्यावर देखील चर्चा करीत आहे. राजू श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखालील या तीन सदस्यीय समितीत अजय नाईक आणि समीर कुमार सिन्हा यांचा समावेश आहे.

वन्यजीवांच्या अधिवासाला धोका-

प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होणार असून जैवविविधतेला आणि वन्यजीवांच्या अधिवासाला धोका निर्माण होण्याची भीती स्थानिक आदिवासी युवकांनी समितीसमोर व्यक्त केली. मेळघाटच्या जंगलात अशा प्रकारचे प्रकल्प उभारले जाऊ नयेत, अशी मागणी युवकांनी समितीचे अध्यक्ष राजू श्रीवास्तव यांच्याकडे केली. या मुद्यांची नोंद घेण्याची सूचना समितीने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. समितीने वैराट च्या जंगलाची पाहणी केली. या भागातील कुरणावर उपलब्ध असलेले गवत तृणभक्षक वन्यप्राण्यांच्या अधिवासासाठी उपयुक्त ठरले आहे. त्यामुळे तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढली आहे. संतुलित अन्नसाखळीसाठी हे महत्वाचे मानले जात आहे. या अनुषंगाने समितीने वैराट परिसरातील गवताळ क्षेत्र आणि वन्यजीवांच्या अधिवासाची पाहणी केली. जंगलातील गस्त, संपर्क व्यवस्थेची माहिती देखील समितीने जाणून घेतली.

वन अधिकाऱ्यांची उपस्थिती-

केंद्राच्या या समितीने कोलकास, सेमाडोह, आमझरी, चिखलदरा, वैराट आणि कोकटू यांसह मेळघाटातील विविध ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली. या संपूर्ण दौऱ्यात मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे वनस संरक्षक तथा क्षेत्र संचालक चंद्रशेखरन बाला आणि गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा येथील उपवनसंरक्षक यशवंत बहाळे हे उपस्थित होते. वनविभागाच्या स्थानिक यंत्रणेच्या माध्यमातून विविध ठिकाणांची माहिती आणि तेथील कामकाजाची वस्तुस्थिती समिती समोर मांडण्यात आली.

राज्य सरकार आर्थिक ताण निवळण्यास सक्षम-महसूलमंत्री बावनकुळे

नागपूर/प्रतिनिधी- लाडकी बहीण योजनेबाबत मंत्री नरहरी झिरवळ यांनी 'धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय' अशी अवस्था झाली असल्याची कबुली दिली आहे. या योजनेमुळे सद्यस्थितीत सरकारची कसरत सुरु असल्याचेही त्यांनी नमुद केले होते. त्यामुळे या योजनेबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता झाली. त्यातच आता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या योजनेबाबत नागपुरात प्रसारमाध्यमांना उपयुक्त माहिती दिली. सोमवारी नागपूरला लागून असलेल्या कोराडी येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रसारमाध्यमांसोबत बोलत होते. यावेळी मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या वक्तव्याकडे त्यांचे लक्ष वेधन्यात आले. बावनकुळे म्हणाले, राज्यावर आर्थिक ताण निर्माण होईल, अशी परिस्थिती येते; मात्र राज्य सरकार हा ताण निवळण्यास सक्षम आहे. यंदा दुष्काळी परिस्थिती असली, तरी पुढील वर्षी त्यातून मार्ग काढला जाईल. लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. उलट ही योजना अधिक मजबूत करण्याचे काम सरकार करेल, अशी ग्वाही बावनकुळे यांनी दिली. दुष्काळी परिस्थितीत बोअरवेल आणि टँकरसाठी नागरिकांकडून जादा पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. १५ डिसेंबरपर्यंत बोअरवेल खोदण्यावरील बंदी उठविण्यात आली असताना काही बोअरवेल व्यावसायिक ७० हजार रुपयांच्या कामासाठी एक लाख २० हजार रुपये मागत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून, बोअरवेलचे दर ७० हजार रुपयांच्या पुढे जाऊ नयेत, असे स्पष्ट केले आहे. टँकरचालकांनीही नागरिकांकडून अवाजवी पैसे आकारू नयेत. अशा तक्रारींची दखल घेऊन कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.



रोहित पवारांनी चर्चेसाठी यावे; सरकारची दालने खुली

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रोहित पवार यांनी ट्रॅक्टर मोर्चा काढण्यापेक्षा सरकारशी चर्चा करावी. दुष्काळ निवारण समितीचा अध्यक्ष या नात्याने माझे दालन त्यांच्यासाठी खुले आहे. येत्या बुधवारी यासंदर्भात बैठकही आहे. त्यांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास आणि शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सकारात्मक निर्णय घेण्यास सरकार तयार आहे. सरकारने चर्चा करण्याची तयारी दाखवली असताना चर्चा न करता मोर्चा काढणे योग्य नाही. सरकारने प्रश्न ऐकले नाहीत किंवा मदत केली नाही, तर मोर्चा काढण्याचा त्यांना अधिकार आहे. मात्र, केवळ राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी मोर्चे काढण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करावी, असे आवाहन त्यांनी केले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याबाबत संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवर बोलताना बावनकुळे म्हणाले की, आरोपांमध्ये तथ्य असेल तर संबंधितांनी सरकारला किंवा मुख्यमंत्र्यांना लेखी पत्र द्यावे. सरकार निश्चितपणे चौकशी करेल. मात्र, कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय विधिमंडळाच्या अध्यक्षांसारख्या प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वाची वारंवार बदनामी करणे योग्य नाही. कायद्याच्या प्रक्रियेनुसार काही परिस्थितीत आदिवासींच्या जमिनींचे गैरआदिवासींकडे हस्तांतरण होऊ शकते. मात्र, राहुल नार्वेकर यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांशी मी सहमत नाही. त्यांच्याबाबत माझा विश्वास आहे. त्यामुळे आरोप करण्याऐवजी लेखी तक्रार द्यावी, असे त्यांनी सांगितले.

पेन्शनधारकांचा केंद्र सरकारविरोधात एल्गार!

■ २५ नोव्हेंबरला दिल्लीत देशव्यापी धरणे ■ आठव्या वेतन आयोगासह ११ मागण्यांसाठी आंदोलन

नागपूर/प्रतिनिधी- निवृत्तीनंतर सन्मानाने जगण्याचा अधिकार, पेन्शनमधील समानता आणि वैद्यकीय सुविधांची हमीष्ठ अशा विविध मागण्यांसाठी देशभरातील पेन्शनधारक आता केंद्र सरकारविरोधात रस्त्यावर उतरणार आहेत. निवेदने, लक्षवेधी दिन आणि राज्यांच्या राजधान्यांमधील तीन दिवसीय आंदोलन करूनही सरकारकडून प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. त्यामुळे २५ नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीतील ईस्टर्न कोर्ट येथे देशव्यापी धरणे आयोजित करण्यात आले आहे. आठव्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेपासून ते जुनी पेन्शन योजना लागू करण्यापर्यंतच्या मागण्यांवर या आंदोलनातून सरकारचे लक्ष वेधले जाणार आहे. फोरम ऑफ सिव्हिल पेन्शनर्स असोसिएशन्स (एफसीपीए) आणि नॅशनल को-ऑर्डिनेशन कमिटी ऑफ पेन्शनर्स असोसिएशन्स (एनसीसीपीए) या संघटनांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने 'व्हॅलिडेशन ऑफ पेन्शन रूल्स कायदा २०२५' स्वीकारल्यामुळे पेन्शनच्या मूलभूत तत्त्वालाच धक्का बसल्याचा संघटनांचा दावा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या डी. एस. नकारा प्रकरणातील निर्णयाच्या तत्त्वांनाही या



कायद्यामुळे आव्हान निर्माण होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.आठव्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेत २०२६ पूर्वी निवृत्त झालेल्या पेन्शनधारकांना पेन्शनच्या पुनर्निश्चितीचा लाभ मिळण्याबाबत स्पष्ट तरतूद नसल्याचा संघटनांचा आक्षेप आहे. त्यामुळे आधी निवृत्त झालेले आणि नंतर निवृत्त होणारे कर्मचारी यांच्यात भेदभाव होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन पुनर्निश्चितीचा लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात येत आहे.संघटनांनी पंतप्रधान आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांना निवेदन देऊन एकूण ११ मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये २०२५ चा पेन्शन नियम वैधता कायदा रद्द करणे, जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे, आठव्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेत बदल करणे आणि वेतन व पेन्शनमध्ये ५० टक्के महागाई भत्ता विलीन करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय बीएसएनएल आणि एमटीएनएलमध्ये सामावून घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा, बँक पेन्शनमध्ये बदल, स्वायत्त संस्थांमधील कर्मचाऱ्यांचा आठव्या वेतन आयोगात समावेश, अंतरिम आर्थिक दिलासा आणि कम्युटेशनची कपात १० वर्षे आठ महिन्यांनंतर बंद करून पूर्ण पेन्शन पूर्ववत करण्याची मागणी आहे. पेन्शनधारकांना सक्षम वैद्यकीय सुविधा देण्यासाठी केंद्रीय सरकारी आरोग्य योजना अधिक प्रभावी करण्याबरोबरच पेन्शनमधील समानताही सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी १९ ऑगस्ट २०२६ रोजी देशभरात लक्षवेधी दिन पाळण्यात आला. त्यानंतर १७ ते १९ सप्टेंबरदरम्यान विविध राज्यांच्या राजधान्यांमध्ये सलग तीन दिवस धरणे देण्यात आले. मात्र, त्यानंतरही सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.२५ नोव्हेंबरच्या धरण्यात देशभरातील हजारो पेन्शनधारक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. खासदार, केंद्रीय कामगार संघटनांचे नेते, केंद्रीय सरकारी कर्मचारी व कामगार संघटनांचे प्रतिनिधी तसेच दोन्ही पेन्शनधारक संघटनांचे पदाधिकारी आंदोलनाला संबोधित करणार आहेत. वृद्धापकाळ, विविध आजार आणि दिल्लीतील वायुप्रदूषणाचा सामना करूनही पेन्शनधारक आंदोलनात सहभागी होणार असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष सुरूच ठेवल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. 'पेन्शन हा दानधर्म नसून पुढे ढकललेल्या वेतनाचा हक्क आहे. तो सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे,' अशी भूमिका संघटनांनी मांडली आहे.

राज्य नाट्य स्पर्धेचा बिगूल वाजला

अमरावती येथे प्राथमिक फेरीला प्रारंभ

अमरावती/प्रतिनिधीः- सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेच्या अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीचे उदघाटान अॅड. मिलिंद जोशी प्रमुख कार्यवाह, अमरावती नाट्य परिषद, डॉ. भोजराज चौधरी, संचालक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, प्रादर्शिक कला विभाग आणि तिन्ही मान्यवर परीक्षांचे प्रमुख उपस्थितीत आज (दि.२३) संपन्न झाला. नटराज पूजन आणि दीप प्रज्वलन झाल्यानंतर एम. टी. नाना देशमुख, तात्या सांगेकर, प्रदीप प्रेमलवार आणि रोहिणी डोरले यांनी ग्रंथ - पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड.राजेंद्र पांडे यांनी केले.उद्घाटनाच्या घोषणे नंतर दीपिका भुंबर लिखित व दिग्दर्शित विलंब नाटक सादर झाले.



श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह पंचवटी चौक अमरावती येथे दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ पासून या स्पर्धेला प्रारंभ झाला असून, दररोज सायंकाळी ७ वाजता नाटकांचे प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे अमरावती व परिसरातील नाट्यरसिकांना दिवाळीनंतर दर्जेदार नाट्यप्रयोगांची मेजवानी अनुभवता येणार आहे.महाराष्ट्राला समृद्ध नाट्यपरंपरेचा वारसा लाभला आहे. या परंपरेचे जतन व संवर्धन करण्याबरोबरच हौशी कलाकारांना आपल्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत दरवर्षी राज्य नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेच्या माध्यमातून विविध नाट्यसंस्थांमधील कलाकार, दिग्दर्शक, लेखक आणि तंत्रज्ञ यांना आपली कलाकृती सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होते.राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या नियोजनानुसार या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

अमरावती आदी भागांतील एकूण २२ नाट्यसंस्था या केंद्रावरील प्राथमिक फेरीत सहभागी होणार आहे.यंदाच्या स्पर्धेत विविध विषयांवरील नाटके सादर होणार असल्याने प्रेक्षकांना वेगवेगळ्या आशयांचे आणि नाट्यशैलींचे दर्शन घडणार आहे. स्पर्धेच्या निमित्ताने सहभागी नाट्यसंस्थांमध्ये कलात्मक चुरस पाहायला मिळणार असून, कलाकारांच्या मेहनतीचा आणि सर्जनशीलतेचा अनुभव नाट्यरसिकांना घेता येणार आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह पंचवटी चौक अमरावती येथे होणाऱ्या या स्पर्धेतील नाट्यप्रयोगांना नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हौशी कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे. अमरावतीकर रसिकांनी जास्तीत जास्त संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन समन्वयक विशाल फाटे यांनी केले आहे.

नेपाळशिवाय आपले धाम आणि राम अपूर्ण: PM मोदा

१५,००० कोटी रुपयांची मदत दिली

नवी दिल्ली- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी नेपाळसोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी १५,००० कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली. बालेन शाह यांच्या पहिल्या भारत दौऱ्याला दोन्ही देशांमधील घनिष्ठ मैत्रीचे प्रतीक संबोधताना, मोदींनी दोन्ही देशांचा सामायिक इतिहास, संस्कृती आणि श्रद्धा यांचा उल्लेख केला. ते म्हणाले की, प्रभू राम आणि माता सीता हे भारत आणि नेपाळच्या सामायिक संस्कृतीचे प्रतीक आहेत. २०१८ मधील आपल्या जनकपूर भेटीची आठवण करून देताना मोदी म्हणाले की, नेपाळशिवाय आपली पवित्र स्थळे अपूर्ण आहेत आणि नेपाळशिवाय आपले रामदेखील अपूर्ण आहेत. दरम्यान, नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी दोन्ही देशांमधील संबंध नव्या उंचीवर नेण्याबद्दल भाष्य केले. त्यांनी भारतीय गुंतवणूकदारांना नेपाळमध्ये गुंतवणूक करण्यासाठी स्वागत केले. नेपाळचे पंतप्रधान सोमवारी सकाळी राष्ट्रपती भवनात दाखल झाले आणि पंतप्रधान मोदींनी आलिंगन देऊन त्यांचे स्वागत केले. नेपाळी पंतप्रधान बालेन शाह राष्ट्रपती भवनात भारतीय शिष्टमंडळाला भेटले.पंतप्रधान मोदी यांनी हैदराबाद हाऊस येथे नेपाळी पंतप्रधान बालेन शाह यांची भेट घेतली. पंतप्रधान बालेन शाह यांनी दिल्लीतील राजघाट येथे महात्मा गांधींना आदरांजली वाहिली.



माथेफिरूने पोलीस ठाण्यात अचानक काढला चाकू अन् पोलिसांवरच केले सपासप वार; ५ पोलीस जखमी, तिघांची प्रकृती चिंताजनक

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिल्लीतील जामा मशीद पोलीस ठाण्यात सोमवारी दुपारी २ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास चौकशीदरम्यान एका तरुणाने चाकूने हल्ला करून ५ पोलीस कर्मचाऱ्यांना जखमी केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. नबील (वय २५) असे या आरोपीचे नाव असून, कौटुंबिक वादातून तो आपल्या आई आणि बहिणीला त्रास देत असल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली होती. याच तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी त्याला पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते. मात्र, चौकशी सुरू असतानाच नबीलने अचानक आपल्याकडील चाकू काढून तेथे कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवरच सपासप वार केले.

आरोपी नबीलने केलेल्या या अनपेक्षित हल्ल्यात ५ पोलीस कर्मचारी जखमी झाले असून, त्याने पोलिसांच्या चेहऱ्यावर आणि मानेवर गंभीर वार केल्याची माहिती समोर आली आहे. जखमी झालेल्या ५ कर्मचाऱ्यांपैकी ३ पोलिसांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील तातडीच्या उपचारांसाठी विशेष रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर अन्य २ जखमी पोलिसांवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलीस ठाण्यात हल्ला केल्यानंतर आरोपी नबील घटनास्थळावरून पसार झाला आणि पळून जाण्यासाठी त्याने एका दुचाकीस्वाराची गाडी चोरल्याचा आरोप आहे. या धक्कादायक घटनेनंतर दिल्लीच्या मध्य जिल्ह्याच्या ऑपरेशन्स युनिटच्या पथकाने तातडीने त्याचा शोध सुरू केला आणि अखेर जवळच्या चितली कबर परिसरात पोलिसांनी त्याचा माग काढत त्याला घेरले.

पुन्हा हल्ला करण्याचा प्रयत्न करताच पोलिसांकडून गोळीबार

चितली कबर परिसरात पोलिसांनी नबीलला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने पुन्हा एकदा पोलिसांवर हल्ला चढवला. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि स्वसंरक्षणार्थ पोलिसांनी गोळीबार केला, ज्यामध्ये आरोपीच्या



दोन्ही पायांना गोळ्या लागल्याने तो जागीच कोसळला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अटकेची कारवाई पूर्ण केली असून जखमी ५ ही पोलीस कर्मचाऱ्यांवर सध्या उपचार सुरू आहेत, असे वृत्त एका वृत्तसंस्थेने दिले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम

आंतरराष्ट्रीय व्यापारयुद्धाचे मळभ, आखाती युद्धाचा भडका उडाल्यानंतर विक्रमी स्तरावर गेलेले कच्च्या तेलाचे भाव, ऊर्जा सुरक्षेची वाढती चिंता आणि विदेशी गुंतवणूकदारांनी फिरवलेली पाठ यामुळे गेल्या काही महिन्यांपासून भारतीय शेअर बाजारावर निराशेचे सावट पसरले होते. निफ्टी ५० या निर्देशांकाने ५ जानेवारी २०२६ रोजी २६,३७३.२० अंकांची पातळी गाठली होती. हा निफ्टीचा आजवरचा सर्वोच्च स्तर आहे; मात्र फेब्रुवारीच्या अखेरीस इराणयुद्ध सुरू झाले आणि बाजाराचा नूरच पालटला. जानेवारीच्या शिखरावरून घसरण होत ऑक्टोबरमध्ये निफ्टीने २२,१७९.९० अंकांचा नीचांक गाठला. तब्बल ४,१९३.३० अंकांची म्हणजेच १५.९० टक्क्यांची ही घसरण गुंतवणूकदारांना चिंतेच्या गर्तेत ढकलणारी ठरली. या काळात सेन्सेक्सही तब्बल १४,५६५.७८ अंकांनी म्हणजेच १६.९० टक्क्यांनी घसरला. बँक निफ्टीमध्ये सुमारे १०,१४५.१५ अंकांची घसरण झाली; मात्र नोव्हेंबर महिन्यातील अवघ्या १२ सत्रांमध्ये भारतीय बाजाराने अभूतपूर्व उसळी घेतली आणि गुंतवणूकदारांमध्ये चैतन्य सळसळले. शेअर बाजारामध्ये तेजी आणि घसरणीचा सिलसिला सतत सुरूच असतो; पण सातत्याने होणारी घसरण अर्थव्यवस्थेतील मंदीशी जोडून पाहिली जाते. तशा चर्चा सुरू झाल्या की, गुंतवणूकदार अधिक सावध होऊन आपली गुंतवणूक काढून घेण्याचा सपाटा लावतात. पर्यायाने घसरणीला चालना मिळते. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांचे निकाल लागले आणि परिस्थिती पूर्णतः पालटली. आखाततील संघर्ष निवळू लागला. कच्च्या तेलाच्या दरात मोठी घसरण झाली. इराणने भारतासह चार देशांना होर्मुझमधून तेल वाहतुकीस परवानगी दिली. जागतिक अस्थिरतेतही भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड कायम असल्याचे स्पष्ट झाले. कंपन्यांचे तिमाही निकाल सकारात्मक धक्का देणारे आले. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे आठ-नऊ महिन्यांपासून विक्रीचा तुफानी मारा करणाऱ्या विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात अब्जावधी डॉलर्स अक्षरशः ओतले. जानेवारी ते ऑक्टोबर या काळात परदेशी गुंतवणूकदारांनी सुमारे २.९५ लाख कोटी रुपयांची निव्वळ विक्री केली होती. नोव्हेंबरच्या केवळ तीन आठवड्यांत विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात तब्बल १ लाख ११ हजार ९५० कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीने भारतीय बाजाराचे सर्व निर्देशांक रॉकेट वेगाने उर्ध्वदिशेने जाताना दिसले. विशेषतः खासगी आणि सरकारी बँकांच्या समभागांमध्ये तुफानी खरेदी झाल्याने बँकिंग क्षेत्राचा निर्देशांक नव्या सार्वकालिक उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित समभागांची चमक फिकी पडत असताना आणि अमेरिकन बाजार कोसळत असताना भारतीय भांडवली बाजाराने घेतलेली ऐतिहासिक झेप अधिक महत्त्वाची आहे. गेल्या दहा वर्षांच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास ज्या-ज्या वेळी भारतीय बाजाराने सलग दोन वर्षे सुमार कामगिरी केली, त्यानंतरच्या वर्षात आशियाई बाजारांच्या तुलनेत तब्बल ३८ टक्के अंकांची सरशी साधली आहे. यावेळीही विदेशी गुंतवणूकदारांची भारतीय बाजारातील हिस्सेदारी दशकातील नीचांकी पातळीवर आली होती; परंतु केंद्र सरकारच्या सातत्यपूर्ण आर्थिक सुधारणांमुळे आणि अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या निर्णयांमुळे विदेशी गुंतवणूकदारांना आपली धोरणे बदलून भारतात गुंतवणूक वाढवणे भाग पडले आहे. जागतिक स्तरावर एआय तंत्रज्ञानातील भांडवली खर्चाचा वेग मंदावण्याची चिन्हे दिसू लागल्याने गुंतवणूकदार या समभागांमधून पैसा काढून सुरक्षित आणि शाश्वत वाढीच्या बाजारपेठा शोधत आहेत. अशा वेळी भारत हा सर्वोत्तम पर्याय ठरला आहे. मोठे गुंतवणूकदार आणि संस्था कोणत्याही देशाच्या भांडवली बाजारात आर्थिक गुंतवणूक करताना तेथील सरकारी धोरणे, अर्थव्यवस्थेचे वर्तमान आणि भविष्य, सामाजिक स्थिती या सर्वांचा विचार प्राधान्याने करतात. जागतिक स्तरावर मंदीचे सावट असताना भारताचा जीडीपी दर २०२६ मध्ये ७.९ टक्के, तर २०२७ मध्ये ७.२ टक्के राहण्याचा अंदाज जवळपास सर्वच वित्तीय संस्थांनी वर्तवला आहे. भारतीय कंपन्यांनी सलग पाच तिमाहींत बाजारपेठेच्या अंदाजापेक्षा सरस कामगिरी करत १४ ते १५ टक्के नफावाढीची दिशा स्पष्ट केली आहे. सरकारने देशांतर्गत उत्पादनाला दिलेली चालना, पायाभूत सुविधांवरील विक्रमी खर्च आणि निर्यातवृद्धीसाठी उचललेली पावले यामुळे देशाची व्यापार तूट नियंत्रणात राहण्यास मदत झाली आहे. परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी अर्थ मंत्रालय आणि भांडवली बाजार नियामक 'सेबी'ने अतिशय महत्त्वाची पावले उचलली आहेत. आगामी अर्थसंकल्पात दीर्घकालीन भांडवली नफा कर अर्थात 'एलटीसीजी' आणि सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स म्हणजेच 'एसटीटी' कमी करण्याच्या प्रस्तावांवर गांभीर्याने विचार सुरू आहे. कर प्रणाली सुटसुटीत होण्याच्या या संकेतांमुळे विदेशी गुंतवणूकदारांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. देशातील समभाग बाजाराचे एकूण बाजार भांडवल आता ५ ट्रिलियन डॉलरच्या ऐतिहासिक टप्प्यापार पोहोचले आहे. भारतीय कंपन्या आता पारंपरिक बँक कर्जावर अवलंबून न राहता दरवर्षी समभाग आणि रोखे बाजारातून सुमारे १० लाख कोटी रुपयांचे भांडवल उभारत आहेत. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत २३५ कंपन्यांनी आयपीओमधून १.५ लाख कोटी रुपये जमा केले. डिसेंबर महिन्यात आणखी २५ हजार कोटी रुपयांचे आयपीओ बाजारात येणार आहेत. याशिवाय, कॉर्पोरेट रोखे बाजाराचा आकार ६२ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेला असून, पर्यायी गुंतवणूक निधीमध्ये १८ लाख कोटी रुपयांची भांडवली बांधिलकी दिसून येत आहे. सध्याच्या तेजीचे सारथ्य भारतीय बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राने केले आहे. भारतीय बँकांची कर्जवाढ १८ ते १९ टक्क्यांच्या भक्कम दराने सुरू असून, बुडीत कर्जांचे प्रमाण कमी झाल्याने बँकांच्या नफ्यात मोठी वाढ झाली आहे. आकर्षक मूल्यांकन आणि भक्कम आर्थिक स्थितीमुळे विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय खासगी बँकांच्या समभागांवर मोठ्या प्रमाणावर विश्वास दाखवला आहे. जागतिक बाजारात तेल, सोने आणि चांदीच्या दरात झालेल्या घसरणीमुळे भारताचे आयात बिल मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. बिगर ओपेक देशांचे वाढते उत्पादन आणि चीनमधील मंदावलेली मागणी यामुळे पुढील वर्षाखेरीस कच्चे तेल प्रतिबॅरेल ७० ते ७८ डॉलरपर्यंत खाली येण्याचा अंदाज आहे. यामुळे महागाई नियंत्रणात राहण्यास आणि कंपन्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. पुढील वर्षाखेरीपर्यंत निफ्टी २९ हजारांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. बाजाराच्या गणितानुसार चढउतार पुढेही होत राहतील. आताच्या तेजीमध्ये अनेक समभागांचे मूल्य आजही वधारलेले नाही, हेही वास्तव आहे. येणाऱ्या काळात फेडरल रिझर्व्हची धोरणे, डॉलरचे मूल्य यांसारख्या अनेक घटना बाजारावर परिणाम करत राहतीलच; पण अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम असल्याने दीर्घकालीन गुंतवणूकदारांना चिंतेचे कारण नाही. येणाऱ्या प्रत्येक आव्हानावर मात करणारे खंबीर नेतृत्व आणि प्रचंड सकारात्मकता असणारी राजकीय इच्छाशक्ती हे भारताचे वर्तमानातील सर्वांत मोठे बलस्थान आहे. प्रतिकूल काळात बाजाराने घेतलेली झेप या बलस्थानाला दिलेली सलामी आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळ मानव निर्मित आहे

दुष्काळ म्हणजे पाऊस कमी पडणे एवढेच नाही. फक्त पाऊस कमी पडला एवढ्यानेच दुष्काळी परिस्थिती निर्माण होत नाही. लोकांना दैनंदिन गरजा भागवायला हातात पैसे नसणे , हलाखी निर्माण होणे हा दुष्काळाचा अर्थ आहे.

पाऊस कमी सगळ्यांसाठीच पडतो, फटका ज्यांच्या कडे क्रयशक्ती कमी आहे, ज्यांची हाता तोंडाशी गाठ आहे, ज्याना फक्त शेती, मजुरी ह्यांच्यावरच अवलंबून रहावे लागते त्यांच्या साठी पाऊस कमी पडला तर दुष्काळ येतो. धान्याचा साठा करून ठेवलेल्या व्यापाऱ्यांना, दुष्काळी कामे करणाऱ्या ठेकेदाराला, विविध प्रकल्पांना मजुरी पुरविणाऱ्या ठेकेदाराला दुष्काळ ही कमावण्याची संधी असते. पाऊस नैसर्गिक कारणाने कमी पडला असला तरी त्याचे परिणाम विशिष्ट राजकीय आर्थिक व्यवस्थेने ठरविले असतात. म्हणून दुष्काळ मानव निर्मितच असतो.

महाराष्ट्रात ११३ मोठे सिंचन प्रकल्प आहेत. साधारण ३५० मध्यम प्रकल्प तर जवळ जवळ २५०० माइनर म्हणजे लघू सिंचन प्रकल्प आहेत. स्थानिक पातळी नावाची एक पातळी असते त्यात १,१५,००० प्रकल्प आहेत. भारतातील मोठ्या धरणापैकी ४२ टक्के धरणे महाराष्ट्रात आहेत. एवढे असून एकीकडे महाराष्ट्र कोरडा आहे तर दुसरीकडे महाराष्ट्र सरकारचे वॉटर ऑडिट महाराष्ट्रात सरप्लस पाणी दाखविते. सरकार कडे पाण्याचा हिशेबच नाहिये. २०२४-२५ चा आर्थिक पाहणी अहवाल म्हणतो की स्थानिक स्तरावर २० लक्ष हेक्टर सिंचन क्षमता तयार झाली आहे पण वापर फक्त ९ लक्ष हेक्टर होतोय. दोन्ही आकडे कुठून आले माहीत नाही. एक्चुअल किती ओलीत केले, शासनात कोणालाही माहीत नाही. धोम बालकवाडी प्रकल्पातील बाष्पीभवन अपेक्षित बाष्पीभवनाच्या १७७ टक्के आहे असे २०२३-२४ चे वॉटर ऑडिट म्हणते! पाण्याचे नियोजन करण्यासाठी हंगामाच्या सुरवातीला प्राइमरी इरिगेशन प्लान प्रकल्प पातळीवर तयार व्हायला हवा. ह्यशेतीला किती पाणी लागणार ह्याचा अंदाज घेऊन पाण्याचे नियोजन करायला हवे. त्यासाठी पाणी वापर संस्था तयार करणे कायद्याने बंधनकारक आहे. पण हे जवळपास होत नाही. सगळा सावळा गोंधळ आहे. विदर्भातील ८० टक्के काम अपूर्ण आहे. दुसरीकडे खर्च वाढतो आहे. हा गोंधळ आपोआप तयार झालेला नाहीये. तो व्हावा आणि वाढत रहावा ह्यात अनेकांचे हित आहे.

दुसरीकडे विदर्भ मराठवाडा इथल्या ग्रामीण भागात शेती शिवाय पोटा पाण्याचा व्यवसाय उरलेला नाही. पुण्यातील अर्धे अधिक ओला उबेर ड्राइवर मराठवाड्यातून काम नाही म्हणून पुण्यात आले आहेत. सरकारचा भर मोठे उद्योग, मोठे इंफ्रास्ट्रक्चर, मोठे प्रकल्प, चौथी मुंबई वगैरे आहेत. पण स्थानिक पातळीवर ग्लैमर नसलेल्या पण रोजगार निर्माण करणाऱ्या सूक्ष्म उद्योगांवर लक्ष नाहीये. मराठवाडा विदर्भातील जिल्हा तालुका पातळीवर स्म् ची परिस्थिती बोलकी आहे. ह्याचे परिणाम पण दिसतात. कोरडवाहू अल्प भूधारकाची तोट्यातील शेती सोडून दुसरे काय करतो म्हणाला तर पर्यायच नाही. इतर कौशल्ये शिकायची म्हंटले तर मागणी नाही. म्हणून कोणी शिकण्याच्या भानगडीत पडत नाही. वर्धाच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या घरातील गळका फ्लश दुरुस्त करायला माणूस मिळत नाही. स्किल्स नाहीत म्हणून संधी नाहीत आणि संधी नाहीत म्हणून स्किल्स नाहीत. असे हे दुष्टचक्र. सांख्यिकी भूगोलात हॉटस्पॉट नावाची संकल्पना आहे. हॉटस्पॉट म्हणजे एखाद्या गोष्टीचे भौगोलिक कॉन्क्रंट्रेशन. उदा. वस्त्रोद्योग विशिष्ट भूभागात भागात एकवटला असणे. भारत सरकारच्या पिरीआडिक लेबर फोर्स सर्व्हे नुसार जिल्ह्यातील रोजगार करणाऱ्या पैकी किती टक्के शेतीत काम करतात ह्याची आकडेवारी मिळते. ह्यातून जी आय एस चा वापर करून शेतीतील रोजगाराचे हॉटस्पॉट काढता



येतात. सोबतच्या चित्रात हे हॉटस्पॉट लाल रंगात दाखविले आहेत. इथे मराठवाडा आणि विदर्भ कृषी वर रोजगार अवलंबून असलेल्या लोकांचे हॉटस्पॉट आहेत हे स्पष्ट दिसते आहे. म्हणून तर एकिकडे मराठा आरक्षणाची मागणी मराठवाड्यात वाढते आहे. तर दुसरीकडे कावड यात्रा सुद्धा निघायला लागल्या आहेत. दोन्हीच्या मागे हताशेची पार्श्वभूमी आहे.

त्यात अजून एक भानगड झाली आहे. देशातील ४२ टक्के लोक अजूनही उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. पण शेतीचा जी डी पी तील टक्का १४ टक्के पेक्षा खाली गेलेला आहे. दुसरीकडे जी डी पो तील सर्वात मोठा वाटा बैंकिंग, फाइनेंस, रियल एस्टेट, इन्शुरन्स चा आहे. जवळ जवळ २७ टक्के. अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात वित्तीयकरण झाले आहे. जी डी पी मधील सर्वात वेगाने वाढणारे हे क्षेत्र आहे. हे क्षेत्र मोठे प्रकल्प, त्याना लागणारी कर्जे आणि वित्तीय सेवा, गृह कर्जे, वाहन कर्जे, विनातारण दिलेली वैयक्तिक कर्जे, शहरांचा विस्तार आणि त्यातून वाढणारे जमिनीचे भाव, घरांच्या वाढत्या किमती इत्यादींची निगडित आहे. जी डी पी वाढीचा दर जास्तीत जास्त असायला हवा ही भांडवली अर्थव्यवस्थेची गरज होऊन बसली आहे. आर्तजव्यवस्था सातत्याने वाढत राहिली तरच भांडवली गुंतवणुकी वरचा नफा सारखा वाढत राहतो. भांडवलदारांचा नफा सारखा वाढता राहील अशी धोरणे आखणे हे त्यांचा राजकीय आणि आर्थिक पाठिंबा मिळविण्यासाठी सत्ताधाऱ्याना सुद्धा गरजेचे होऊन बसते. ह्या चौकटीत कोरडवाहू अल्पभूधारक शेतकरी प्रायोरिटी म्हणून लांबवर कुठेच बसत नाही. फार तर ' संवेदनशील ' सरकारच्या दयेचे पात्र होणे त्याच्या नशिबी असते. जी कामे व्हायला पाहिजेत, म्हणजे सिंचनातील अनागोंदी सुधारणा, स्थानिक पातळीवर सूक्ष्म उद्योगांचा विकास, त्यांना जोडून कौशल्य विकास, सुनियोजित पाण्याचे व्यवस्थापन, ह्यातून ग्लैमरस, चकचकीत विकास होणार नाही, पण लोकांचे जीवन अधिक स्थिर,,अर्थपूर्ण आणि सुखी होईल. पण हे करण्यात रस कोणालाच नाही.

ह्या कंगाल व्यवस्थेत कोणालाच राजकीय किंवा आर्थिक रस नसतो. ही व्यवस्था कोणालाही फार पैसे मिळवून देऊ शकत नाही. जे सत्ताधारी इथे असतात त्याना ह्यातूनच जे पिळून काढता येईल ते काढण्यात रस असतो. वाल्मीक कराड आणि कंपनी सर्वत्र आहेत. संतोष देशमुखांना मारताना मानवी सीमा ओलांडली म्हणून कराड चर्चेत आला. सीमेच्या आत राहून असले उद्योग करणाऱ्या टोळ्या गावा गावात आहेत.

जो पर्यंत थोडीफार पाऊस पडतो तो पर्यंत लोकांचे कसे बसे ढकलून काम होते. पण पाऊस कमी पडला की कंबरडे मोडते म्हणजे मोडतेच. मुळात प्रश्न पाऊस कमी पडतो हा नाहीये. खरा प्रश्न मराठवाडा आणि विदर्भ इतका कंगाल का आहे , लोकांना दुसरा पर्याय का नाही हा आहे. आपण विकासाचे जे विचित्र मॉडल स्वीकारले आहे त्याची नीट चिकित्सा केली, त्या मॉडल मधून निर्माण होणारी, त्या मॉडल ला वाढवणारी राजकीय आर्थिक व्यवस्था समजून घेतली की उत्तर सापडते. प्रश्न सोडवायचा तर भूमिका घ्यायला लागेल.

नीरज हातेकर

कमी पाण्यात, कालावधीत उत्पन्नांसाठी मधुमका फायद्याचा

सध्या महाराष्टात दुष्काळाची स्थिती असून, पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे शेतकऱ्यांसमोर अन्न, जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता यांचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. अशा कठीण परिस्थितीत कमी कालावधीत आणि कमी पाण्यात उत्तम उत्पादन देणारे मधुमका (स्वीट कॉर्न) हे पीक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरू शकते.

पारंपरिक पिकांच्या तुलनेत मधुमका हे हवामानानुसार केवळ ८० ते १०० दिवसांत काढणीस तयार होते. पाण्याची टंचाई असलेल्या भागात कमी ओलाव्यावरही हे पीक सहजतेने घेता येते. या पिकापासून शेतकऱ्यांना तिहेरी लाभ मिळू शकतो.

अन्न सुरक्षा : मानवी आहारासाठी गोड आणि पौष्टिक कणसे मिळतात.

चाऱ्याची सोय : कणसे काढल्यानंतर उरलेला हिरवा चारा जनावरांसाठी अत्यंत सकस आणि दूध उत्पादन वाढवणारा ठरतो.

चांगले उत्पन्न : बाजारात स्वीट कॉर्नला वर्षभर मागणी व बऱ्यापैकी दर असतो. त्यामुळे कमी दिवसांत चांगले उत्पन्न हाती येऊ शकते.

स्वीट कॉर्नचे व्यापारी महत्त्व

मका हे जगातील सर्वाधिक पिकविल्या जाणाऱ्या पिकामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. एक एकरातून सुमारे आठ ते नऊ टन मधुमक्याच्या हिरव्या कणसांचे उत्पादन मिळू शकते. त्याशिवाय कणीस काढल्यानंतर सकस हिरवा चारा जनावरांसाठी उपलब्ध होतो. नावाप्रमाणेच गोड लागणाऱ्या मधुमक्याची कणसे ही भाजून किंवा वाफवून खाता येतात.

पाण्यात थोडेसे मीठ टाकून मधुमक्याची कणसे उकडून खातात किंवा दाणे काढून तेल मीठ लावून व तळून खातात. त्यामुळे या कणसांना पर्यटन स्थळे, मोठमोठे मॉल, मोठी तारांकित हॉटेल्स व अन्न प्रक्रिया उद्योगात नेहमी मागणी असते. या कणसांचे दाणे काढून प्रिझर्व्हेटिव्ह करून हवाबंद डब्यामध्ये पॅक करून निर्यातही केली जाते. सध्या अनेक अन्नप्रक्रिया उद्योग मधुमका लागवडीसाठी शेतकऱ्यांसोबत करारही करताना दिसतात. पॅटीस, सूप, पुलाव, पिझ्झा, शिरा, उपमा, भजी अशा अनेक खाद्य प्रकारात मधुमकाचा उपयोग वाढत असल्याने हॉटेल व्यवसायात याची मागणी वाढत आहे.





लागवड व्यवस्थापन

जमीन : मधुमक्याच्या लगवडीकरिता उत्तम निचरा होणारी सुपीक जमीन निवडावी. जमीन मध्यम काळी कसदार असावी. जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. चोपण किंवा जास्त दलदलीच्या जमिनीत मधुमका पीक घेऊ नये.

हवामान : मधुमक्याची चांगली उगवण होण्यासाठी अणि जोमदार वाढीसाठी उबदार हवामान लागते. पेरणीच्या वेळी जमिनीचे तापमान २५ ते २७ अंश सेल्सिअस असणे अधिक चांगले. मधुमक्याच्या वाढीसाठी साधारणतः २०-३२ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. तापमान कमी असल्यास पिकाच्या उगवण क्षमतेवर परिणाम होतो. मधुमक्याच्या वाढीच्या कोणत्याही अवस्थेत धुक्याचा विपरीत परिणाम होतो. त्याचप्रमाणे जास्त काळ थंड हवामान किंवा सुरुवातीला उष्ण हवामान राहिल्यास पिकाच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो.

पेरणीची पद्धत : साधारणत: ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये खरिपातील पिकाची काढणी पूर्ण झाल्यानंतर जमीन नांगरून घ्यावी. त्यानंतर २-३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. १० ते १२ गाड्या प्रती हेक्टरी शेणखत टाकून वखरणी करावी. नंतर ६० सें.मी. अंतरावर सरी वरंबा तयार कराव्यात. सरी वरंबा पद्धतीने लागवड केल्यास जमिनीत ओलावा टिकून राहतो. साधारण २० सें.मी. अंतरावर टोकण पद्धतीने मधुमक्याचे बियाणे लागवड करावी. साधारण १५ ते १७ किलो प्रति हेक्टरी बियाण्याची आवश्यकता भासते. एका जागेवर एक किंवा दोन बी लावावे. ज्या ठिकाणी बियाणे रुजले नाही, अशा ठिकाणी १० ते १२ दिवसांनी नांग्या भरून घ्याव्यात.

वाण : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी विकसित केलेले फुले मधू हे वाण निवडता येईल. यात साखरेचे प्रमाण (ब्रिक्स) १४.८९ टक्के असून, हिरवी कणसे ८५ ते ९० दिवसांत काढणीस तयार होतात. त्याच प्रमाणे विविध कंपन्यांचे सुधारित वाणही बाजारात उपलब्ध आहेत.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी थायरम २ ते २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे प्रक्रिया करावी. त्यानंतर ॲझेटोबॅक्टर हे जिवाणू संवर्धन २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे चोळून थोडेसे सावलीत वाळवल्यानंतर लगेच पेरणी करावी.

खत व्यवस्थापन : मधुमक्यासाठी साधारणतः जमिनीची सुपीकता व मातीपरीक्षण अहवालानुसार खतमात्रा द्यावी. साधारणतः मधुमक्यासाठी १२० किलो नत्र (२६० किलो युरिया), ६० किलो स्फुरद (३७५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ६० किलो पालाश (१०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रती हेक्टरी आवश्यकता असते. त्यामुळे पेरणीच्या वेळेस ५ टक्के नत्र व संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. उरलेले ५० टक्के नत्र लागवडीनंतर ३० व ६० दिवसांनी विभागून द्यावे. इतर मक्यापेक्षा या मक्यामध्ये साखरेचे प्रमाण ४ ते ५ पट अधिक असते. दर वेळी एकरी ५ किलो झिंक दिल्यास वाढ जोमदार व झपाट्याने होते.

आंतरमशागत व पाणी व्यवस्थापन : पीक उगवून आल्यानंतर १०-१२ दिवसांनी विरळणी करावी तसेच एका जागेवर एकच जोमदार रोप ठेवावे. पेरणीनंतर २०-४० दिवसांनंतर तणांच्या प्रादुर्भावानुसार निंदणी, खुरपणी करून पीक तणमुक्त ठेवावे. या पिकास १०-१२ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पिकाला जास्त पाणी होणार नाही किंवा पाणी साचून राहणार याची दक्षता घ्यावी.

काढणी व उत्पन्न : मधुमका हवामानानुसार कमी जास्त पण साधारणतः ९० ते ११० दिवसांत काढणीस तयार होतो. मधुमक्याची कणसे ही दुधाळ अवस्थेत काढली जाते. कणसे योग्य वेळेत न काढल्यास त्यातील साखरेचे प्रमाण कमी होते, त्यामुळे योग्य वेळेत काढणी करून विक्री करणे गरजेचे असते.

कणसे काढल्यानंतर उरलेला हिरवा चारा जनावरांसाठी अत्यंत सकस आणि दूध उत्पादन वाढवणारा ठरतो. अशा प्रकारे योग्य पद्धतीने लागवड, खत, पाणी व तण व्यवस्थापन केल्यास १५ ते १७ टन प्रती हेक्टरी कणसांचे, तर २३ ते २५ टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळू शकते.

डॉ. विशाल नवनाथ गमे
९४०३९२९६१७
स्मिता प्रचंड
(सहायक प्राध्यापक, कृषी विद्या विभाग, मराठा विद्या प्रसारक समाजाचे केडीएसपी कृषी महाविद्यालय, चाचडगाव, नाशिक)

दुष्काळ... एक सावट

शेतशिवारातून
पसरलं
एक सावट
दुष्काळाचं

उभं पिकं सार करपलं
नाही उरलं पीक मोत्याच

उदासला जीव आता
वाट पाहुन बळीराजाचा

तुर्षात त्या जमिनीला
नाही ओलावा पावसाचा

चुराडा झाला सगळा
हिरव्या हिरव्या स्वप्नांचा

हा कसा झाला कहर
धरणीवरी या निसर्गाचा

वरुणराजा करो कृपा
व्हावा हिरवा
पाट शेतीचा

दुष्काळ परतुनी जावो
दिवस येवो
आनंदाचा

राजश्री शेषरावजी खाजोने
चांदूर बाजार,
जि.अमरावती
मो.
९६६५६८०६३९

मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

हिरवाईच्या नावाखाली शहराच्या आरोग्याशी खेळ?

शासकीय कार्यालयांतही कोनोकार्पसची लागवड!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

यवतमाळ, दि. २३ : शहराचे सौंदर्य वाढविणे आणि पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जात असताना, नेमकी कोणती झाडे लावली जात आहेत, याचा विचार मात्र होताना दिसत नाही. यवतमाळ शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी कोनोकार्पस (Conocarpus) या विदेशी झाडाची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे.



विशेष म्हणजे, यवतमाळ नगरपरिषद परिसरासह जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरातही या झाडांची लागवड करण्यात आल्याने प्रशासनाच्या वृक्षारोपण धोरणावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कोनोकार्पस हे झाड कमी पाण्यात आणि अत्यल्प देखभालीत वेगाने वाढत असल्याने त्याचा वापर हरितीकरणासाठी केला जातो. मात्र, या झाडाच्या परागकणांमुळे श्वसनाचे विकार, ॲलर्जी, दमा, सर्दी आणि खोकल्याचा त्रास वाढण्याची शक्यता पर्यावरणविषयक चर्चेत व्यक्त केली जात आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींना याचा त्रास होऊ शकतो, अशी चिंता निसर्गप्रेमी व्यक्त करीत आहेत. केवळ आरोग्याचाच नव्हे, तर पर्यावरणाचाही प्रश्न या झाडामुळे निर्माण होत असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. या झाडाची आक्रमक मुळे पाणीपुरवठा व ड्रेनेजच्या पाइपलाइनसह पायाभूत सुविधांना नुकसान पोहोचवू शकतात. तसेच स्थानिक पक्षी, कीटक आणि जैवविविधतेच्या दृष्टीनेही त्याच्या लागवडीबाबत पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या झाडांच्या लागवडीविरोधात निसर्गप्रेमी आणि विविध सामाजिक संस्थांनी संबंधित यंत्रणांकडे तक्रारी केल्याचे सांगण्यात येते. मात्र, या तक्रारींवर नेमकी काय कार्यवाही झाली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. शहरात वृक्षारोपणाच्या बातम्या प्रसिद्ध केल्या जातात; मात्र लावलेल्या झाडांचा पर्यावरणाला प्रत्यक्ष किती फायदा होतो, याचे मूल्यमापन कोण करणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. वड, पिंपळ, कडुलिंब, करंज, जांभूळ, बकुळ आणि बहावा यांसारख्या स्थानिक प्रजातींच्या लागवडीला प्राधान्य देण्याची मागणी होत आहे. केवळ झाडांची संख्या वाढविणे म्हणजे पर्यावरण संवर्धन नव्हे, तर योग्य प्रजातींची निवड आणि त्यांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाने शहरातील कोनोकार्पस लागवडीचे सर्वेक्षण करून तज्ज्ञ समितीमार्फत आरोग्य व पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करावा. तसेच नव्याने लागवड करण्याबाबत योग्य निर्णय घेऊन स्थानिक, पर्यावरणपूरक झाडांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

क्रमशः

पावसाने पाठ फिरवली; आता वनराई बंधाऱ्यांचाच आधार!

रब्बी हंगामासाठी जलसंधारणाची गरज !

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. २३ : तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात सरासरीच्या ४५ टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांसमोर पाणीटंचाईचे मोठे संकट उभे ठाकले आहे. अपुऱ्या पावसामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला असून आगामी रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अशा परिस्थितीत पावसाचे उपलब्ध पाणी अडवून जमिनीत मुरविण्यासाठी कृषी विभागाच्या माध्यमातून वनराई बंधाऱ्यांची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. वनराई बंधाऱ्यांमुळे वाहून जाणारे पाणी अडविण्यास मदत होते. परिणामी जमिनीतील ओलावा टिकून राहतो, भूजल पातळीत वाढ होण्यास हातभार लागतो आणि रब्बी पिकांना आवश्यक ओलावा मिळू शकतो. त्यामुळे कमी पावसाच्या परिस्थितीत वनराई बंधारे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकतात. कृषी विभागाच्या माध्यमातून उमरखेड तालुक्यात आतापर्यंत २९ वनराई बंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. मात्र, तालुक्यातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता एवढ्यावरच न थांबता आणखी मोठ्या प्रमाणात वनराई बंधारे उभारण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे साहेब यांचे मार्गदर्शन लाभले आहे. पावसाचे पाणी वाहून जाण्यापूर्वी ते अडविणे आणि जमिनीत जिरविणे ही काळाची गरज बनली आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा हा केवळ नारा न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची वेळ आली आहे. त्यामुळे कृषी विभागाने वनराई बंधाऱ्यांच्या निर्मिती केली जात.



थोडक्यात

लोकनायक बापूजी अणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दीक्षांत समारंभ संपन्न!

पुसद : येथील लोकनायक बापूजी अणे प्रशिक्षण संस्थेमध्ये दीक्षांत



समारंभाचे आयोजन करण्यात आले . २०२५/२६ ऑनलाइन सीबीटी परीक्षेत एम्प्लॉबिलीटी स्किल या विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवून सतत मागील चार वर्षाची यशाची परंपरा कायम राखली. याप्रसंगी सौ . मालाओमप्रकाश गवई (इ. एस. शिल्प निर्देशिका) यांनी सदर विषयाचे अध्यापन केले. व स्वखर्चाने विद्यार्थ्यांना मेडल देऊन सत्कार केला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. मिश्रा हे होते. तर प्रमुख पाहुणे प्रा. मिर्झा आदिल बेग प्रा.नफीज इकबाल हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.झेड.कादरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



महिला काँग्रेसचे संघटन गावपातळीवर मजबूत करण्याचे आवाहन - ॲड. सचिन नाईक

यवतमाळ : महिलांवरील अन्याय-अत्याचार, बेरोजगारी, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचे प्रश्न केवळ भाषणांपुरते मर्यादित न ठेवता त्यासाठी प्रत्यक्ष संघर्ष उभारावा, असे आवाहन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी केले. महिला काँग्रेसच्या माध्यमातून संघटन मजबूत करून महिलांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घ्यावी, असे ते म्हणाले. यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेसची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना संघटनात्मक जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली. जिल्ह्यातील प्रत्येक तालुका, शहर आणि गावात महिलांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी आवाज बुलंद करण्याची गरज ॲड. नाईक यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा वंदना आवारी, वाणी तोडासे, नितू गतलेवार यांच्यासह विविध तालुक्यांतील महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

निंगनूरमध्ये घरकुल लाभार्थ्यांच्या निवडीवर प्रश्नचिन्ह!

६० ते ६५ जणांच्या नावांचा ठराव चर्चेत गवंडी प्रशिक्षण झाले कुठे आणि कसे?

फुलसावंगी : उमरखेड तालुक्यातील निंगनूर ग्रामपंचायतीअंतर्गत घरकुल योजनेतील ६० ते ६५ लाभार्थ्यांच्या नावांचा ठराव वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. गवंडी प्रशिक्षणाच्या नावाखाली नेमकी कोणती प्रक्रिया राबविण्यात आली, लाभार्थ्यांची निवड कोणत्या निकषांवर झाली आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण झाले की केवळ कागदोपत्री ठराव घेण्यात आला, असे सवाल उपस्थित करत फारुख खान शब्बास खान यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सादर केलेल्या तक्रारीत प्राप्त अर्जांची संख्या, लाभार्थी निवडीचे निकष, प्रशिक्षण देणारी संस्था, प्रशिक्षणाचे ठिकाण व कालावधी, उपस्थित लाभार्थी आणि प्रमाणपत्रांचा तपशील सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थींची कामगार आयुक्त कार्यालयात नोंदणी झाली का, याचीही चौकशी करण्याची मागणी आहे.

दरम्यान, ग्रामपंचायत सचिव बापुराव तांबारे यांनी लाभार्थ्यांना कोणतेही पैसे देण्यात आले नसून, केवळ ६० ते ६५ स्थानिक लाभार्थ्यांच्या नावांचा समेत ठराव घेण्यात आल्याचे स्पष्ट केले. मात्र, हा खुलासा उपस्थित प्रश्नांची उत्तरे देणारा ठरत नाही. ठराव झाला, मग त्याचा आधार काय? सभेचे इतिवृत्त, लाभार्थ्यांची यादी, निवडीचे निकष आणि प्रशिक्षणासंबंधी कागदपत्रे सार्वजनिक करून प्रशासनाने पारदर्शकता सिद्ध करावी. अन्यथा या प्रक्रियेवरील संशय अधिक गडद होण्याची शक्यता आहे.

आजपासून यवतमाळात शिवकथेला प्रारंभ..!

निराधार मुली आणि मनोरुग्णांसाठी वस्त्रदानाचे उपक्रम

यवतमाळ : शहरात मंगळवार, २४ नोव्हेंबरपासून भव्य श्री महारुद्र शिव महापुराण कथेचा प्रारंभ होत असून, भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकीचा संदेशही या सोहळ्यातून दिला जाणार आहे. वृंदावन धाम येथील पूजनीय देवी राधेप्रिया यांच्या मुखातून दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत शिवकथेचे निरूपण होणार आहे. पहिल्या दिवशी दुपारी १२ ते २ या वेळेत भव्य शोभायात्रा काढण्यात येईल. मुख्य यजमान अजय डालूरामजी बोरेले व शोभा बोरेले यांच्या पुढाकारातून २८ नोव्हेंबरला निराधार व गरजू मुलींना वस्त्रवाटप करण्यात येणार आहे. तर २९ नोव्हेंबरला पांडुरंगजी दुर्गे यांच्या वतीने नंददीप फाउंडेशनमधील ५० मनोरुग्णांना शालवाटप केले जाणार आहे. धार्मिक सोहळ्याला सेवाभावाची जोड देणारा हा उपक्रम समाजापुढे माणुसकीचा आदर्श ठेवणारा ठरणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

व्यसनमुक्तीचा नारा विधी सेवा समितीची जनजागृती, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार

२६ नोव्हेंबरला प्रभातफेरी,सामूहिक शपथ आणि विद्यार्थ्यांशी महासंवाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि. २३ : विद्यार्थी आणि युवा पिढीमध्ये वाढणाऱ्या व्यसनांच्या धोक्याला आळा घालण्यासाठी पांढरकवड्यात प्रशासनासह विविध यंत्रणा एकत्र आल्या आहेत. केवळ व्यसनमुक्तीच्या घोषणा न करता विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने २६ नोव्हेंबर रोजी व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. मात्र, या अभियानातून प्रत्यक्षात किती विद्यार्थी व्यसनांपासून दूर राहतील आणि जनजागृतीचा कितपत परिणाम होईल, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

तालुका विधी सेवा समिती, तालुका बार कौन्सिल, पांढरकवडा पोलीस ठाणे, पंचायत समिती आणि युवा टायगर फोर्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अभियानाच्या नियोजनासाठी २३ नोव्हेंबर रोजी जिल्हा न्यायालय क्रमांक १, केळापूर येथील सभागृहात बैठक घेण्यात आली. यात कार्यक्रमाची रूपरेषा आणि विविध यंत्रणांमधील समन्वयावर चर्चा झाली. गुरुवारी सकाळी ९ वाजता मित्र क्रीडा मैदानावर प्रभातफेरी, व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ, कायदेविषयक मार्गदर्शन आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींशी महासंवाद होणार आहे. अमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थ आणि अन्य व्यसनांचे शारीरिक, मानसिक, शैक्षणिक व सामाजिक दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात येणार आहेत. मात्र, खरा प्रश्न सातत्याचा! शाळा-महाविद्यालयांत व्यसनांचे जाळे रोखण्यासाठी नियमित तपासणी, समुपदेशन, पालकांचा सहभाग आणि व्यसनाधीन विद्यार्थ्यांना योग्य मदत मिळणेही तितकेच आवश्यक आहे. एक दिवसाची प्रभातफेरी आणि शपथ यापलीकडे जाऊन ठोस कृती आराखडा राबविण्याची गरज आहे. 'नशामुक्त पांढरकवडा – सुरक्षित विद्यार्थी, उज्ज्वल भविष्य' हा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे आव्हान आता संबंधित यंत्रणांसमोर आहे.

विदर्भाला दान-अनुदान नको, स्वतंत्र राज्याचा अधिकार हवा!

डिसेंबर २०२७ पर्यंत विदर्भ राज्य निर्मिती करा अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा -ॲड. वामनराव चटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २३ : स्वतंत्र विदर्भ राज्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, आता आश्वासनांपेक्षा राज्यनिर्मितीची ठोस वेळमर्यादा द्या, अशी आक्रमक भूमिका विदर्भ राज्य आंदोलन समितीने घेतली आहे. डिसेंबर २०२७ पूर्वी स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती न झाल्यास आंदोलन अधिक व्यापक आणि तीव्र करण्यात येईल, असा इशारा समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी दिला.

'मिशन २०२७' अंतर्गत स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता यवतमाळमध्ये आझाद मैदान ते सेलिब्रेशन सभागृह अशी 'विदर्भ निर्माण जनसंकल्प बाईक रॅली' काढण्यात येणार असून, त्यानंतर जनसंकल्प मेळावा होणार आहे. समितीच्या मते, १९५३ च्या नागपूर करारानंतरही विदर्भाच्या विकासाचा अनुशेष कायम आहे. १३१ धरणे पूर्ण होऊनही सुमारे १४ लाख हेक्टर जमीन सिंचनापासून वंचित असल्याचा दावा करण्यात आला. सिंचन, उद्योग, ऊर्जा, शिक्षण, रस्ते, पिण्याचे पाणी आणि आदिवासी विकासाच्या प्रश्नांवरून समितीने सरकारच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विकासाच्या नावाखाली आश्वासनांचे गाजर किती दिवस? असा सवाल उपस्थित करत विदर्भाला दान किंवा अनुदान नको, तर स्वतंत्र राज्याचा अधिकार हवा, अशी भूमिका चटप यांनी मांडली. यावेळी मंजुषा तिरपुडे, डॉ. पी. आर. राजपूत, तात्यासाहेब मते, कृष्णराव भोंगाडे, राजेंद्र झोटिंग, विजय निवल आणि गोविंद चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला जनआंदोलनाचे स्वरूप देण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला.

अवैध धंद्यांचा सुळसुळाट पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. २३ : उमरखेड शहरात अवैध धंद्यांच्या वाढत्या तक्रारी, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि अनियंत्रित वाहतुकीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील विविध भागांत मटका, अवैध दारू विक्री, गांजा आणि जुगाराचे अड्डे सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. या प्रकारांमुळे तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे वळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने सामान्य नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. या व्यवसायांना स्थानिक पातळीवर अभय मिळत असल्याची चर्चा असली, तरी त्याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे-पाटील यांच्या शिस्तप्रिय कार्यपद्धतीमुळे निर्माण झालेला पोलिसांवरील विश्वास कायम राखण्याचे आव्हान आता स्थानिक पोलीस प्रशासनासमोर आहे. दुसरीकडे, शहरातील प्रमुख चौकांमध्ये अनियंत्रित वाहतुकीमुळे दररोज कोंडी होत असून वाहनधारक आणि पादचाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही प्रभावी कारवाईची अपेक्षा व्यक्त होत आहे. अवैध धंद्यांवर छापे, दोषींवर कठोर कारवाई आणि वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे. केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्ष कारवाईतून उमरखेडकरांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

बेलोरा सर्कलमध्ये 'अवैध धंद्ये' फोफावले.?

वरली-मटका, गुटखा,गावठी दारूची खुलेआम विक्री;पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर नागरिकांचे प्रश्नचिन्ह.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २३ : तालुक्यातील खंडाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बेलोरा सर्कल परिसरात वरली-मटका,गुटखा आणि गावठी दारूच्या अवैध व्यवसायाची जोरदार चर्चा सुरू असून, या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अवैध धंदे सुरू असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी व चर्चानंतरही संबंधित यंत्रणा नेमकी काय भूमिका घेत आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे. या परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित पोलीस प्रशासन,तथा यंत्रणेची असतांना हे धंदे सुरूच कसे राहतात? कारवाई होत नसेल तर त्यामागचे कारण काय? तसेच संबंधित बीट जमादारांच्या कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासणी होणार का, असे प्रश्न नागरिक विचारत आहेत. दरम्यान, या प्रकरणाबाबत खंडाळा पोलीस ठाण्याचे ठाणेदार विनीत घागे यांच्याशी भ्रमध्वनीवरून (मोबाईल) वरून अधिकृत बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे त्यांची बाजू मांडता आली नाही.



'अर्थपूर्ण संबंध' आहेत का? चौकशीची मागणी?

अवैध धंदे आणि स्थानिक पोलीस यंत्रणा यांच्यात काही 'अर्थपूर्ण संबंध' आहेत का? असा गंभीर संशय काही सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी आता होत आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी यांची भूमिका व जबाबदारी नेमकी काय?

बेलोरा सर्कलमधील वरली मटका, गावठी दारू व इतर कथित अवैध धंद्यांची स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार का? संबंधित बीट जमादारांच्या कार्यपद्धतीची तपासणी होणार का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उपविभागीय पोलिस अधिकारी या गंभीर प्रकाराची दखल घेऊन बेलोरा सर्कलमध्ये पाहणी करून दखल घेणार का? या प्रश्नांची उत्तरे आता नागरिकांना वरिष्ठ पोलीस प्रशासनाकडून अपेक्षित आहेत.

घरभाडे भत्ता कृषी विभागावर संशयाची सुई,स्वतंत्र चौकशीची मागणी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २३ : वणी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःचे घर असतानाही घरभाडे भत्ता उचलून शासकीय निधीचा अपहार केल्याचा गंभीर आरोप व्हिसल ब्लोअर तथा माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांनी केला आहे. या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी जिल्हाधिकारी विकास मीना यांना रजिस्टर पोचपावतीसह कायदेशीर नोटीस बजावली असून, प्रशासनाला १० दिवसांची मुदत दिली आहे.

बोरेले यांनी ६ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करून संबंधितांकडून आर्थिक वसुली, फौजदारी कारवाई आणि दोषींवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, १२ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने ही तक्रार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे वर्ग केली. ज्या विभागाविरुद्ध तक्रार आहे, त्याच विभागाकडे चौकशी सोपविणे म्हणजे निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब असल्याचे बोरेले यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, तालुका कृषी अधिकारी डी. ए. राऊत यांनी १३ ऑक्टोबरच्या पत्रात २०२५-२६ या आर्थिक वर्षात कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आयकर विवरणपत्रासोबत घरभाडे पावत्या सादर केल्या नसल्याचे नमूद केल्याचा दावा बोरेले यांनी केला आहे. तरीही मुद्देनिहाय चौकशी न करता केवळ पत्रव्यवहार करण्यात आल्याचा आरोप आहे. ६ नोव्हेंबरचा अहवालही २० नोव्हेंबरला मिळाला; मात्र त्यात संपूर्ण चौकशी अहवाल नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्वतंत्र सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी, संबंधित अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी आणि कार्यवाहीचा लेखी अहवाल देण्याची मागणी नोटीसमधून करण्यात आली आहे. दहा दिवसांत कार्यवाही न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा बोरेले यांनी दिला आहे. आता जिल्हा प्रशासन या गंभीर आरोपांची निष्पक्ष दखल घेते की प्रकरण पत्रव्यवहारातच अडकवून ठेवते, याकडे लक्ष लागले आहे.

बोधिसत्व चौकातील उघड्या खड्ड्याचा मृत्यूचा सापळा!

चार वर्षांचे बालक पडले, तरुणही जखमी नगरपरिषदेच्या दुर्लक्षावर रिपाइंचा संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २३ : शहरातील पाटीपुरा परिसरातील बोधिसत्व चौकाजवळ असलेला सरकारी सबमर्सिबल पंपाचा उघडा खड्डा नागरिकांच्या जिवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक वर्षांपासून या खड्ड्यावर झाकण नसल्याने हा परिसर अपघाताचा धोकादायक सापळा बनला आहे. मात्र, नगरपरिषदेचे याकडे दुर्लक्ष का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

या खड्ड्यावर पूर्वी मजबूत लोखंडी झाकण होते. मात्र, ते गायब झाल्यानंतर नवीन झाकण बसविण्याची तसदी संबंधित विभागाने घेतलेली नाही. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी खेळता खेळता चार वर्षांचे बालक या खड्ड्यात पडले होते. सुदैवाने त्याला गंभीर दुखापत झाली नाही. यापूर्वी एका २५ ते २६ वर्षीय तरुणाचा पाय घसरून पडल्याने हाताला गंभीर दुखापत झाली होती. बोधिसत्व चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, संविधान दिन व महापरिनिर्वाण दिनानिमित्त मोठ्या संख्येने नागरिक, महिला आणि लहान मुले जमा होतात. अशा संवेदनशील आणि वर्दळीच्या ठिकाणी उघडा खड्डा ठेवणे म्हणजे संभाव्य दुर्घटनेला निमंत्रणच आहे. या गंभीर समस्येची दखल घेऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे यवतमाळ युवा शहराध्यक्ष तेजस कांबळे आणि युवा शहर महासचिव उत्कर्ष वाणे यांनी नगरपरिषदेत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. खड्ड्याची तातडीने पाहणी करून मजबूत लोखंडी अथवा सिमेंटचे झाकण बसवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दुर्घटना घडल्यानंतर जाग येण्यापेक्षा प्रशासनाने आताच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

कोल्हापुरी बंधाऱ्यांतून पाण्याची गळती सुरूच

जलसंधारणाच्या उद्देशालाच हरताळ!

निडल बसविताना रबर पॅकिंगचा अभाव? जिल्हा परिषद पाटबंधारे विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांचे प्रश्नचिन्ह

मेळघाट/वार्ताहर

धारणी तालुक्यातील विविध नद्यांवर बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये पाणी अडविण्याची प्रक्रिया सुरू असली, तरी अनेक बंधाऱ्यांमधून पाण्याचा विसर्ग होत असल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून समोर येत आहे. पाण्याची टंचाई लक्षात घेता प्रत्येक थेंबाचे महत्त्व असताना बंधाऱ्यांमधून होणारी ही गळती चिंतेचा विषय बनली आहे.

कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये निडल बसविताना प्रत्येक जोडावर योग्य प्रकारे रबर पॅकिंग करणे आवश्यक असते. दोन निडलमधील फट बंद करण्यासाठी रबरचा वापर केल्यास पाण्याचा विसर्ग रोखण्यास मदत होते. मात्र, अनेक ठिकाणी या प्रक्रियेकडे



पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. तसेच निडल काढल्यानंतर त्यांची आवश्यक दुरुस्ती व देखभाल करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. दरवर्षी पाणी अडविण्यासाठी प्रशासनाकडून घाईघाईने निडल बसविण्याची कार्यवाही केली जाते; परंतु खराब किंवा योग्य प्रकारे दुरुस्ती न केलेल्या निडलमुळे अडविलेले पाणी पुन्हा वाहून जात असल्याचे चित्र आहे. यामुळे शासनाचा खर्च आणि जलसंधारणासाठी केलेले प्रयत्न अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत.

यंदा पाण्याची उपलब्धता आणि संभाव्य टंचाई लक्षात घेता जिल्हा परिषद पाटबंधारे विभागाने या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. ज्या बंधाऱ्यांमधून पाण्याचा विसर्ग होत आहे, त्यांची तातडीने पाहणी करून आवश्यक रबर पॅकिंग, निडल दुरुस्ती व इतर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. पाणी अडविण्यासाठी निधी खर्च होतो, मात्र अडविलेले पाणी टिकविण्यासाठी आवश्यक देखभाल कधी होणार? असा सवाल उपस्थित करत पाटबंधारे विभाग याकडे लक्ष देणार का, याकडे आता संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बेलोरा येथे २७ नोव्हेंबरला ब्रम्हलीन संत अच्युत नामाचा गजर

संत सचिन देव महाराज यांच्या आगमनाने पंचक्रोशित उत्साह

दर्यापूर/वार्ताहर

महाराष्ट्रातील ख्यातनाम संत ह भ प संत श्री सचिन देव महाराज यांचे दर्यापूर तालुक्यातील बेलोरा या गावी 'गामरत्न पुरस्कार वितरण सोहळा व प्रबोधन कार्यासाठी आगमन होत असल्याने बेलोरा पंचक्रोशीत अती उत्साहाची व आनंदाची वातावरण निर्मिती झाली आहे . सुमारे ५८ वर्षांपूर्वी संत अच्युत महाराज यांनी बेलोरा या गावी भेट दिली होती . त्यानंतर शेवटपर्यंत या भेटीचा पुनर्योग आला नाही . निष्काम कर्मयोगी ब्रम्हलीन संत अच्युत महाराज यांचे परमशिष्य म्हणून मान्यता असलेले तथा महाराजांच्या सर्व उत्युंग समाजसेवी कार्याची अखंड ज्योत यज्ञस्वीपणे तेवत ठेवीत असलेले संत सचिन देव महाराज यांचे या परीसरातील आगमनाचे नालवाडा, मोर्वडी, माटरगांव, चिखर्डा तथा हयापूर इत्यादी पंचक्रोशीतील अच्युत भक्त परिवाराने अच्युत नामाचा जयघोष करीत स्वागत केले आहे .

२७ नोव्हेंबर ला दुपारी ३:३० ते रात्री ७: ३० पर्यंत संपन्न होणाऱ्या





या कार्यक्रमा दरम्यान संत सचिन देव महाराज यांच्या शुभहस्ते चंद्रभागा नदीच्या विहंगम पात्रात बेलोरा गावाचे माजी सरपंच प्रा गजानन रामकृष्ण भारसाकळे यांना त्यांनी आजवर प्राप्त केलेल्या यशाबद्दल जीवन गौरव म्हणून संपूर्ण बेलोरा ग्रामवासी यांच्या वतीने ' ग्रामरत्न ' या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे . याप्रसंगी स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान अमरावती संस्थेचे सचिव तथा शिवाजी शिक्षण संस्था , अमरावती कार्यकारिणी सदस्य हेमंत वासुदेवराव काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे (कार्यकारिणी सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) तथा प्रबोधन विद्यालय व ज्युनिअर कॉलेज महाविद्यालय, दर्यापूर या संस्थेचे माजी प्राचार्य श्रीकृष्ण मावंदे यांना कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे म्हणून गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे . तसेच कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती मध्ये सरपंच शोभाताई राजेंद्र धुवे, पोलीस पाटील ज्योत्सना राजेश भारसाकळे, सेवा सहकारी सोसायटी अध्यक्ष संदीप रामकृष्ण भारसाकळे व तंटामुक्ती समिती अध्यक्ष योगेश बाबुराव भारसाकळे यांचा समावेश आहे .

या प्रबोधनीय कार्यक्रमाचा तथा संत सचिन देव महाराज यांच्या दिव्य प्रवचनाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन कार्यक्रम आयोजन समिती तथा संपूर्ण ग्रामवासी बेलोरा यांनी केली आहे .

बालकांच्या हाती वाहन देणे धोक्याचे पालकांनी वेळीच सावध व्हावे!

ठाणेदार कैलास भगत यांचे पालकांना आवाहन अल्पवयीनांच्या वाहन चालवण्यावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन

अमरावती/का.प्र.

आजच्या काळात लहान वयातच मुलांना दुचाकी चालवण्याचे आकर्षण निर्माण होत असून, अनेक पालकही नकळत आपल्या अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन चालवण्यासाठी देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र, अशा प्रकारची कृती मुलांच्या जीवितासह इतर नागरिकांच्या सुरक्षिततेलाही गंभीर धोका निर्माण करू शकते.

अल्पवयीन मुलांकडे वाहन चालवण्याचा आवश्यक अनुभव, वाहतुकीचे नियम समजून घेण्याची क्षमता आणि अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे कौशल्य नसते. त्यामुळे भरधाव वाहन चालवणे, नियंत्रण सुटणे, अपघात घडणे तसेच निष्पाप नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर ठाणेदार



कैलास भगत यांनी पालकांना विशेष आवाहन केले आहे की, आपल्या लहान मुलांच्या हट्टापोटी किंवा कौतुकापोटी त्यांच्या हाती दुचाकी अथवा इतर कोणतेही वाहन चालवण्यास देऊ नये. पालकांनी मुलांवर योग्य संस्कार करत वाहतूक नियमांचे महत्त्व समजावून सांगावे आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी जबाबदारीने वागावे. मुलांच्या हातात वाहनाची चावी देणे म्हणजे केवळ नियमांचे उल्लंघन नव्हे, तर त्यांच्या आयुष्याला धोक्यात घालण्यासारखे आहे. वेळीच पालकांनी सावध भूमिका घेतल्यास अनेक संभाव्य अपघात टाळता येऊ शकतात. वाहतूक नियमांचे पालन करा, अल्पवयीनांच्या हाती वाहन देऊ नका आणि स्वतःसह इतरांचेही जीवन सुरक्षित ठेवा. असे आवाहन ठाणेदार कैलास भगत साहेब पालकांना केले आहे

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अमृत-२ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणार-आ. खोडके

शासन निर्णयानुसार जागा हस्तांतरण; ना-हरकत संदर्भातील प्रक्रिया तातडीने पूर्ण करा

अमरावती/का.प्र.

शहरवासीयांना मुबलक व नियमित जलपूर्ती करण्यासाठी अमृत -२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना हा महत्वाकांक्षी प्रकल्प शासनाने मंजूर केला असून सिंभोरा हेडवर्क ते नेर पिंगळाई व पुढे अमरावती जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत नवीन पाईप लाईन अंथरण्याचे काम सुरु आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली जागा ताब्यात घेण्याबाबत शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संबंधित विभागांनीही ना हरकत व परवानगी व जागा हस्तांतरण संदर्भात समन्वयाने काम करून योजनेला गती देण्याच्या सुचना आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी दिल्या.

शहराच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता तसेच संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या



पार्श्वभूमीवर अमरावती शहरासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली अमृत-२ अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीतील तांत्रिक अडचणी दूर करून कामाला गती देण्याच्या दृष्टीने आमदारांनी अधिकाऱ्यांसमवेत ऑन द स्पॉट ड्राईव्ह केला. यावेळी विधान परिषद आमदार - संजय खोडके यांच्या समवेत यश खोडके, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता - विवेक सोळंके, मजीप्रा उपविभागीय अभियंता - संजय लेवरकर, नॅशनल हाय-वे ऑथॉरिटी ऑफ इंडिया प्रकल्प व्यवस्थापक - रावेश जवादे, मजीप्रा उपअभियंता- मनोज वाकेकर, आयआरडीचे अधिकारी,आर्दीसह मजीप्रा व संबधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

अमरावती शहरातील वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची वाढती मागणी आणि उन्हाळ्यात निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता अमृत-२ पाणीपुरवठा योजना ही शहरासाठी महत्त्वाकांक्षी योजना ठरणार आहे. दरम्यान आमदार महोदयांनी मजीप्रा प्रशासनासोबत वारंवार बैठका घेऊन योजनेच्या विविध टप्यांमध्ये निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी, आवश्यक परवानग्या, जागा हस्तांतरण तसेच ना-हरकत प्रमाणपत्रासंदर्भातील प्रलंबित बाबींचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित विभागांनी आपापसातील समन्वय वाढवून प्रलंबित प्रक्रिया तातडीने मार्गी लावाव्यात आणि योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाहीला गती द्यावी, अशी सुचना आमदार खोडके यांनी केली.

कोणत्याही परिस्थितीत अमृत -२ प्रकल्प पूर्णत्वास आणू - आ. संजय खोडके

शहरवासीयांना मुबलक व नियमित पाणी पुरवठ्याची सोय करण्यासाठी अमृत -२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना ९८५.४९ कोटींच्या प्रकल्प मंजूर करुन कामास सुरुवात झाली आहे. अमरावती करांना एक दिवसा आड पाणी पुरवठ्यापासून मुक्तता तसेच आगामी उन्हळ्यामधील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता प्रभावी उपाययोजना म्हणून लवकरात लवकर हा महत्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाचे पूर्णत्वास आणण्यासाठी या संदर्भातील सर्व तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वय राखून मजीप्रा प्रशासनाला सहकार्य करणे अपेक्षित आहे. साधारणतः हा प्रकल्प मजीप्राच्या जागेमध्येच व सद्या अस्तित्वातील जुन्या पाईप लाईन पासूनच नवीन पाईप लाईन अंथरविण्याचे काम सुरु आहे. मात्र आवश्यक ठिकाणी काही रस्ते, विद्युत पोल, वन विभागाच्या अखत्यारीत वृक्षे , खासगी प्लॉट अथवा सार्वजनिक मालमत्ता अशा काही आस्थापना बाधित होण्याची शक्यता आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली जागा ताब्यात घेण्याबाबत शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संबंधितांनी अडवणुकीचे धोरण न बाळगता समन्वयाने काम करून योजनेला गती देण्यासाठी पुढाकार दर्शविण्याचे आमदार संजय खोडके यांनी आवाहन केले. कोणत्याही परिस्थितीत अमृत -२ प्रकल्प पूर्णत्वास आणू असे देखील आ. संजय खोडके यांनी यावेळी स्पष्ट केले.

राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा २४ जानेवारीला

संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजन 'जयमल्हार मंगलयोग २०२७' पुस्तिकेचे होणार प्रकाशन

अमरावती/का.प्र

राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा आयोजन समितीची नुकतीच सभा अहिल्यास्मृती भवन, न्यू कॉलनी, अमरावती येथे पार पडली. या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर परिचय मेळावा रविवार, २४ जानेवारी २०२७ रोजी सकाळी ठीक १० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातून धनगर समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना एकमेकांचा परिचय करून घेण्यासाठी तसेच योग्य



जीवनसाथी निवडण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता समाजातील विवाहयोग्य वधू-वरांचे परिचयपत्र जास्तीत जास्त संख्येने सादर करावेत, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले. या राज्यस्तरीय मेळाव्याला दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रासह महाराष्ट्राबाहेरील धनगर समाजबांधवांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती लाभत असते. त्यामुळे हा मेळावा समाजातील विवाहयोग्य युवक-युवती, पालक आणि नातेवाईकांसाठी एक महत्त्वपूर्ण परिचयाचे व्यासपीठ ठरणार आहे. कार्यक्रमाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे याच प्रसंगी 'जयमल्हार मंगलयोग २०२७' या वधू-वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या यशस्वी आयोजना साठी ज्ञानेश्वरराव ढोमने, काशीनाथ फुटाणे, ॲड. डॉ. राजू डांगे, श्री. अशोक ईसळ यांच्यासह संपूर्ण आयोजन समिती अथक परिश्रम घेत आहे. सभेला काशीनाथ फुटाणे, ॲड. डॉ. राजू डांगे, पुंनसे, जनार्दनजी घुरडे, महादेवराव रोकडे, भास्करपुंनसे, भास्करराव ढेवले, अनिलभ ईसळ, दिनेशराव बांबल, वासुद पाठक, अनिलभाऊ फुटाणे, ज्ञालन, संजयजी ढाले, वाढे, प्रकाशराव वाढे, ढोमणे आदी समाजबांधव उपस्थित होते. धनगर समाजातील सर्व समाजबांधवांनी आपल्या विवाहयोग्य मुला-मुलींची परिचयपत्रे ३१ डिसेंबर पर्यंत सादर करून या उपक्रमाला सहकार्य करावे. तसेच या राज्यस्तरीय मेळाव्यास पस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

बांधकाम सभापती व नगरसेविकेचा एकच सूर

प्रभाग १३ मध्ये तातडीने अंगणवाडी सुरू करा

अंजनगाव सुर्जी /वार्ताहर

शहरातील प्रभाग क्र. १३ (अ) व १३ (ब) या मोठ्या लोकवस्तीच्या भागात आजपर्यंत एकही अंगणवाडी सुरु करण्यात आलेली नाही. त्यामुळे येथील लहान बालके, गरोदर व स्तनदा मातांना शासनाच्या योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याबाबत नगर परिषदेचे बांधकाम समिती सभापती इब्राहिम बेग हसन बेग व प्रभाग क्र. १३ च्या सदस्या सौ. आबेदाबी मो. आरीफ यांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना स्वतंत्र पत्र देऊन नविन अंगणवाडी सुरु करण्याची मागणी केली आहे.

२३ नोव्हेंबर २०२६ रोजी देण्यात आलेल्या या पत्रांमध्ये दोन्ही लोकप्रतिनिधींनी आपापल्या प्रभागातील वस्तुस्थिती मांडली आहे. प्रभाग क्र. १३ (ब) मध्ये इस्लाम नगर येथे चार मोठे लेआऊट असून, येथे मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. एवढा मोठा प्रभाग असूनही येथे



आजपर्यंत अंगणवाडी सुरु करण्यात आलेली नाही. त्यामुळे येथील लहान मुलांना तसेच गरोदर महिलांना अंगणवाडी मार्फत शासनाच्या योजनेची माहिती मिळत नाही, तसेच शासनाच्या योजनेचा लाभही मिळत नाही. त्याचप्रमाणे प्रभाग क्र. १३ (अ) मध्ये अलहुदा कॉलनी, वसीम नगर, हबीब नगर, बहीर प्लॉट ही वस्ती असून, येथेही मोठा प्रभाग असूनही आजपर्यंत अंगणवाडी सुरु करण्यात आलेली नाही. येथीलही लहान मुले व गरोदर महिलांना शासनाच्या योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, येथील गरोदर महिलांना शासनाच्या आरोग्यविषयक मिळणाऱ्या योजना व लहान मुलांना आरोग्य विषयक मिळणारे फायदे यापासून वंचित राहावे लागत आहे. वरील ठिकाणी आजपर्यंत अंगणवाडी नसल्यामुळे येथील महिला व लहान बालकांना शासनाच्या योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. विशेषतः ० ते ५ वयोगटातील लहान मुलांना अंगणवाडी नसल्यामुळे त्यांना अंगणवाडी मार्फत मिळत असलेला पोषण आहारापासून वंचित राहावे लागत आहे. सदर ठिकाणी अंगणवाडी सुरु केल्यास येथील महिला व लहान बालकांचे आरोग्यविषयक लाभ मिळेल व त्यांचे आरोग्य सुधारेल, असेही पत्रात म्हटले आहे. त्यामुळे वरील पैकी कोणत्याही ठिकाणी नविन अंगणवाडी सुरु करण्यात यावी, अशी विनंती दोन्ही लोकप्रतिनिधींनी नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे. दोन्ही प्रभागातील नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला असून, प्रशासनाने लवकरात लवकर यावर सकारात्मक निर्णय घेऊन अंगणवाडी सुरु करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विशेष लोकअदालतीत ६४ प्रकरणांमध्ये १.८९ कोटींची तडजोड

अमरावती/का.प्र.

राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार अमरावती जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये आयोजित विशेष लोकअदालतीत ६४ प्रकरणांमध्ये १ कोटी ८९ लाख रूपयांची तडजोड करण्यात आली.

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत दाखल धनादेश अनादर प्रकरणांसाठी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीत एकूण ६४ प्रकरणे



सामोपचाराने निकाली काढण्यात आली आहे. तडजोडीअंती १ कोटी ८९ लाख रकमेचा निपटारा करण्यात आला.

प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा न्यायाधीश अमित जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे सचिव संजय सहारे यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष लोकअदालत पार पडली. लोकअदालती साठी जिल्हा व तालुका न्यायालयांतील न्यायाधीश, अधिवक्ता आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. पक्षकारांना वेळेवर माहिती देणे, सामोपचाराने वाद मिटविण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि आवश्यक समन्वय साधण्याचे काम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व न्यायालयांच्या माध्यमातून करण्यात आले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

सोनियांचे आत्मवृत्त



सोनिया गांधींचे आत्मवृत्त 'Belonging' सध्या वाचतोय. ५०२ पानांपैकी १५२ पान वाचून झाले. त्यांच्या माहेरच्या कुटुंबाचे वर्णन, राजीवची भेट व प्रेम बहरणे, राजीवचे इटलीत जाऊन सोनियांच्या पालकांना भेटणे, पुढे सोनियांचे भारतात येणे, विवाह, इथल्या चालीरीती शिकणे, अन्नाची सवय करून घेणे, इंदिरा गांधींना व्यक्तिगत कामात मदत करणे इत्यादी मजकूर या पहिल्या १५० पानांमध्ये आलेला आहे. तो वाचून जाणवलेले ठळक मुद्दे..



कुटुंबसंस्था ही भारतात आणि इटलीत जवळपास सारखीच होती. फक्त पोशाख, अन्न आणि प्रार्थना विधी यात काय फरक असतील ते आहेत. कुटुंबाचा कर्ता पुरुष हा इतरांसाठी भीतीयुक्त आदराचा विषय असणे, त्याचा शब्द अंतिम असणे, आईने घर नीटनेटके ठेवण्यासाठी व उत्तमोत्तम अन्न मुलांना मिळावे यासाठी दिवसभर राबत राहणे, वडिलांचे आतून प्रेमळ परंतु बाहेरून कठोर असणे, मुलांचा व वडिलांचा प्रत्यक्ष संवाद कमी असणे व आपली इच्छा आईमार्फत व्यक्त करणे, वडिलांच्या व आईच्या माहेरच्या नातेवाईकांशी संबंध राखून राहणे हे सगळे सोनियांच्या बालपणापासून वयात येण्यापर्यंतच्या काळातल्या आठवणीत आढळून येते. त्यांचे कुटुंब मध्यमवर्गीयच होते. वडील मूळ गावापासून दूर असलेल्या खेडेवजा गावात कामधंदा शोधायला येऊन स्थायिक झाले होते. इतरांकडे काम करता करता त्यांनी स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरु केला. आई धार्मिक तर वडील नास्तिक. सोनियांना दोन बहिणी, एक मोठी व दुसरी लहान. भाऊ नाही. त्यांच्या आईची आई कम्युनिस्ट कार्यकर्ती होती. पण कुटुंब राजकारणात नव्हते. पूर्वजांनी मात्र स्वातंत्र्यासाठी राजकीय युद्धात भाग घेतला होता.

पुढील शिक्षणासाठी सोनियांना वडिलांनी केम्ब्रिजला जाण्याची परवानगी दिली. इंग्रजांच्या अन्नावर सोनियांनी भरपूर टीका केलेली आहे. त्या पेइंग गेस्ट म्हणून राहत असलेल्या घरातले अन्न त्यांना धकत नसे. म्हणून त्या आवडीच्या खाद्यपदार्थांच्या शोधात असायच्या. व्हर्सिटी नावाचे उपहारगृह त्यांना आवडले. तिथे मित्रमैत्रिणींसोबत त्या नेहमी जात. त्याच व्हर्सिटीत राजीव गांधी सुद्धा आपल्या मित्रांसोबत येत असत. 'प्रथम तुज पाहता, जीव वेडावला' अशी सोनियांची राजीवला पाहून अवस्था झालेली. त्या चोरट्या नजरेने राजीवकडे अधूनमधून पाहत राहायच्या. दोघेही लाजाळू. त्यामुळे पुढाकार कोणी घ्यायचा हा प्रश्न. अखेर एका ओळखीच्या तरुणाने राजीवला त्यांच्या टेबल वर आणून रीतसर ओळख करून दिली. पुढे प्रेम बहरले.

सोनिया या कुठल्यातरी हॉटेल मध्ये वेटर होत्या (काहीजण म्हणतात 'बारबाला' होत्या) असे मी आधी वाचले होते. परंतु या पुस्तकात तसा कोणताही उल्लेख नाही. त्या व्हर्सिटीमध्ये फक्त ग्राहक म्हणून येत असत. सोनिया आणि राजीवची भेट १९६५ मधली. त्यावेळी इंदिरा गांधी भारताच्या नभोवाणी आणि माहिती व सूचना विभागाच्या मंत्री होत्या. शास्त्री पंतप्रधान होते. मला हे वाचून धक्का बसला की नेहरू-गांधी कुटुंबातील आणि केंद्रीय मंत्र्यांचे पुत्र असूनही राजीव इंग्लंड मध्ये वेगवेगळ्या प्रकारची कामे करून थोडे बहुत पैसे कमावत होते. जवाहरलाल नेहरू हे चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आले असेच आम्ही बालपणापासून ऐकत-वाचत होतो. त्यांचा नातू- एकुलत्या एक मुलीचा मुलगा, जी स्वतः केंद्रीय मंत्री होती व लवकरच पंतप्रधान झाली- आपला खर्च भागवण्यासाठी रोजंदारीने परदेशात काम करत होता, हे या पुस्तकातून प्रथमच समजले. सोनियांनी लिहिले आहे की दोघांनाही संगीताची आवड असल्यामुळे त्या आणि राजीव रेकॉर्डस् च्या दुकानात जाऊन भरपूर संगीत ऐकत. परंतु रेकॉर्ड विकत घेताना मात्र प्रत्येकी एकच घेण्याची त्यांची ऐपत होती. सोनियांना भेटवस्तू देण्यासाठी सुद्धा राजीव मेहनतीचे काम करत. काही काळ तर त्यांनी रोज १० तास बांधकाम मजुरी सुद्धा केली. आताच्या काळात यावर विश्वास बसणार नाही. आपल्या जिल्हा परिषद अध्यक्षाचा किंवा आमदाराचा मुलगा सुद्धा विदेशात आरामात राहून शिकू शकतो.

इंदिरा गांधी १९६६ साली पंतप्रधान झाल्यानंतर त्यांना पक्षांतर्गत व बाह्य विरोधकांचा सामना करावा लागला. आई एकटी पडली आहे, हे जाणवून राजीव यांनी भारतात परतण्याचे ठरविले. त्यावेळी संजय सुद्धा इंग्लंडमध्येच होते. परतण्यापूर्वी राजीव इटलीला सोनियांच्या घरी जाऊन तिच्या आई वडिलांशी विवाहाबद्दल बोलू इच्छित होते. स्वतःच्या आईला त्यांनी आधीच सोनिया वरील प्रेमाची कल्पना दिली होती. सोनियांचे कुटुंब इटलीतल्या खेडेवजा गावात असल्यामुळे त्यांना भारताविषयी फारशी माहिती नव्हती. वडिलांनी प्रथम जोरदार विरोध केला. आपली लाडकी लेक इतक्या दूर पाठवायला ते तयार नव्हते. सोनियांनी जोर लावला तेव्हा त्यांनी राजीवना भेटण्याची तयारी दर्शविली. संजय गांधींची एक सेकंड हँड जुनी मोटर घेऊन राजीव इटलीला सोनियांच्या गावात गेले. रस्त्यात मोटर बिघडली, ती टो करून आणावी लागली. पण पहिल्या भेटीत राजीवचा निष्पाप व प्रामाणिक चेहरा सोनियांच्या पित्यास आवडला. तरीही त्यांनी अट टाकली की सोनिया २१ वर्ष वयाच्या होईपर्यंत भारतात येणार नाहीत. तेव्हा त्या २० वर्षाच्या होत्या. 'मैने प्यार किया' किंवा ' एक दूजे के लिये' या हिंदी चित्रपटांची आठवण यावी अशया घटना घडल्या. राजीव भारतात परत गेले. इंदिरा गांधींनी त्यांना अट टाकली की आधी सोनियास एक-दोन महिन्यांसाठी भारतात बोलवावे. मग पाहू. रोम ते दिल्ली इतका मोठा प्रवास आयुष्यात प्रथमच आणि एकटीने करून सोनिया १३ जानेवारी १९६८ रोजी भारतात आल्या.

क्रमशः

किशोर देशपांडे





गुरूनानक देव

आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते. गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला.आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या. या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला.

आज शीख धर्माचे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
मो.९९२२५४६२९५

डी-मार्ट ची खरेदी म्हणजे कमी दर्जाचा माल...

डी-मार्ट मध्ये सर्व वस्तू स्वस्त मिळतात, असा आपला समज आहे. आता हेच बघा, बोर्बोन बिस्किटांचा ग्रॅंड्ज् ३५ रुपये आहे. मात्र डी-मार्ट मध्ये ते थेट १३ रुपये कमी करून २२ रुपयांना मिळत आहेत. अशाच प्रकारच्या ऑफर्स अनेक उत्पादनांवर असतात.

मध्यंतरी एक रील पाहिली होती. एक माणूस फक्त १० रुपयांचा बिस्किट पुडा घेण्यासाठी डी-मार्ट मध्ये जातो आणि बाहेर येताना तब्बल साडेतीन हजार रुपयांची खरेदी करून येतो. ते पाहून खूप हसू आलं. पण खरं सांगायचं तर हे केवळ विनोदी नाही, तर मार्केटिंगच्या मानसशास्त्राचं भयानक वास्तव आहे.

आपण तिथे नकळत ट्रॅप होतो. आपल्या मनावर या सवलतींचा प्रभाव पडतो. गरज नसतानाही स्वस्त मिळतंय, या विचाराने आपण वस्तू खरेदी करत सुटतो. म्हणजेच, आपली खरेदीची मानसिकता बदलली जाते आणि आपण नकळत मॅनिप्युलेट होतो.

शेवटी बिलिंग काउंटरवर पोहोचल्यावर लक्षात येतं की, आपल्याला फक्त १० रुपयांचा बिस्किट पुडा घ्यायचा होता; पण सवलतींच्या मोहापायी साडेतीन हजार रुपयांचा बाजार करून बसलो!

हा प्रश्न विचार करण्यासारखा असला, तरी कपाळावर हात मारून घेतला तरी डी-मार्ट तुमची काळजी घेतंच! बिलाच्या अगदी शेवटी तुम्ही किती रुपयांची बचत केली, याचा हिशेब छापून दिलेला असतो. त्यावर ७००, ८००, १,००० किंवा दीड हजार रुपयांची बचत झाल्याचा आकडा दिसतो. झालं! आपल्या मेंदूत पुन्हा एकदा डोपामाइनचा मोठा डोस जातो. आपण गरजेपेक्षा कितीतरी जास्त पैसे खर्च केलेत, हे क्षणभर विसरून जातो आणि हजारो रुपये वाचवल्याच्या आनंदात घरी परततो! म्हणजे खरेदी किती केली यापेक्षा किती बचत केली, याचा आनंद आपल्याला जास्त दिला जातो!

हे सगळं मा केटिंग गीमिक आहे.हा एक भाग झाला. हे सगळं कसं परवडतं हा प्रश्न नेहमीचा आहे.सर्वांना पडत असेल,मलाही पडला होता.मग थेट कंपनीकडून माल उचलला जातो,मोठ्या स्टॉकमध्ये उचलला जातो अशी कारणे दिली जात होती.



मी याबद्दल मागेही लिहिलं होतं.माझा किराणा दुकान असलेला मारवाडी मित्र सतीश याने माहिती दिली होती, ३-४ ऊँऊ मध्ये कमी दर्जा असलेल्या वस्तु मिळतात.खास यांच्यासाठी कंपन्या वेगळ्या बॅच बनवतात आणि बाजारात वेगळ्या बॅचचा माल जातो.त्यामुळे माझ्या अन त्यांच्या मालात तुम्हाला फरक दिसेल.अशी माहिती त्याने दिलेली.

मलाही तशी शंका होती,तिकडचे पाकीटबंद अन्न लवकर खराब होते,तसेच चवीमध्ये फरक जाणवतो.हे लक्षात येत होतं.अलिकडे मी सोसायटी चहा पावडर आणलेली तीही बोगस वाटते.चवच नाही. आता या सगळ्यावर एक प्रकारे शिक्का मोर्तब झाले आहे.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (इऊ) पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील आंबी येथील अव्हेन्यू सुपरमार्ट्स लिमिटेड अर्थात डी-मार्टच्या गोदामावर छापा टाकून २० हजार ८५ लिटर खाद्यतेलाचा साठा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या या साठ्याची किंमत ५० लाख २७ हजार ८९३ रुपये आहे.

खाद्यतेलाचा हा साठा कमी दर्जाचा आणि त्यावर दिशाभूल करणारे लेबल लावण्यात आल्याचा प्राथमिक संशय प्रशासनाने व्यक्त केला आहे.जर कारवाई झाली नसती तर आपण सगळे हाच माल विकत घेऊन खात राहिलो असतो.आता कंपन्यांवर धाड टाकून हे तपासले पाहिजे की लोकांना डिस्काऊंट देण्याच्या नावाखाली कमी दर्जाचा माल बनवून विकला जात आहे का? आम्ही आता तिथून अन्न पदार्थ खरेदी करणे बंद केले आहे।

मिलिंद धुमाळे

जागतिक प्रतिजैविक जागरूकता सप्ताह

आज मानवाचे आरोग्य हे केवळ त्याच्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. निसर्गाच्या अफाट पटावर माणूस, प्राणी, वनस्पती आणि पर्यावरण हे एकाच अदृश्य धाग्याने विणलेले आहेत. यातील एक जरी धागा कमकुवत झाला, तर संपूर्ण जीवसृष्टीचे संतुलन ढळते.'१८ ते २४ नोव्हेंबर' दरम्यान साजऱ्या होणाऱ्या 'जागतिक प्रतिजैविक जागरूकता सप्ताह २०२६' ची 'एक आरोग्य, एक कृती: आताच सूक्ष्मजीव प्रतिरोध रोखा' ही संकल्पना नेमक्या याच सत्यावर बोट ठेवते.गेल्या शतकात आज या जीवनरक्षक औषधांच्या अतिवापरामुळे आणि बेजबाबदार हाताळणीमुळे सूक्ष्मजीवांनी स्वतःभोवती प्रतिकारशक्तीचे अभेद्य कवच उभारले आहे.या प्रक्रियेला वैद्यकीय भाषेत 'अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स' अर्थात प्रतिजैविक प्रतिकारशक्ती म्हणतात. याने आज जागतिक महामारीचे रूप धारण केले आहे. आकडेवारीचा विचार करता, जिवाणूजन्य प्रतिरोधामुळे दरवर्षी जगभरात ४७ लाखांहून अधिक मृत्यू होत आहेत आणि वेळीच पावले उचलली नाहीत, तर २०५० पर्यंत हा आकडा ३.९ कोटींपर्यंत पोहोचण्याची भीती आहे.

यंदाची संकल्पना आपल्याला एका महत्त्वाच्या वास्तवाची जाणीव करून देते की, हे संकट केवळ रुग्णालयांच्या चार भिंतींपुरते मर्यादित नाही. काळ बदलला, तशी आपली जीवनशैली आणि आजारांकडे पाहण्याची दृष्टीही बदलली. आज आपल्याला 'तात्काळ' (इन्स्टंट) सर्वकाही हवे असते. साधा घसा खवखवला, थोडा ताप आला किंवा सर्दी झाली की आपण डॉक्टरांचा सल्ला घेण्याऐवजी थेट औषधांच्या दुकानाचा रस्ता धरतो किंवा घरात उरलेल्या जुन्या गोळ्या गट्टम करतो. या 'स्व-वैद्यका'च्या (सेल्फ-मेडिकेशन) हव्यासापायी आणि औषधांचा कोर्स अर्धवट सोडण्याच्या सवयीमुळे, आपण शरीरातील मित्र-जीवाणूंचा तर नाश करतोच, पण शत्रू-जीवाणूंना अधिक बलवान बनवतो. तेव्हा आपण या संकटाचे एक बीज पेरतो. दुसरीकडे, पशुपालन, कुक्कुटपालन आणि शेतीमध्ये उत्पादकता वाढवण्यासाठी होणारा प्रतिजैविकांचा अनियंत्रित वापर हा अन्नसाखळीतून आपल्याच ताटात विष कालवत आहे.तसेच, औषध कारखान्यांचे सांडपाणी आणि उरलेल्या औषधांची चुकीच्या पद्धतीने केलेली विल्हेवाट यांमुळे माती आणि पाणीही या प्रतिकारक्षम जिवाणूंचे आगार बनत आहे.जागतिक आरोग्य संघटनेने या संकटाला 'मूक महामारी' (सायलेंट पँडेमिक) असे संबोधले आहे. कोरोनाच्या लाटेत आपण एका विषाणूने जग कसे थांबवले ते पाहिले आहे; पण प्रतिजैविक प्रतिकारशक्तीचे संकट त्याहूनही अधिक संथ, पण तितकेच विनाशकारी आहे. यावर मात करण्यासाठी केवळ सरकारचे नियम किंवा डॉक्टरांचे प्रयत्न पुरेसे नाहीत, तर समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. निसर्गानेङ आणि विज्ञानाने दिलेले हे वरदान आपल्या अविवेकाने शाप ठरू नये, हीच या काळाची हाक आहे. डॉक्टर, पशुवैद्य, शेतकरी, पर्यावरणतज्ज्ञ, धोरणकर्ते आणि सर्वसामान्य नागरिक या सर्वांनी एकाच दिशेने पाऊल टाकणे गरजेचे आहे.

डॉक्टरांनी अनावश्यक प्रतिजैविके लिहून देणे टाळणे, शेतकऱ्यांनी शेती व पशुधनासाठी नैसर्गिक आणि सुरक्षित पर्याय निवडणे, आणि नागरिकांनी डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधे न घेणे—या छोट्या वाटणाऱ्या कृतीच या संकटावर रामबाण उपाय ठरू शकतात.औषधांचा विवेकी वापर हाच निरोगी उद्याचा खरा राजमार्ग आहे.आज आपण घेतलेला प्रत्येक निर्णय हा उद्याच्या पिढीचे भविष्य ठरवणार आहे. निसर्ग आणि विज्ञान यांच्यातील सुसंवाद टिकवून ठेवण्यासाठी 'आताच कृती करणे' ही काळाची गरज आहे. 'एक आरोग्य, एक कृती' हा मंत्र आत्मसात करूया आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी एक निरोगी, सुरक्षित 'उद्या' घडवूया!

तारा व्दा शर्मा

■ मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

पाणीपट्टी माफीचा प्रस्ताव फेटाळला; सभागृहातील रेकॉर्डिंगवरही बंदी!

मनपा सभेत सत्ताधारी-विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात १५ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होत असताना नागरिकांकडून मात्र वर्षभराची पाणीपट्टी वसूल केली जात आहे. दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीपट्टीसह एक वर्षाचा मालमत्ता कर माफ करावा, अशी विरोधकांची मागणी अकोला महानगरपालिकेच्या सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत सत्ताधाऱ्यांनी फेटाळून लावली.

दुसरीकडे, सभागृहाचे थेट प्रक्षेपण बंद केल्यानंतर आता नगरसेवकांच्या मोबाईल व्हिडिओ रेकॉर्डिंगवरही बंदी घालण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे सभागृहात सत्ताधारी भाजप-शहर सुधार आघाडी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. अंडरपासमधील साचलेल्या पाण्यात बसून शिंदे शिवसेनेचे नगरसेवक सागर भारुका यांनी केलेल्या आंदोलनाने सभेच्या राजकीय वातावरणात आणखी भर घातली.

एकूणच, पाणीटंचाई, करमाफी, घनकचरा ठेका आणि सभागृहातील पारदर्शकता या चार मुद्द्यांवरून सोमवारी झालेली मनपा सभा राजकीय संघर्षाचे केंद्र ठरली. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले असले, तरी पाणीपट्टी माफीचा प्रश्न मात्र फेटाळून लावला आहे .

पाणीटंचाई नागरिकांच्या माथी, करमाफीला मात्र नकार!

शहरातील नागरिकांना पंधरा दिवसांतून एकदा पाणी मिळत असताना संपूर्ण वर्षाची पाणीपट्टी वसूल करणे कितपत योग्य, असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यंदाची पाणीपट्टी आणि एक वर्षाचा मालमत्ता कर माफ करण्याची मागणी त्यांनी केली. घनकचरा व्यवस्थापनाच्या ठेकेदाराला अमरावती, नागपूर आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांपेक्षाही अधिक निधी दिला जात असल्याचा आरोप करीत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना जाब विचारला.

'ठेकेदारांना देण्यासाठी निधी उपलब्ध आहे; मग नागरिकांना पंधरा दिवसांतून एकदा पाणी देऊन पूर्ण वर्षाचा कर कशासाठी?' असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. मात्र, करमाफीचा प्रस्ताव मान्य न करता सत्ताधाऱ्यांनी पाणीटंचाईवरील उपाययोजनांचे ठराव मंजूर केले. त्यामुळे पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या नागरिकांना करमाफीच्या बाबतीत दिलासा मिळाला नाही.

लाईव्ह बंद, आता मोबाईल रेकॉर्डिंगवरही पहारा !

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतील कामकाजाचे थेट प्रक्षेपण यापूर्वीच बंद करण्यात आले आहे. त्यात आता सभागृहातील कामकाजाचे मोबाईलद्वारे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यास मनाई करणारा ठरावही बहुमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले.

अमरावती, चंद्रपूर आणि छत्रपती संभाजीनगर महापालिकांमध्ये लाईव्ह प्रक्षेपण सुरू असताना अकोल्यातच ते बंद का, असा सवाल विरोधकांनी केला. 'ज्याप्रमाणे चोर सीसीटीव्हीला घाबरतो, त्याचप्रमाणे भाजप लाईव्ह प्रक्षेपणाला घाबरते,' अशी बोचरी टीका करीत विरोधकांनी सभागृहातच हा मुद्दा लावून धरला. यावेळी कायद्याच्या तरतुदींचे वाचन आणि शेरोशायरीतूनही एकमेकांना प्रत्युत्तरे देण्यात आली. सभागृहाचे कामकाज शिस्तबद्ध पद्धतीने चालावे, यासाठी रेकॉर्डिंग बंदीचा निर्णय घेतल्याचे सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट केले.

अंडरपासच्या पाण्यात बसून भारुका यांचे आंदोलन

सर्वसाधारण सभेपूर्वीच शहराच्या मध्यवर्ती भागातील अंडरपासमध्ये साचलेल्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला. नागरिकांना दररोज होणारा त्रास प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शिंदे शिवसेनेचे नगरसेवक सागर भारुका यांनी थेट साचलेल्या पाण्यात बसून आंदोलन केले. त्यानंतर सभागृहात प्रवेश करून त्यांनी हा प्रश्न आक्रमकपणे उपस्थित केला. त्यामुळे सभेच्या सुरुवातीलाच वातावरण तापले.

पाणीटंचाईवर उपाययोजनांचे ठराव

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शहरातील हायड्रम आणि विहिरींवर पंप बसविणे, पाण्याची उपलब्ध क्षमता तपासणे तसेच अवैध नळजोडण्या नियमित करण्यासंदर्भातील प्रस्ताव मंजूर करण्यात आले. मात्र, विहिरी आणि बोअरवेलचे प्रत्यक्ष सर्वेक्षण न करता केवळ कागदोपत्री सर्वेक्षण केल्याचा आरोप विरोधकांनी केला. त्यामुळे मंजूर झालेल्या उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कमानींच्या प्रस्तावाला मंजुरी; स्थायी समितीवर मोहोकार

सभेत प्रभाग क्रमांक ६ आणि ११ मध्ये कमान बांधण्याबाबत नगरसेवक चांद चौधरी यांनी दिलेल्या निवेदनावरील प्रस्ताव चर्चेला आला. विरोधकांनी विरोध दर्शविल्यानंतरही चर्चेअंती या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ४ च्या नगरसेविका पल्लवी मोरे यांना शासकीय नोकरी लागल्याने त्यांनी राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्यपदी नगरसेवक अमोल मोहोकार यांची एकमताने निवड करण्यात आली.

दीड वर्षापासून रस्ता उखडलेलाच; ग्रामस्थांचा सात दिवसांचा अल्टिमेटम!

करोडी फाटा-जऊळखेड बु. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त

डांबरीकरण न झाल्यास उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

करोडी फाटा ते जऊळखेड बु. या मार्गाचे काम गेल्या दीड वर्षापासून रखडले असून, अर्धवट उखडलेल्या रस्त्यावरून प्रवास करताना परिसरातील नागरिकांना जीवघेणा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याचे डांबरीकरण तातडीने सुरू करावे, या मागणीसाठी संतप्त ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देत सात दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. निर्धारित मुदतीत काम सुरू न झाल्यास प्रशासनाविरोधात उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

करोडी फाटा ते जऊळखेड बु. हा रस्ता उखडून त्यावर केवळ गिट्टी टाकण्यात आली आहे. त्यानंतर डांबरीकरणाचे काम रखडल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. वाहनांच्या वर्दळीमुळे गिट्टी उडणे, धुळीचे लोट निर्माण होणे आणि रस्त्याच्या दुतर्फा झाडाझुडपांचे साम्राज्य वाढणे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांसह सर्वच वाहनधारकांना अपघाताचा धोका पत्करावा लागत आहे. आतापर्यंत चार ते पाच अपघात झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

काही दिवसांपूर्वी याच रस्त्यावर एका महिलेचा अपघात झाला. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, रस्त्यावरील गिट्टी आणि बारीक खडी डोक्यात घुसल्याची माहिती नातेवाइकांनी दिली. धुळीमुळे लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी रुग्णाला रुग्णालयात घेऊन जाण्याची वेळ आल्यास रस्त्याच्या दुरवस्थेमुळे उपचारासाठी पोहोचण्यास विलंब होण्याची भीती व्यक्त होत आहे. गर्भवती महिला आणि आपत्कालीन रुग्णांसाठी तर हा मार्ग मोठे संकट ठरत आहे.

अकोट तालुक्यातील शेवटच्या टोकावरील गावांना जोडणारा आणि अमरावतीकडे जाण्यासाठी सोयीचा शॉर्टकट असलेला हा मार्ग करोडी, धारेल, रेल, गिरजापूर, जऊळखेड बु., जऊळखेड खुर्द आणि ठोकबर्डी या गावांसाठी महत्त्वाचा आहे. यापूर्वीही रस्त्याच्या कामाबाबत अनेकदा तोंडी व लेखी तक्रारी करण्यात आल्या; मात्र त्याची दखल घेतली नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे.

अखेर सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेना-प्रहारचे जीवन खवले यांच्याकडे ग्रामस्थांनी कैफियत मांडली. खवले यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष रस्त्यावर बोलावून ग्रामस्थांसमक्ष समस्येची तीव्रता निदर्शनास आणून दिली. यावेळी सुमारे ५० ते ६० ग्रामस्थांच्या उपस्थितीत विभागाला लेखी निवेदन सादर करण्यात आले. सात दिवसांत डांबरीकरणाचे काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली असून, अन्यथा उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, तहसीलदार, अकोटचे आमदार आणि दहीहंडा पोलीस ठाण्याच्या ठाणेदारांना देण्यात आल्या आहेत. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी ग्रामस्थ, ऑटोचालक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आठ दिवसांत काम मार्गी लावणार!

रस्त्याच्या प्रश्नावर ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे पी. एस. धाकुरकर यांनी येत्या आठ दिवसांत रस्त्याचे काम मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते की ग्रामस्थांना पुन्हा आश्वासनावरच समाधान मानावे लागते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

अपघातात जखमी झालो, ऑपरेशनसाठी पैसे नाहीत!

'रस्ता अपूर्ण आणि खराब असल्यामुळे माझा याच मार्गावर अपघात झाला. डॉक्टरांनी ऑपरेशन करण्यास सांगितले आहे; मात्र माझ्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत. आणखी किती अपघात झाल्यानंतर प्रशासन जागे होणार? हा रस्ता तातडीने डांबरीकरण करून द्यावा.'

काशीराम रायबोले,
जऊळखेड खुर्द

.....

संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला लेखी निवेदन देण्यात आले आहे. सात दिवसांत डांबरीकरणाचे काम सुरू करण्याची आग्रही मागणी केली आहे. अन्यथा उपोषण करण्यात येईल.

- जीवन खवले

सीता हरण हा रामायणातील बिकट प्रसंग -हभप मुकेश महाराज

■ प्रतिनिधी | अकोला ■

रामायणाची कथा जगभर प्रसिद्ध असली, तरी तिला नवी दिशा देणारा निर्णायक प्रसंग म्हणजे सीता हरण होय. रावणाने माता सीतेचे हरण केल्यानंतरच राम-रावण यांच्यातील धर्मयुद्धाची पार्श्वभूमी तयार झाली आणि रामायणाची कथा अधिक तीव्र व भावनिक बनली.म्हणून हा प्रसंग अत्यंत बिकट असल्याचे प्रतिपादन सांगळूद येथील रामायणकार हभप मुकेश महाराज आखरे यांनी केले.

दाबकी रोड येथील आश्रय नगरातील हनुमान शिव मंदिर काकडा आरती मंडळाच्या वतीने वै. श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सुरू असलेल्या संगीतमय रामायण कथेत कथाकार हभप मुकेश महाराज आखरे यांनी रामकथेत सीता हरण प्रसंग सादर केला.ते म्हणाले,सीता हरण हा केवळ एक घटनाक्रम नसून, संपूर्ण रामायणाला गती देणारा प्रसंग आहे. या प्रसंगामुळे रावणाचा अहंकार, अधर्म आणि स्त्री-अपमान उघड होतो; तर श्रीरामांचे धैर्य, मर्यादा आणि धर्मरक्षणाचे कर्तव्य अधिक स्पष्ट होते असे त्यांनी यावेळी सांगितले.सीता हरण झाकीत रामाची भूमिका ज्ञानेश्वर अवातिरक यांनी, रावण दिलीप मोडक यांनी,लक्ष्मण यश बोर्डे,सिताची भूमिका सौ जया मोड़क यांनी केली.

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, अकोला यांचे न्यायालय क. ०४ अकोला

कि. फौजदारी अर्ज क. १४०८/२०२६ चौ. ता. २८/१२/२०२६

जाहीरनामा

अर्जदार :- बसवंत मोनाजी वानखडे

... विरूध्द...

गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यु नोंदणी विभाग म.न.पा. अकोला.

वि. न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा नामे स्वप्नील बसवंत वानखडे यांचा जन्म दि. ३०/०७/१९९१ रोजी त्यांचे राहते घरी शंकर नगर, अकोला येथे झाला असुन त्यांच्या जन्माची नोंद निबंधक, म.न.पा. अकोला यांच्याकडे नसल्याकारणाने त्यांच्या जन्माची नोंद होण्याकरीता अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३अ) नुसार अर्ज या न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद होणे संदर्भात कोणालाही काही आक्षेप / हरकत घ्यायची असल्यास त्यांनी पुढील चौकशी तारीख दि. २८/१२/२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी स्वतः किंवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा. जर चौकशी तारीख दि. २८/१२/२०२६ रोजी पर्यत कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कोणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचीत करण्यात येत आहे. आज दिनांक २१ माहे नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी
प्र. श्रेणी कोर्ट क. ०४, अकोला

जाहीर नोटीस

वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८१८/२०२६ प्रोसेस नं.१४६२४/२०२६

चौ.ता. १९/१२/२०२६ दिनांक : २१/११/२०२६

अर्जदार : १. निशाबेन अफसर अली शाह लग्नाअगोदरचे नाव उषा हरिभाउ पांडे रा. ४२ ग्रीन पार्क सोसायटी रानदेर रोड, सुरत, ता. जि. सुरत, गुजरात ३९५००५

विरुध्द

गैरअर्जदार : सौ. आशाबाई जानराव उमाळे रा. शिवाजी चौक, कुरणखेड, ता. जि. अकोला

मयताचा पत्ता :- मयत : १. गुंफाबाई हरिभाउ पांडे

पत्ता :- रा. शिवाजी चौक, कुरणखेड, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, गुफाबाई हरिभाउ पांडे यांचे दि. २८/०३/२०२६ रोजी कुरणखेड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९ / १२ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१ / ११ / २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.३९३/२०२६ प्रोसेस नं.१२४४/२०२६

चौ.ता. ११/०१/२०२७ दिनांक : २१/११/२०२६

अर्जदार : १. राजु मांगिलाल वाघमारे -वय ६१ वर्षे, धंदा-शेती २. विश्वनाथ मांगिलाल वाघमारे -वय ४५ धंदा - शेती ३. लिलाबाई मांगिलाल वाघमारे -वय ७५ वर्षे, धंदा-घरकाम ४. मिराबाई पुंडलिक मेसरे - वय ५२ वर्षे, धंदा-घरकाम ५. कमला प्रकाश चवरे- वय ४६ वर्षे, धंदा-घरकाम ६. विमल संजय चवरे- वय ४३ वर्षे, धंदा-घरकाम अर्जदार क्र. १ ते ३ रा. माळेगांव बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. ४ रा. सस्ती, ता. पातुर, जि. अकोला अर्जदार क्र. ५ व ६ रा. नर्सीपुर (पंचगव्हाण), ता. तेल्हारा, जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ६ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क १, २, ४, ५ व ६ यांचे वडील व अर्जदार क. ३ चे पती मयत नामे मांगिलाल रावजी वाघमारे हे दि. ०२/१०/२०२६ रोजी मौजे माळेगांव बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ११/०१/२०२७ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २०/११/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक ३४७/२०२६ चौ. ता. २२/१२/२०२६

अर्जदार : नसीम शाह रशीद शाह रा. अडगांव खुर्द, ता. अकोट, जि. अकोला

...विरूध्द...

गैरअर्जदार : सचिव ग्राम पंचायत अडगांव खुर्द ता. अकोट, जि. अकोला

विरुध्द

ज्या अर्थी अर्जदार नसीम शाह रशीद शाह ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदार स्वत: नामे नसीम शाह रशीद शाह यांचा जन्म दिनांक २३/०१/२००७ रोजी अडगाव खुर्द, ता. अकोट, जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोंटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक: २३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक ३६४/२०२६ चौ. ता. २३/१२/२०२६

अर्जदार : रशीद शॉ रफु शॉ रा. अडगांव खुर्द, ता. अकोट, जि. अकोला

...विरूध्द...

गैरअर्जदार : सचिव ग्राम पंचायत अडगांव खुर्द ता. अकोट, जि. अकोला

विरुध्द

ज्या अर्थी अर्जदार रशीद शॉ रफु शॉ ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे रशीद शॉ रफु शॉ यांचा जन्म दिनांक ०४/०५ / १९६८ रोजी अडगाव खुर्द, ता. अकोट, जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक: २३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

मतदार नोंदणीसाठी २८ व २९ नोव्हेंबरला विशेष शिबिरे

अकोला : विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार श्रेणीतील मतदारांना मतदार यादीत नाव नोंदविणे सुलभ व्हावे, यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर शनिवार, दि. २८ नोव्हेंबर आणि रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. तरी संबंधित नागरिकांनी शिबिरांद्वारे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने यासंदर्भात सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी आणि संबंधित यंत्रणांना निर्देश दिले आहेत. दि. १८ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रपत्रांचे वितरण व संकलन केले जाईल.

पाच वर्षांच्या विकासनिधीचा हिशेब गुलदस्त्यात?

- माहिती अधिकारातील अर्जाला प्रतिसाद नाही;
- शिवण खुर्दच्या ग्रामस्थाचे पंचायत समितीसमोर आमरण उपोषण

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शिवण खुर्द ग्रामपंचायतीला सन २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीत प्राप्त झालेल्या विविध विकासनिधींचा आणि त्यातून करण्यात आलेल्या कामांचा हिशेब मागूनही माहिती मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत वारंवार पाठपुरावा करूनही माहिती मिळाली नसल्याचा आरोप करीत शिवण खुर्द येथील रहिवासी रोशन मोतीगीर गिरी यांनी पंचायत समिती, मूर्तिजापूर कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

गिरी यांनी ९ सप्टेंबर २०२६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(१) अन्वये ग्रामपंचायत शिवण खुर्द आणि पंचायत समिती प्रशासनाकडे माहिती मागितली होती. विशेष म्हणजे, अर्जदार दारिद्र्यरेषेखालील असूनही कायद्याने निर्धारित मुदतीत त्यांना मागितलेली माहिती मिळाली नाही. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल करूनही प्रशासनाकडून दखल घेतली गेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



पाच वर्षांतील निधी आणि खर्चाचा हिशेब मागितला

ग्रामपंचायतीला प्राप्त झालेला १५ वा वित्त आयोगाचा निधी, जिल्हा परिषदेकडून मिळालेला निधी, दलित वस्ती सुधारणा योजनेतील अनुदान, नवीन ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामासाठी मंजूर निधी तसेच ग्रामपंचायतीचा वार्षिक स्वनिधी व इतर शासकीय अनुदानाच्या विनियोगाची माहिती गिरी यांनी मागितली आहे.

यामध्ये केवळ निधी प्राप्ती आणि खर्चाचा तपशीलच नव्हे, तर झालेल्या विकासकामांची मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रके, कामांची ठिकाणे आणि संबंधित देयकांच्या प्रमाणित प्रतींचीही मागणी करण्यात आली आहे. नवीन ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे की नाही, अपूर्ण असल्यास त्यामागील कारणे काय, याचाही खुलासा मागण्यात आला आहे.

माहिती दडपण्यामागचे कारण काय?

पाच वर्षांच्या विकासनिधीचा तपशील देण्यास प्रशासनाकडून होत असलेल्या विलंबामुळे माहिती जाणीवपूर्वक दडपली जात आहे का, असा सवाल गिरी यांनी उपस्थित केला आहे. ग्रामपंचायतीच्या विकासकामांवर सार्वजनिक निधी खर्च होत असताना त्याचा हिशेब नागरिकांना मिळणे हा त्यांचा कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे माहिती तातडीने उपलब्ध करून द्यावी, तसेच जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्या संबंधित जनमाहिती अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात गटविकास अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. उपोषणादरम्यान प्रकृती बिघडल्यास अथवा जीवितास काही बरेवाईट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. आता या प्रकरणात पंचायत समिती प्रशासन काय भूमिका घेते आणि शिवण खुर्द ग्रामपंचायतीच्या पाच वर्षांच्या निधीचा हिशेब कधी उघड होतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

गांधी जिल्ह्यात अमली पदार्थांचे कारखाने; तरुणाई नशेच्या विळख्यात

मेफेड्रोन कारखाना अन् १४२ किलो डोडा पावडर जप्तीने खळबळ; खा. अमर काळेंची थेट अमित शाहांकडे धाव

वर्धा / जनमाध्यम.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या वर्धा जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाने डोके वर काढले आहे. मेफेड्रोनसारख्या घातक अमली पदार्थांचा कारखाना उघडकीस येणे आणि त्यानंतर कारंजा घाडगे परिसरात तब्बल १४२ किलो डोडा पावडरचा साठा जप्त होणे, या घटनांनी जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या काळ्या साम्राज्याचे गांभीर्य अधोरेखित केले आहे. कारंजा घाडगे परिसर अमली पदार्थांच्या उत्पादन आणि तस्करीचे केंद्र बनत असल्याची चिंता व्यक्त होत असतानाच, या संपूर्ण जाळ्याचा पर्दाफाश करण्यासाठी खासदार अमर काळे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे धाव घेतली आहे. केंद्रीय तपास यंत्रणांमार्फत या प्रकरणांची सखोल चौकशी करून तस्करीच्या मुळावर घाव घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.



वर्धा जिल्ह्यात यापूर्वी मेफेड्रोन निर्मितीशी संबंधित कारखान्याचा पर्दाफाश झाला होता.

या घटनेची चर्चा शांत होत नाही तोच कारंजा परिसरात १४२ किलो डोडा पावडरचा मोठा साठा जप्त करण्यात आला. लागोपाठ उघडकीस आलेल्या या घटनांमुळे जिल्ह्यात अमली पदार्थांचा पुरवठा नेमका कुठून होतो, यामागे कोणत्या शक्ती कार्यरत आहेत आणि या अवैध व्यवसायाचे आर्थिक सूत्रधार कोण आहेत, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

हा व्यवसाय केवळ किरकोळ विक्रीपुरता मर्यादित नसून त्यामागे संघटित यंत्रणा कार्यरत असण्याची शक्यता खासदार काळे यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रातून व्यक्त केली आहे.

या पत्राची प्रत महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक आणि नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनाही पाठविण्यात आली आहे. आता केंद्रीय गृहमंत्रालय, नार्कोटिक्स यंत्रणा आणि राज्याच्या गृह विभागाकडून कोणती पावले उचलली जातात, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. गांधी विचारांचा वारसा जपणाऱ्या वर्ध्यात तरुणाईला नशेच्या विळख्यापासून वाचविण्याची जबाबदारी केवळ एका विभागाची नसून संपूर्ण यंत्रणेची आहे.

▪ केंद्रीय यंत्रणांच्या विशेष मोहिमेची मागणी

वर्धा जिल्ह्यात केंद्रीय नार्कोटिक्स यंत्रणांमार्फत विशेष तपासणी व निगराणी अभियान राबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, राज्य पोलीस आणि जिल्हा पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय साधून अमली पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी. संशयित आर्थिक व्यवहार, अवैध संपत्ती आणि तस्करीतून उभे राहिलेले आर्थिक स्रोतही तपासाच्या कक्षेत आणावेत, असे खासदारांनी पत्रात नमूद केले आहे.

▪ किरकोळ विक्रेते नव्हे, सूत्रधारांवर घाव घाला

अमली पदार्थांच्या व्यवसायात प्रत्यक्ष पकडल्या गेलेल्या आरोपींवर कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. उत्पादन करणारे, पुरवठा करणारे, वाहतूक करणारे, विक्रीचे जाळे चालविणारे आणि या व्यवहारातून आर्थिक लाभ मिळविणारे मुख्य सूत्रधार शोधणे गरजेचे आहे. मेफेड्रोन कारखाना आणि डोडा पावडर जप्ती या दोन्ही प्रकरणांची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करून संपूर्ण साखळी उघड करावी, अशी ठाम भूमिका खासदार काळे यांनी घेतली आहे.

▪ गांधी जिल्ह्याच्या तरुणाईला नशेपासून वाचवा

अमली पदार्थांच्या वाढत्या उपलब्धतेचा सर्वाधिक धोका शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, किशोरवयीन मुले आणि बेरोजगार तरुणांना आहे. व्यसनामुळे तरुणांचे शैक्षणिक भविष्य उद्ध्वस्त होण्यासोबतच कुटुंबांचे आर्थिक आणि सामाजिक स्वास्थ्यही धोक्यात येऊ शकते. त्यामुळे केवळ पोलीस कारवाई न करता शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागात व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. व्यसनाधीन तरुणांसाठी उपचार, समुपदेशन आणि पुनर्वसनाची व्यवस्था करावी, अशी सूचनाही खासदार काळे यांनी केली आहे.

तस्करीच्या मुळाशी पोहोचून कारवाई होणार की पुन्हा केवळ जप्ती आणि अटकेपुरतीच मोहीम मर्यादित राहणार, हा प्रश्न आहे.

कर्जाच्या ताणातून तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सेलू - तालुक्यातील घोराड येथील वार्ड क्रमांक १ मध्ये ३८ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. प्रशांत भोजराज ढोबळे असे मृत तरुणाचे नाव असून, ही घटना रविवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली.प्राप्त माहितीनुसार, प्रशांत ढोबळे हे कर्जाचा वाढता ताण आणि काही घरगुती कारणांमुळे मानसिक तणावात असल्याचे सांगण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे घोराड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल दादा लटारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, सेलू पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नल्लावार आणि पोलीस अंमलदार नितीन डाकोडे यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला.या प्रकरणी सेलू पोलिसांनी नोंद घेतली असून, तरुणाच्या आत्महत्येमागील नेमकी कारणे आणि घटनेचा पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

उपचार दरम्यान महिलेचा मृत्यू

कारंजा घाडगे - तालुक्याच्या सावळी खुर्द येथील वृध्द महिलेने विष प्राशन केल्याने त्यांना उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु, त्यांचा उपचार दरम्यान मृत्यू झाला. शांताबाई खंडाते (६०) असे मृतक महिलेचे नाव आहे. सावळी खुर्द येथील शांताबाई खंडाते यांनी काही दिवसांपूर्वी विष प्राशन केले होते. त्यांना कारंजा येथील रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु, प्रकृती अधिक अस्वस्थ असल्याने त्यांना नागपूरयेथील रुग्णालयात नेण्यात आले. काही दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी कारंजा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

तलवार घेऊन दहशत; महिलेसह युवकावर गुन्हा

पुलगाव - हातात तलवारी घेऊन गावात दहशत निर्माण करणाऱ्या महिलेसह युवकावर पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही घटना २१ नोव्हेंबर रोजी सोनोरा (ढोक) येथे घडली. प्राजक्ता ढोक (४५) आणि विक्की ढोक (३५) अशी आरोपींची नावे आहेत.गावात महिला आणि युवक तलवारी घेऊन नागरिकांमध्ये दहशत पसरवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता दोघेही तलवारी घेऊन फिरताना आढळले. पोलिसांनी शिताफीने दोघांना ताब्यात घेत तलवारी जप्त केल्या. महिला पोलिस शिपाई दुर्गा चव्हाण आणि पोलिस शिपाई सोमेश गंधाडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार कुणाल हिवसे तपास करीत आहेत.

शेतातील मचानावर युवकाची आत्महत्या

तळेगाव शामजीपंत- कारंजा तालुक्यातील रगडगाव येथील ३५ वर्षीय युवकाने शेतातील मचानावर गळफास घेऊन आत्महत्या केली. श्रावण अवथळे असे मृत युवकाचे नाव असून, ही घटना २१ नोव्हेंबर रोजी घडली.श्रावण हा रानवाडी परिसरातील शेतात कामासाठी गेला होता. काही वेळानंतर त्याचा मोठा भाऊ शेतात पोहोचला असता श्रावण मचानावर गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस उपनिरीक्षक मनोज शेंडे पुढील तपास करीत आहेत.

दारूच्या नशेत पोलिसांना दिली खोटी माहिती

वडनेर- पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी ११२ क्रमांकावर खोटी माहिती देणाऱ्या मद्यधुंद इसमाविरुद्ध वडनेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सूरज थुल (४०), रा. कुटकी असे आरोपीचे नाव आहे. ही कारवाई २१ नोव्हेंबर रोजी करण्यात आली.सूरज थुल याने ११२ क्रमांकावर फोन करून आपल्याला शिवीगाळ होत असून त्रास दिला जात आहे, पोलिसांची मदत हवी असल्याचे सांगितले. माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक अनिल वाघमारे घटनास्थळी पोहोचले.

मात्र, सूरज उडवाउडवीची उत्तरे देत होता. पंचांसमक्ष त्याच्या तोंडातून दारूचा उग्र वास येत असल्याचे निदर्शनास आले. वैद्यकीय तपासणीतही त्याने मद्यप्राशन केल्याचे स्पष्ट झाले. खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास अनिल वाघमारे करीत आहेत.

गोठ्यातून शेळी आणि पिल्लाची चोरी

आष्टी शहीद : घराशेजारील गोठ्यात बांधून ठेवलेली शेळी आणि तिचे पिल्लू अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना लहान आर्वी येथे उघडकीस आली. या चोरीत पशुपालकाचे १७ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.जगदीश प्रजापती (५२) हे शेतीसोबत शेळीपालनाचा व्यवसाय करतात. त्यांच्याकडे दोन शेळ्या आणि चार पिल्ले आहेत. २० नोव्हेंबरच्या रात्री त्यांनी सर्व शेळ्या व पिल्लांना घराशेजारील गोठ्यात बांधले होते. मात्र, मध्यरात्री पाहणी केली असता एक शेळी आणि एक पिल्लू गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शोध घेऊनही जनावरे न मिळाल्याने त्यांनी आष्टी पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मतदार याद्यांचा घोळ; जिवंतांना ठरविले मृत, गावात राहणाऱ्यांना दाखविले स्थलांतरित

खा.अमर काळे आक्रमक; अंतिम यादीपूर्वी संपूर्ण फेरतपासणीची मागणी

वर्धा/जनमाध्यम

जिल्ह्यातील मतदार याद्यांच्या पडताळणीत गंभीर अनियमितता उघडकीस आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

जिवंत नागरिकांना मृत दाखविणे, गावात वास्तव्यास असलेल्या मतदारांना स्थलांतरित ठरविणे, तर एकाच व्यक्तीचे नाव अनेक गावांच्या मतदार यादीत समाविष्ट करणे, असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अंतिम करण्यापूर्वी संपूर्ण जिल्ह्यात फेरपडताळणी करून त्रुटी दूर कराव्यात, अशी आक्रमक मागणी खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जिल्ह्यात बीएलओमार्फत दोनदा तपासणी होऊनही मतदार याद्यांमधील गोंधळ कायम असल्याचे काळे यांनी पत्रात नमूद केले आहे. सेलू तालुक्यातील पळसगाव (बाई) येथील उदाहरण देताना त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गावात प्रत्यक्ष वास्तव्यास असलेल्या २१ मतदारांना स्थलांतरित दाखविण्यात आले, तर सात जिवंत नागरिकांना मृत घोषित करून यादीतून वगळण्यात आले. एवढेच नव्हे, तर दहा मतदारांची नावे पळसगावसह अन्य गावांच्या याद्यांमध्येही असल्याचे निदर्शनास आले आहे.या प्रकारामुळे पात्र मतदार मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. संबंधित बीएलओंच्या कामकाजाची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

ग्रामसभेतच वाचून दाखवा मतदार यादी

गावोगावी ग्रामसभा घेऊन मतदार यादी वाचून दाखवावी, ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर यादी प्रसिद्ध करावी, सर्व आक्षेपांचे निरसन झाल्यानंतरच अंतिम यादी जाहीर करावी, तसेच नाव वगळताना किंवा समाविष्ट करताना कुटुंबीयांचे स्वाक्षरीयुक्त संमतीपत्र घ्यावे, अशा प्रमुख मागण्या काळे यांनी केल्या आहेत. आता जिल्हा प्रशासन या गंभीर तक्रारीची कितपत दखल घेते, याकडे जिल्हाबासीयांचे लक्ष लागले आहे.

मोर्चापूर शिवारात रानडुकरांचा हैदोस; एक एकरातील कपाशी भुईसपाट

कापूस वेचणीच्या तोंडावर शेतकऱ्याला मोठा फटका; वनविभागाच्या बंदोबस्ताची मागणी

सेलू / जनमाध्यम

शेतात राबून पिकविलेल्या कपाशीवर कापूस वेचणीच्या ऐन हंगामात रानडुकरांनी अक्षरशः ताव मारल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. मोर्चापूर शिवारातील मंदा रंगदेव माहुरे यांच्या शेतातील तब्बल एक एकरातील कपाशीचे पीक रानडुकरांनी उध्वस्त केले. वन्यप्राण्यांच्या वाढत्या हैदोसामुळे शेतकरी हतबल झाले असून, शेती करायची तरी कशी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



मंदा माहुरे यांनी वंदा आपल्या अडीच एकर शेतात कपाशीची लागवड केली होती. पिकाची वाढ चांगली झाली होती. कापूस वेचणीच्या तयारीत असतानाच रानडुकरांच्या कळपाने शेतात धुडगूस घातला. पिकाची नासधूस करीत एका एकरातील कपाशीचे मोठे नुकसान केले.

वर्षभराची मेहनत आणि उत्पादनाच्या अपेक्षांवर वन्यप्राण्यांनी पाणी फेरल्याने माहुरे यांच्यासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

मोर्चापूर शिवारात रानडुकरांचा उपद्रव सातत्याने वाढत असल्याने शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री पिकांची राखण करावी लागत आहे. वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे. या नुकसानीबाबत वनविभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वनविभागाने या गंभीर समस्येची दखल घेऊन रानडुकरांचा बंदोबस्त करावा, नुकसानग्रस्त शेताची तातडीने पाहणी करून पंचनामा करावा आणि मंदा माहुरे यांना नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

बाबासाहेबांच्या विचारांचा बालमनात जागर

अर्णव जगताप, विवान कांबळे प्रथम



वर्धा /जनमाध्यम

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर बालमनात रुजाविण्याच्या उद्देशाने जयभीम बुद्ध विहार आणि परिवर्तनधारा साहित्य कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या वक्तृत्वातून बाबासाहेबांचे शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक योगदान प्रभावीपणे मांडले.

स्पर्धा दोन गटांत घेण्यात आली. पहिल्या गटात इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये विवान कांबळे याने प्रथम, तपस्वी वाघमारे हिने द्वितीय, तर जेसिका डांगे हिने तृतीय क्रमांक पटकावला. दुसऱ्या गटात इयत्ता सहावी ते नववीमध्ये अर्णव जगताप याने प्रथम, विहार चिकाटे याने द्वितीय, तर सृष्टी इंगळे हिने तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. नागसेन बनसोड आणि रणजीत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रयासी डंभारे यांनी केले, तर कविश कांबळे यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांच्या भाषणांतून बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश उमटला. बालवयातच महापुरुषांचे विचार आत्मसात करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

चिमुकल्यांच्या डोक्यावर धोक्याची टांगती तलवार

आष्टी शहीद / जनमाध्यम

आष्टी तालुक्यातील दलपतपूर येथील 'अपना घर' इमारत मृत्यूचा सापळा बनली असून, ती कधीही जमीनदोस्त होण्याची शक्यता आहे. इमारतीचा आतील स्लॅब यापूर्वीच कोसळला असून, भिंतीही पूर्णपणे खिळखिळ्या झाल्या आहेत. विशेष म्हणजे, या धोकादायक इमारतीच्या अगदी परिसरात जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी केंद्र असल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. एखादी दुर्घटना घडून निष्पाप मुलांचे जीव गेल्यानंतरच ग्रामपंचायत प्रशासनाला जाग येणार का, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

वर्धा नदीच्या काठावर वसलेल्या दलपतपूर गावातील या इमारतीची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. इमारतीचा स्लॅब कोसळल्यानंतरही उर्वरित बांधकाम धोकादायक स्थितीत उभे आहे. भिंतींची अवस्था इतकी खराब झाली आहे की, त्या कधीही कोसळू शकतात. शाळा आणि अंगणवाडी परिसरात दररोज लहान मुलांची ये-जा सुरू असते. त्यामुळे इमारतीचा एखादा भाग कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची भीती नाकारता येत नाही.



दलपतपूरचे 'अपना घर' कधीही कोसळणार; तक्रारी करूनही ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

या इमारतीचे तातडीने निष्कासन करून संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य प्रदीप पाथरे यांनी वारंवार ग्रामपंचायत प्रशासनाकडे केली आहे. मात्र, त्यांच्या तक्रारींकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वारंवार सूचना देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दुर्घटनेची वाट पाहणारे प्रशासन, जबाबदार कोण

धोकादायक इमारतीचा प्रश्न गांभीर्याने घेण्याऐवजी प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित हा प्रश्न असतानाही निष्कासनाची कार्यवाही रखडली आहे. संभाव्य दुर्घटनेची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासनाने तातडीने पाहणी करून इमारतीभोवती सुरक्षितता उपाययोजना कराव्यात आणि तांत्रिक तपासणीनंतर धोकादायक बांधकाम हटवावे, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य प्रदीप पाथरे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४२,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक-३५६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती- ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल- atimadhyam@gmail.com, iramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई

-वाळूसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

भातकुली येथे अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कारवाई केली आहे. निंभा येथे रविवारी, दि. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ५.१५ वाजताच्या सुमारास कारवाई केली. या कारवाईत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करून वाळूसह अंदाजे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



परिविक्षाधीन उपविभागीय अधिकारी महेश घाटोळे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. गेल्या २२ दिवसांच्या कालावधीत भातकुली महसूल विभागाने ही पाचवी कारवाई केली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या निर्देशानुसार तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली भातकुली महसूल विभाग अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर लक्ष ठेवत आहे. या कारवाईत तहसीलदार अक्षय मांडवे, मंडळ अधिकारी संतोष धुर्वे, ग्राम महसूल अधिकारी संतोषसिंग गिल व ग्राम महसूल अधिकारी मनोज बेले यांनी सहभाग नोंदविला.

अमरावती मुद्रक संघाच्या बैठकीत कार्यकारिणीची निवड

-एकजुटीने काम करण्याचा निर्धार

अमरावती/प्रतिनिधीः-

अमरावती मुद्रक संघाच्या वतीने रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी साईनगर येथील हॉटेल द स्काय लिफ ईन इन येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला अमरावती शहरातील मुद्रण व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संघटनेच्या संघटनात्मक बांधणीसह भविष्यातील कार्याची दिशा निश्चित करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या सभेमध्ये अमरावती मुद्रक संघाच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यात आली. संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि समन्वयाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

अमरावतीच्या मुद्रण व्यवसायासमोरील विविध प्रश्न, व्यावसायिक अडचणी, मुद्रकांमधील परस्पर समन्वय, संघटनेची भविष्यातील वाटचाल तसेच सदस्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

आगामी काळात संघटनेच्या माध्यमातून कोणती कार्ये हाती घ्यावीत, सदस्यांच्या समस्या कशा सोडवाव्यात आणि संघटनेचे कार्य अधिक व्यापक कसे करावे, याबाबत उपस्थित सदस्यांनी विविध सूचना मांडल्या.

विशेष म्हणजे, संघटनेच्या आगामी कार्ययोजना आणि पुढील वाटचालीसंदर्भात मांडण्यात आलेल्या प्रस्तावांना उपस्थित सदस्यांनी एकमताने संमती दर्शविली. संघटनेच्या बळकटीकरणासाठी सहकार्य, एकजूट आणि सक्रिय सहभाग नोंदविण्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी चहा व स्वागताने झाली. त्यानंतर सकाळी ११ वाजता मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. विविध विषयांवरील चर्चा, संघटनात्मक निर्णय आणि कार्यकारिणी निवडीनंतर दुपारी स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

अमरावतीतील मुद्रण व्यावसायिकांना एका व्यासपीठावर आणणे, त्यांच्या व्यावसायिक प्रश्नांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, व्यावसायिक हितसंबंधांचे संरक्षण करणे तसेच संघटनेच्या माध्यमातून विविध विधायक उपक्रम राबविणे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही सभा अमरावती मुद्रक संघाच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३९०/२०२६
पुढील ता.१६.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicant

1. **Saleha Jamjan Syed Nazir,** Age 46 yrs. Occ.- Housewife R/o. Behind Namak Factory, Infront of Zubeda Hospital Asir Colony Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Farzana Fatima Naziroddin Pathan,** Age 42 yrs.,Occ.- Housewife R/o. Chamanshan Wali Camp, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. **Mohd. Sajid Mohd Anwar,** Age 40 yrs.Occ.- Labourer R/o. Behind Namak Factory, Infront of Zubeda Hospital Asir Colony Amravati, Tq. & Dist. Amravati
4. **Tasneem Fatema Sajidulla Khan,** Age 39 yrs.Occ.- Housewife R/o.Near Adv Shoeb Wakil House, Asir Colony, Amravati Tq. & Dist. Amravati
5. **Mujaheed Sarwar Mohd Anwar,** Age 33 yrs.Occ.- Labourer R/o. Behind Salt Factory, Aseer Colony, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

Non- Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Fatema Bee Mohammad Anwar** हे दिनांक **२६.०५.२०२०** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Saleha Jamjam Syed Nazir + 4 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Saleha Jamjam Syed Nazir + 4 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२०.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे.चांदूर बाजार, जि.अमरावती

इतर कि.फौ.प्र.क्र.४३५/२०२६ ने.ता.२४.१२.२०२६

अर्जदार : १. असफिया बानो अशफाक अहेमद
वय ४४ धंदा - शेती
रा.वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
-- विरध्द --

गैरअर्जदार : निबंधक,
ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव बंड
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३)(अ) अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा **असफिया बानो अशफाक अहेमद** जन्माची नोंद करण्याकरीता अर्ज जन्म व मृत्यू नोदणी अधिनियम १३(३) आणि जन्म व मृत्यू नोदणी कायदा १९६९ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे, त्या अर्जात असे नमुद केले आहे की, अर्जदाराची आई **असफिया बानो अशफाक अहेमद** यांचा जन्माची दिनांक **०१.०१.१९८८** रोजी मौजा वणी शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास वृत्तपत्रामाध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी १०.३० वाजता आपला आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तिची दखल घेतल्या जाणार नाही.

आज दि.**२१.११.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर), अमरावती

जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **अतुल गणपतराव वानखडे,** रा.आमला, ता.जि.अमरावती, खालील वर्णनांकीत मालमत्तेसंबंधी मा.न्यायालयात दरखास्त प्रलंबित असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे--

स्थावर मालमत्तेचे वर्णन - मौजा आमला, जि.अमरावती, भूमापन क्र.१९, भोगवटदार वर्ग-१, क्षेत्रफळ ० हे.८२ आर.

वर वर्णनांकित मालमत्तेसंबंधी अतुल गणपतराव वानखडे --वि-- अंजनाबाई शेषराव मानकर (मयत) तर्फे वारस असे दरखास्त प्रकरण क्र.२१/२०२४ असे मा.१६ वे सहदिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती येथे सुरु असून त्याची ने.ता.०२.१२.२०२६ ही आहे. सदर मालमत्तेसंबंधी ऋणको यांचेसोबत कोणीही कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये, केला असल्यास लेखी किंवा तोंडी स्वरुपात मला कळविण्यात यावे. तसेच सदर मालमत्तेबाबत कोणीही कोणताही व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही.

अमरावती
दिनांक २३.११.२०२६

(ॲड.एस.पी.वर्धे)
रा.अमरावती, ता.जि.अमरावती
मो.८२७५३०९२६७

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ८१
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

-सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.६८९/२०२६ ने.ता.२३.११.२०२६

अर्जदार - **उदेभान गोविंद भुरभुरे,** वय ८४ वर्षे, धंदा - काही नाही
रा.दाभेरी, पो.तळेगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
गैरअर्जदार

१. **श्रीमती अलका ईश्वर भुरभुरे,** वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
२. **शाश्वत ईश्वर भुरभुरे,** वय १३ वर्षे, धंदा - शिक्षण
(अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ची अ.पा.क.आई असे)
दोघेही रा.सिध्दार्थ किराणा दुकानाजवळ, बिच्छु टेकडी, राहुल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/S २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांचा मुलगा तर गैरअर्जदार क्र.१ चे पती व गैरअर्जदार क्र.२ चे वडिल नामे **ईश्वर उदेभानजी भुरभुरे** यांचा **दि.०१/०४/२०२६** रोजी **रा. रिध्दपुर, ता.मोर्शी, जि. अमरावती** येथे मृत्यू झालेला आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदार व गैरअर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आदेशानुसार,
शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
दिनांक .०९.२०२६ दिवाणी न्यायालय (क.स्तर),मोर्शी

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७०/२०२६ **ने.ता.२५/११/२०२६**

अर्जदार- **रोशनी शुभम ठाकरे, (लग्नानंतरचे नांव)**
रोशनी प्रमोद सावदे (लग्नापूर्वीचे नांव)
वय ३२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.यादव लेआउट अकोली रोड जवळ, साई नगर, अमरावती
ता.जि.अमरावती
... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय कणी मिर्झापूर
ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **रोशनी शुभम ठाकरे** यांचा **जन्म दिनांक २२/११/१९९४** रोजी कणी मिर्झापूर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नामे **रोशनी शुभम ठाकरे** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कणी मिर्झापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जादाराने त्याच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक ०५/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २५/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(**सहाय्यक अधिक्षक**)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे.चांदूर बाजार, जि.अमरावती

इतर कि.फौ.प्र.क्र.४३३/२०२६ ने.ता.२४.१२.२०२६

अर्जदार : १. अशफाक अहेमद अब्दुल रहेमान
वय ५२ धंदा - शेती
रा.वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
-- विरध्द --

गैरअर्जदार : निबंधक,
ग्रामपंचायत कार्यालय, वणी बेलखेडा,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३)(अ) अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदाराचा अशफाक अहेमद अब्दुल रहेमान जन्माची नोंद करण्याकरीता अर्ज जन्म व मृत्यू नोदणी अधिनियम १३(३) आणि जन्म व मृत्यू नोदणी कायदा १९६९ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे, त्या अर्जात असे नमुद केले आहे की, अर्जदाराची आई अशफाक अहेमद अब्दुल रहेमान यांचा जन्माची दिनांक ०१.०१.१९७४ रोजी मौजा वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास वृत्तपत्रामाध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी १०.३० वाजता आपला आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तिची दखल घेतल्या जाणार नाही.

आज दि.२१.११.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
(क.स्तर),
अमरावती

जाहीर नोटीस
वि.आर.आर.खामतकर, ३ रे न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०३)
कि.कि.अर्ज क्र. ११३६/२०२६

अर्जदार - **वंदना शंकरराव राऊत उर्फ वंदना नंदकिशोर जऊळकर**
वय ४० वर्षे,
रा.वलगांव, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय वलगांव, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०३ मध्ये जन्म मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३) प्रमाणे यातील अर्जदार यांनी त्यांचे आजोबा नामे झोलबा नरसाजी राऊत यांच्या मृत्यूची नोंद दिनांक ३०.०४.१९८७ रोजी झाली आहे, अशी नोंद धरणेचा हुकूम होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०३ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ३०.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०३ पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार,
३ रे सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर)
अमरावती
शिक्का

-जाहीर नोटीस-

वि.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.चांदूर बाजार, जि. अमरावती

इतर कि.फौ.प्रकरण क्र.४३७/२०२६ ने.ता.२४/१२/२०२३

अर्जदार - **सालेहा फिरदौस अशफाक अहेमद**
वय २५ वर्षे, धंदा- शेती
रा.वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

गैरअर्जदार - **निबंधक,**
ग्रामपंचायत कार्यालय, वणी बेलखेडा,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अ अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदाराचा सालेहा फिरदौस अशफाक अहेमद जन्माची **नोंद घेण्याकरिता अर्ज जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १३ (३) आणि जन्म-मृत्यू नोंदणी नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.त्या अर्जात असे नमुद केले आहे की, अर्जदाराची आई** सालेहा फिरदौस अशफाक अहेमद यांच्या जन्माची दि.२२.१२.२००१ रोजी मौजा वणी बेलखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती **येथे झाला आहे.**

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी १०.३० वाजता आपला आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही.

आज दि.२१/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक - २१/११/२०२६

आदेशानुसार
सही/-
(सहायक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर)
चांदूर बाजार
शिक्का

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.०३/२०२६ **ने.ता.०७.१२.२०२६**

अर्जदार : १. **श्रीमती रिबेका आशिष राऊळकर,** वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. **अश्वीनी आशिष राऊळकर,** वय २१ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. **अभिषेक आशिष राऊळकर,** वय १८ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
रा.चर्च मागे, उदय कॉलनी, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : १. **मनिष दिलीप राऊळकर,** वय ५० वर्षे, व्यवसाय - नोकरी
२. **प्रशांत दिलीप राऊळकर,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. **अविनाश दिलीप राऊळकर,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.चर्च मागे, उदय कॉलनी, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मय्यत आशिष दिलीप राऊळकर** यांचा **मृत्यू दि.१५/१२/२०२०** रोजी तसेच **मृतक सिंधु दिलीप राऊळकर** हिचा मृत्यू **दि.१७.०८.२०२३** रोजी नागपूर, ता.जि.नागपूर येथे झालेला आहे.तसेच **मृतक दिलीप सामुवेल राऊळकर** यांचा मृत्यू **दि.२०.०७.२०२०** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.अर्जदार व गैरअर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना व गैरअर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.११.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

Appendix H., No.4
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Ravi Ramdas Khamatkar
3rd Jt. Civil Judge Jr. Division Amravati, Amravati, Amravati

NOTICE TO SHOW CAUSE
(GENERAL FORM)
R.C.S./418/2026
Seema Shashank Sarnaik alias Seema Dinkarrao Navasalkar Vs Shashank Sharad Sarnaik
Next Date 23.12.2026

To,
Shashank Sharad Sarnaik
R/o. Hanuman Mandir, Konark Colony, Behind Rangoli Mangal Karyalaya, Shegaon, Amravati, Tq. Dist. Amravati, Amravati, AMRAVATI, MAHARASHTRA

Whereas in the above named has made application to this Court that

You are hereby warned to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the **22.12.2026** at **11.00 o'clock in the forenoon**, to show cause against the application, failing wherein, the said application will be heard and determined *ex-parte.*

Given under my hand and the seal of the Court, this **19.11.2026**

शिक्का **3rd Jt Civil Judge Jr. Division, Amravati**

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or IOS.

The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर),अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

इतर कि.फौ.अर्ज क्र.७२/२०२६ **ने.ता.०४.०१.२०२७**

अर्जदार : **किशोर बापुराव गुल्हाने**
वय ६६ वर्षे, धंदा-व्यवसाय
रा.४५, जुना बायपास रोड, कलोती नगर, रुक्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः **मा. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,**
ग्रामपंचायत कार्यालय, रामा, ता.भातकुली, जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने न्यायालयामध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३ (३अ) प्रमाणे यातील अर्जदार किशोर बापुराव गुल्हाने, यांची आई **चंद्रकला बापुराव गुल्हाने (लग्नापुर्वीचे नाव - कु. चंद्रकला किसनसा राजगुरे) जन्म दि. ०८.०२.१९३७** रोजी झाला आहे. अशी नोंद करणेचा हुकुम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसाच्या आत आपण आपल्या वकिलामार्फत अगर स्वतः मा.न्यायालय यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०४.०१.२०२७ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास मा.न्यायालय योग्य तो हुकुम काढतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

दि.२३.११.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर),
भातकुली

नगर परिषद कार्यालय, अचलपूर
जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.तिर्थराज जयसिंग बिजेकर** पत्ता जीवनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२० संगणक मालमत्ता क्र.ACHA000/30967 जुना मालमत्ता क्र. 20001185 नझुल सर्व्हे क्र.११०/७/१२ प्लॉट नं.९ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री.अजय श्रीराम खंडेलवाल** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री.तिर्थराज जयसिंग बिजेवार** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२०.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस	-	लेआऊटमधील ९ मिटर रोड
पश्चिमेस	-	सर्व्हे नं.१११
उत्तरेस	-	प्लॉट नं.८
दक्षिणेस	-	प्लॉट नं.१०

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

नगर परिषद कार्यालय, अचलपूर
जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.मनोज नंदलाल कावरे** पत्ता जीवनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२० संगणक मालमत्ता क्र.ACHA000/30968 जुना मालमत्ता क्र. 20001186 नझुल सर्व्हे क्र.७/१२/११० प्लॉट नं.१० ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री.अजय श्रीराम खंडेलवाल** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री.मनोज नंदलाल कावरे** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२०.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस	-	लेआऊटमधील ९ मिटर रोड
पश्चिमेस	-	सर्व्हे नं.१११
उत्तरेस	-	प्लॉट नं.९
दक्षिणेस	-	प्लॉट नं.११

शिक्का

**मुख्याधिक

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

कौंडण्यपूर विकास आराखडा प्रत्यक्षात आणणार - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचे रुखिमणी मातेकडे साकडे, जलसंवर्धनात सहभाग देण्याचे नागरिकांना आवाहन

अमरावती/का.प्र.

माता रुखिमणीचे माहेरघर असलेल्या श्री. क्षेत्र कौंडण्यपूरला मोलाचा ऐतिहासिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. हा वारसा जपण्यासाठी कौंडण्यपूर विकास आराखडयातील सर्व कामे प्रत्यक्षात आणली जातील असे सांगत महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्राला दुष्काळातून मुक्त करण्याचे साकडे घातले. अंबा-रुखिमणी महोत्सवात सहभागी सर्व भक्तांनी आपापल्या गावात जलसंवर्धनाच्या कामात सहभाग घ्यावा व काटकसरीने पाण्याचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कौंडण्यपूर येथील विठ्ठल-रुखिमणी देवस्थानात आयोजित अंबा-रुक्मिणी महोत्सवात







पालकमंत्री श्री. बावनकुळे बोलत होते. आ.प्रवीण तायडे, माजी खा. नवनीत राणा, कौंडण्यपूर येथील विठ्ठल- रुखिमणी मंदिराचे अध्यक्ष नामदेवराव अंबाडकर आणि संत-महंत यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री श्री बावनकुळे म्हणाले, श्री. क्षेत्र कौंडण्यपूर हे अमरावती व विदर्भाच्या इतिहासाचे व संस्कृतीचे लेणे आहे. या क्षेत्राचा विकास करण्यासाठी श्री क्षेत्र कौंडण्यपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.या विकास आराखड्यातील कामांना गती देऊन ही कामे पूर्ण करण्यात येतील.यासाठी नागपूर येथील येत्या हिवाळी अधिवेशनात आराखडया विषयीच्या कामांबाबत बैठक घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

मंदिर संस्थान समोरील वर्धा नदीला अर्पण करण्यात आलेली २२१ मिटर लांबीची साडी म्हणजे कौंडण्यपूर, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील नागरिकांसाठी वरदायीनी नदीप्रती कृतज्ञ भाव असल्याचे सांगून या नदीचे पावित्र्य टिकवून ठेवण्याचे तसेच नदी प्रदूषित होणार नाही याची काळजी घेण्याचे व या जलस्त्रोताचे संवर्धन व्हावे, अशा अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

राज्यात सध्या दुष्काळाची परिस्थिती असून ३१० तालुके दुष्काळ सदृश्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. अंबा रुखिमणी महोत्सवात सहभागी सर्व भाविकांनी व नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचा तसेच आपापल्या गावात व परिसरात सुरू असलेल्या जलसंवर्धनाच्या कामात सहभाग घेण्याचा संकल्प करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तत्पूर्वी, पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी विठ्ठल रुखिमणीची विधिवत पुजा करून दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्या हस्ते येथील वर्धा नदीचे पूजन करण्यात आले व नदीच्या विस्तीर्ण पात्रात २२१ मिटरची वैशिष्ट्यपूर्ण साडी अर्पण करण्यात आली.

लोकप्रतिनिधी, संत-महंत, भाविक व नागरिक यावेळी उपस्थित होते.

जिल्हास्तरीय युवा संसद स्पर्धा

अमरावती/ - युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारततर्फे विकसित भारत जिल्हास्तरीय युवा संसद स्पर्धा उत्साहात पार पडली. पोटे पाटील कॉलेजच्या संत गाडगेबाबा सेमिनार हॉलमध्ये ही स्पर्धा पार पडली. यात विद्यार्थ्यांनी 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' या विषयावर विचार व्यक्त केले. युवकांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण, वैचारिक प्रगल्भता आणि लोकशाही मूल्यांची रुजवणूक व्हावी, तसेच विकसित भारताच्या संकल्पनेत युवकांचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी मेरा युवा भारतच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेमध्ये १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधून तीन मिनिटांच्या कालावधीत आपले विचार प्रभावीपणे मांडले. व्यसनमुक्त समाजनिर्मिती, युवकांची सामाजिक जबाबदारी आणि विकसित भारताच्या उभारणीत तरुणांची भूमिका यांसारख्या महत्त्वपूर्ण मुद्यांवर स्पर्धकांनी मते व्यक्त केली.स्पर्धेच्या उद्घाटनाला पोटे पाटील कॉलेजचे प्राचार्य प्रदीप जवंधिया, मेरा युवा भारत जिल्हा युवा अधिकारी अक्षय निपाणे उपस्थित होते. परीक्षक म्हणून विशाल तिजारे, प्रा. डॉ. शुद्धोधन कांब ळेगजानन कोटूरवार, पोटे कॉलेजचे डॉ. धांडे, प्रा.नगरिया यांनी कामकाज पाहिले.स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तीन स्पर्धकांची राष्ट्रीय युवा संसद २०२७ साठी निवड करण्यात आली.

कायदेशीर दत्तक प्रक्रियेतूनच बालकांना सुरक्षित भविष्य द्या- जिल्हाधिकारी

अमरावती/का.प्र.

अमरावती शहरात बालविक्री व मानवी तस्करीसंदर्भात समोर आलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. बालकांची खरेदी-विक्री करणे, आर्थिक मोबदल्यात बालकांचे हस्तांतरण करणे अथवा दत्तकाच्या नावाखाली कोणताही बेकायदेशीर व्यवहार करणे हा गंभीर गुन्हा असून, अशा प्रकारांपासून नागरिकांनी दूर राहून शासनमान्य कायदेशीर दत्तक प्रक्रियेचाच अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

कायदेशीर दत्तक प्रक्रिया 'कारा'च्या माध्यमातूनच केंद्रीय दत्तक ग्रहण संसाधन प्राधिकरण हे केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत वैधानिक प्राधिकरण असून, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ व दत्तक विनियम, २०२२ नुसार दत्तक प्रक्रिया राबविली जाते. इच्छुक व पात्र पालकांनी CARA च्या CARINGS या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर पात्रतेची पडताळणी, गृहचौकशी, बालकाची कायदेशीर उपलब्धता, सामाजिक व वैद्यकीय अहवाल आणि नियमानुसार दत्तक आदेशाची कार्यवाही पूर्ण केली जाते. संशयित बाब निदर्शनास आल्यास तात्काळ संपर्क साधावा. दत्तक प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार किंवा अनधिकृत मध्यस्थी करू नये, तसेच जन्म प्रमाणपत्राचा गैरवापर करून



चुकीची माहिती नोंदविणे, पालकत्व अनधिकृतरीत्या बदलणे किंवा बालकांची विक्री करणे हे गंभीर प्रकार असल्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी नमूद केले आहे. बालकांच्या सुरक्षिततेशी संबंधित संशयास्पद बाब आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीस विभाग, बाल कल्याण समिती किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत बालकांचे संरक्षण, काळजी, समुपदेशन आणि पुनर्वसनासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे. दत्तक घेण्यासाठी नागरिकांसाठी बालक दत्तक घेण्यासाठी केवळ अधिकृत CARA, CARINGS प्रक्रियेचाच अवलंब करावा. एजंट किंवा मध्यस्थांमार्फत बालक घेऊ नये व पैशांच्या मोबदल्यात बालकांची देवाण-घेवाण करू नये. जन्म प्रमाणपत्र किंवा खासगी करार हा कायदेशीर दत्तक आदेशाचा पर्याय ठरू शकत नाही. संशयास्पद घटनांची माहिती तात्काळ संबंधित यंत्रणांना द्यावी. तसेच अधिक माहितीसाठी नागरिक cara.wcd.goved.in या संकेतस्थळ आणि carings. wcd.goved.in या पोर्टलला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे.

अंजनगाव बारी-रायसोनी विद्यापीठ मार्गावर झुडपांचा विळखा

अंजनगाव बारी/ वार्ताहर



येथील रा.मा. २९६ अंजनगाव बारी ते रायसोनी विद्यापीठ या मार्गाच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात झुडपे वाढल्याने रस्त्याला झुडपांचा विळखा पडला आहे. आधीच अरुंद असलेल्या या रस्त्यावर समोरून येणाऱ्या वाहनांना बाजू देताना वाहनचालकांची मोठी कसरत होत आहे. विशेषतः चारचाकी वाहनांच्या ओव्हरटेकमुळे अपघाताची शक्यता वाढली आहे.

रात्री-बेरात्री या मार्गाने प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत असून, रस्त्यावर अचानक वन्यप्राणी आडवे येत असल्याने यापूर्वीही अपघात घडल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झुडुपांमुळे वन्यप्राण्यांचा अंदाज येण्यासही अडचण निर्माण होते. संबंधित वनविभागाने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून झुडुपांची तातडीने छाटणी करावी, रस्त्याची सुरक्षितता वाढवावी आणि आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.

अंजनगाव बारीसमोरील पार्डी (देवी) मार्गावर महावितरण कार्यालय ते रेल्वे भुयारी मार्गापर्यंत रस्त्यालगत झुडपांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे समोरून येणारी वाहने दिसत नसल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर मालखेड रेल्वे परिसरातील अदानी सिमेंट कारखान्याच्या अवजड ट्रकचीही मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. संबंधित विभागाने तातडीने झुडुपांची छाटणी करून संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.

१४ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त, एका प्रतिष्ठानाला ५ हजारांचा दंड

अमरावती/का.प्र

महानगरपालिकेच्या वतीने प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी साईनगर व अकोली रोड परिसरात विशेष प्लास्टिक जप्ती व स्वच्छता तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण २० आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून, सुमारे १४ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एका आस्थापनावर ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त (१) भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार, तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता), स्वास्थ्य अधीक्षक आणि सहाय्यक आयुक्त, झोन क्रमांक ४ यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.तपासणीदरम्यान बहुतांश आस्थापनांमध्ये कचरा संकलनासाठी डस्टबिनचा योग्य वापर होत असल्याचे समाधानकारक चित्र आढळून आले. यावेळी संबंधित आस्थापनांना परिसर स्वच्छ ठेवणे,



कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळणे याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, साईपूजा सामग्री या आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने संबंधित प्रतिष्ठानावर नियमानुसार ५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. मोहिमेदरम्यान अंदाजे १४ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले.या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, दिनेश निंदाने, सोपान माहुलकर, प्रवीण उसरे, प्रियंका बैस, सागर राजुरकर, वैभव खरड, सुमेध मेश्राम व मिथुन चावरे यांनी सहभाग घेतला.शहरातील स्वच्छता राखणे, प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालणे आणि प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने महानगरपालिकेकडून अशा प्रकारच्या तपासणी व कारवाई मोहिमा सातत्याने राबविण्यात येत आहेत.

अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई

वाळूसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/का.प्र



भातकुली येथे अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कारवाई केली आहे. निंभा येथे रविवारी, २२ नोव्हेंबर रोजी कारवाई केली. या कारवाईत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करून वाळूसह अंदाजे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

परिविक्षाधीन उपविभागीय अधिकारी महेश घाटोळे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. गेल्या २२ दिवसांच्या कालावधीत भातकुली महसूल विभागाने ही पाचवी कारवाई केली आहे.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या निर्देशानुसार तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली भातकुली महसूल विभाग अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर लक्ष ठेवत आहे. या कारवाईत तहसीलदार अक्षय मांडवे, मंडळ अधिकारी संतोष धुर्वे, ग्राम महसूल अधिकारी संतोषसिंग गिल व ग्राम महसूल अधिकारी मनोज बेले यांनी सहभाग नोंदविला.अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाची मोहीम यापुढेही सुरू राहणार असून, अशा प्रकारच्या अवैध कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे महसूल विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

खा. वानखडे यांच्या वतीने अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व मदतनीस भगिनींचा भाऊबीज सोहळा

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर



अमरावती लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या वतीने अंजनगाव सुर्जी येथे अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि मदतनीस भगिनींसाठी भव्य 'भाऊबीज स्नेहमिलन सोहळा' अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला.

समाजाच्या तळागाळातील घटकांपर्यंत आरोग्य आणि पोषणाच्या सेवा पोहोचवणाऱ्या या भगिनींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा आणि एक 'हक्काचा भाऊ' म्हणून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहता यावे, या उदात्त भावनेतून खा. बळवंत वानखडे गेल्या दशकापासून सातत्याने हा भाऊबीज उपक्रम राबवत आहेत. या स्नेहपूर्ण कार्यक्रमाच्या माध्यमातून खासदार महोदय आणि मतदारसंघातील भगिनींमधील जिव्हाळ्याचे व घट्ट नाते पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

या प्रसंगी उपस्थित सर्व भगिनींना खा. बळवंत वानखडे यांच्या वतीने साडी-चोळी व विविध भेटवस्तू देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

मनोगत व्यक्त करताना अनेक भगिनींनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

'खासदार बळवंतभाऊंनी त्यांच्या आमदारकीच्या तसेच खासदारकीच्या काळात आमचे अनेक प्रलंबित प्रश्न, कामे आणि अडीअडचणी प्राधान्याने मार्गी लावल्या आहेत,' अशा शब्दांत भगिनींनी आपले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली.या सोहळ्याला खा. बळवंत मित्र परिवाराचे सदस्य, अंजनगाव सुर्जी तालुका काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, नगरसेवक तसेच शहर व ग्रामीण भागातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रविवारच्या सुट्टीतही जनहितासाठी कार्यालयात हजर!

ग्रामीण पाणीटंचाईच्या नियोजनासाठी कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांचा पुढाकार

अमरावती/का.प्र



शासकीय कार्यालयांना रविवारची सुट्टी असली तरी जनतेच्या मूलभूत प्रश्नांना सुट्टी नसते, याची जाणीव ठेवून काम करणारे अधिकारी प्रशासनाची खरी ताकद ठरतात.

प्रशासकीय पद ही केवळ जबाबदारी नसून जनतेच्या सेवेसाठी मिळालेली संधी आहे, या भावनेतून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे उदाहरण समाजासमोर येणे आवश्यक आहे. याच कर्तव्यभावनेचे आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन जिल्हा परिषद अमरावतीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात पाहायला मिळत आहे. संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी विभागाच्या कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांनी रविवारी सुट्टीच्या दिवशीही स्वतः कार्यालयात उपस्थित राहून महत्त्वाच्या कामांना प्राधान्य दिले.

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा हा लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. पावसाचे अनियमित प्रमाण, संभाव्य पाणीटंचाई आणि उन्हाळ्यात निर्माण होणारी पाण्याची समस्या लक्षात घेता प्रशासनाने वेळेआधीच उपाययोजनांचे नियोजन करणे आवश्यक असते. ऐन टंचाईच्या काळात उपाययोजनांसाठी धावपळ करण्याऐवजी संभाव्य परिस्थितीचा अंदाज घेऊन गावनिहाय नियोजन, आवश्यक कामांची निश्चिती आणि प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे.

सध्या ग्रामीण भागातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन टंचाई अंदाजपत्रक तयार करणे, संबंधित अंदाजपत्रकांची तपासणी करणे तसेच आवश्यक प्रस्तावांवरील प्रलंबित कामे मार्गी लावण्याची प्रक्रिया सुरू आहे. या अंदाजपत्रकांच्या माध्यमातून भविष्यात कोणत्या गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, कोणत्या ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांची आवश्यकता भासू शकते आणि त्यासाठी कोणती कामे प्रस्तावित करावी लागतील, याबाबत नियोजन करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या प्रक्रियेला वेळेत पूर्ण करणे महत्त्वाचे ठरत आहे.

विशेष म्हणजे, रविवार हा शासकीय सुट्टीचा दिवस असतानाही कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांनी स्वतः कार्यालयात उपस्थित राहून टंचाई अंदाजपत्रक तयार करण्यासह त्यांच्या तपासणीच्या कामावर लक्ष केंद्रित केले. केवळ कार्यालयीन वेळेपुरते काम मर्यादित न ठेवता जनतेच्या पिण्याच्या पाण्यासारख्या संवेदनशील विषयाला प्राधान्य देण्याची त्यांची भूमिका लक्षवेधी ठरत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना भविष्यात पाण्यासाठी त्रास सहन करावा लागू नये, यासाठी प्रशासकीय पातळीवर आवश्यक कामे वेळेत पूर्ण व्हावीत, हा या प्रयत्नांमागील महत्त्वाचा उद्देश आहे.

पिण्याचे पाणी ही केवळ एक सुविधा नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत प्रश्न आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य कुटुंबांना पाणीटंचाईच्या काळात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

अनेक गावांमध्ये पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ ही केवळ गैरसोय नसून दैनंदिन जीवनावर परिणाम करणारी समस्या ठरते. त्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन, उपलब्ध स्त्रोतांचा विचार, आवश्यक दुरुस्ती आणि टंचाई निवारणाच्या कामांची वेळेत आखणी करणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

अशा परिस्थितीत प्रशासकीय अधिकारी म्हणून केवळ आदेश देण्यापुरते मर्यादित न राहता स्वतः पुढाकार घेऊन कामात सहभागी होणे ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे. स्नेहा धावडे यांनी रविवारी कार्यालयात उपस्थित राहून केलेले काम हे सामाजिक भान, जनहिताची जाण आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा अधोरेखित करणारे आहे. प्रशासनातील प्रत्येक पदाला जनतेच्या अपेक्षांची जोड असते. त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वेळेचे बंधन बाजूला ठेवून काम करण्याची तयारी असणे महत्त्वाचे ठरते.

सुट्टीपेक्षा जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा! ही भावना केवळ शब्दांत न मांडता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देणाऱ्या कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांचा हा पुढाकार प्रशासकीय संवेदनशीलतेचे उदाहरण ठरत आहे.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांचे योग्य नियोजन आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजना वेळेत पूर्ण झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो.

जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देत काम करणाऱ्या अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या कार्याची दखल घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

लिव्ह-इन पार्टनरकडून महिलेची हत्या

-वादातून डोक्यावर मारहाण, आरोपी ताब्यात
-धामणगाव गढी जवळील मेमना गावात घटना





परतवाडा/प्रतिनिधीः-
परतवाडा तालुक्यातील धामणगाव गढी जवळील मेमना गावात लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलेची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना आज सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी संशयित लिव्ह-इन पार्टनरला ताब्यात घेत कसून चौकशी सुरू केली आहे.

मृत महिलेची ओळख बुंदी राजमा कासदेकर (वय ४५) अशी झाली आहे. या प्रकरणात तातडीने कारवाई करत पोलिसांनी संशयाच्या आधारावर मृत महिलेच्या लिव्ह-इन पार्टनर नितेश हिरा कासदेकर (वय ३६) याला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. माहिती नुसार मृत बुंदी कासदेकर आणि संशयित तरुण नितेश कासदेकर हे गेल्या सुमारे सहा महिन्यांपासून एकत्र लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. गेल्या काही दिवसापासून त्यांच्यामध्ये वाद होत होते. सोमवारी सकाळी पण दोघांमध्ये वाद झाला. या वादात रागाच्या भरात आरोपी नितेश कासदेकरने जड वस्तूने महिलेच्या डोक्यावर मारहाण केली. ज्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि मृत महिलेचे नातेवाईक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमले. परतवाडा पोलीसांचे पथक आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

पोलिसांनी संपूर्ण परिसरात चोख बंदोबस्त ठेवून परिस्थिती नियंत्रणात☞(पान २ वर)

भूतानमध्ये रंगणार चौथे आंतरराष्ट्रीय योग संमेलन व स्पर्धा

-श्री हव्याप्र मंडळ येथे पत्रकार परिषदेमध्ये माहिती

भारतासह विविध देशांतील जवळपास १०० योगप्रेमींचा सहभाग



अमरावती/प्रतिनिधीः-
योगविद्येचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार व प्रसार करण्यासोबतच भारतीय योगपरंपरेचे महत्त्व जागतिक स्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने चौथे आंतरराष्ट्रीय योग संमेलन व योगासन स्पर्धेचे आयोजन भूतानची राजधानी थिम्पू येथे दि. २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. बृहन महाराष्ट्र योग परिषद, अमरावती आणि विख्यात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या संमेलनात भारतासह विविध देशांतील जवळपास १०० योगप्रेमी सहभागी होणार आहेत.

या संमेलनाच्या आयोजनासंदर्भात सोमवारी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार परिषदेच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. अरुण खोडस्कर होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. गजानन चोपडे, बृहन महाराष्ट्र योग परिषदेचे कोषाध्यक्ष प्रा. शशिकांत यवतकर, महिला योग शाखेच्या उपाध्यक्षा रेखाताई तसेच सचिव प्रा. शुभांगी रावळे यांनी संमेलनाची भूमिका, उद्दिष्टे आणि आयोजनासंदर्भात सविस्तर माहिती दिली. संमेलनासंदर्भात अधिक माहितीसाठी प्राचार्य डॉ. अरुण खोडस्कर☞(पान २ वर)

मनपा कर्मचाऱ्यांचे बेमुद्दत कामबंद आंदोलन

सहाय्यक आयुक्तांना मारहाण केल्याचा निषेध



अमरावती/प्रतिनिधीः- मनपा झोन क्रमांक ३ दस्तूर नगर कार्यालयात कर वसुलीवरून सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्यासोबत मारहाण करण्यात आली. शिवसेना उबाठाचे नगरसेवक संजय गव्हाळे यांनी त्यांच्यासोबत वाद घालून शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे. यामुळे संतप्त झालेल्या मनपा कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी आज सोमवार २३ नोव्हेंबर पासून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी बेमुद्दत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मारहाणीच्या घटनेचा कर्मचाऱ्यांनी तीव्र निषेध केला आहे. प्रवेशद्वारा वर कर्मचाऱ्यांनी प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणा बाजी केली. काम बंद असल्यामुळे सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

मनपा झोन क्र. ३, दस्तूर नगर कार्यालयात मालमत्ता कर वसुलीवरून सुरू असलेल्या कारवाईला विरोध करत नगरसेवक संजय गव्हाळे यांनी सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्याशी वाद घातला, शिवीगाळ केली आणि ☞(पान २ वर)

मंत्री चंद्रकांत पाटील यांचा दौरा



अमरावती/प्रतिनिधीः- : उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील हे बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.

दौऱ्यानुसार, पाटील यांचे दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता बडनेरा रेल्वे स्थानकावर आगमन झाल्यानंतर अमरावती विश्रामगृह येथे राखीव आहे. त्यानंतर सकाळी ८ वाजता शैलेश पोतदार आणि सकाळी ८.४५ वाजता शिवराय कुळकर्णी यांच्या निवासस्थानी भेट देतील. त्यानंतर यवतमाळकडे प्रयाण करतील.

कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

तोंगलाबाद येथील घटना



खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर तालुक्यातील तोंगलाबाद येथील अल्पभूधारक शेतकरी गजानन रामदास आठवले (वय ५१) यांनी २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास धामणा शेतशिवारातील स्वतःच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली.

यावर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे कपाशीचे पिक अपेक्षेप्रमाणे आले नाही. त्यामुळे गजानन आठवले हे मागिल अनेक दिवसांपासून आर्थिक विवंचनेत होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ते अकोला येथे मोलमजुरी करीत होते. त्यातच मुलींच्या लग्नासाठी घेतलेले कर्ज आणि सातत्याने होत असलेली नापिकी यामुळे त्यांच्यावर कर्जाचा डोंगर उभा राहिला होता.

याच आर्थिक विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, आई असा आप्तपरिवार आहे. या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाइ(पान २ वर)

विशेष लोकअदालतीत ६४ प्रकरणांमध्ये १.८९ कोटींची तडजोड



अमरावती/प्रतिनिधीः-
राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार अमरावती जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये आयोजित विशेष लोकअदालतीत ६४ प्रकरणांमध्ये १ कोटी ८९ लाख रूपयांची तडजोड करण्यात आली.

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत दाखल धनादेश अनादर प्रकरणांसाठी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीत एकूण ६४ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली आहे. तडजोडीअंती १ कोटी ८९ लाख रकमेचा निपटारा करण्यात आला.

प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा न्यायाधीश अमित जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे सचिव संजय सहारे यांच्या ☞(पान २ वर)

नांदेड बु.ग्रामपंचायतीत भष्ट्राचार, युवकांचे आमरण उपोषण

तात्काळ कारवाई करुन निलंबनाची मागणी



खल्लार/प्रतिनिधीः- येथून जवळच असलेल्या नादेड बु. येथिल ग्रामपंचायत अधिकारी सोनाली बुध यांनी शासकीय रकमेचा गैरप्रकार करुन भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस आल्याने ग्रामस्थांनी ग्रामपंचायत अधिकारी यांच्या विरोधात आज (दि. २३) ग्रामपंचायत समोर उपोषणास उपोषण सुरु केले आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सोनाली बूथ यांनी दोन वर्षा अगोदर ५० हजार ☞(पान २ वर)

दर्यापूर बाजार समितीत

हरभऱ्याला ९,५०० रुपये प्रतिक्विंटलचा भाव!



खल्लार/प्रतिनिधीः- कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर येथे नविन हंगामातील हरभरा शेतमालाची आवक सुरू झाली असून, बाजार समितीत हरभऱ्याला ९,५०० रुपये प्रतिक्विंटल असा उच्चांकी भाव मिळाला आहे.

काकडा ता. अचलपूर येथिल शेतकरी सचिन अपाले यांनी नविन हंगामातील ☞(पान २ वर)

वाहनांना 'एचएसआरपी' नंबर प्लेट नसल्यास

होणार दंडात्मक कारवाई

३० नोव्हेंबरपर्यंत विशेष तपासणी मोहीम



अमरावती/प्रतिनिधीः-
१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना 'उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी' (एचएसआरपी) बसवणे बंधनकारक असतानाही अद्याप अनेक वाहनधारकांनी ती बसवलेली नाही. अशा वाहनांविरुद्ध परिवहन विभागाने आता कारवाईचा बडगा उगारला असून, २० ते ३० नोव्हेंबर दरम्यान विशेष तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. ही पाटी नसलेल्या वाहनांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याची माहिती अमरावतीचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे यांनी दिली आहे.

राज्याचे अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या विशेष मोहिमेचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी☞(पान २ वर)

विद्युत खांबावरून पडून खाजगी मजूर गंभीर जखमी

तिवसा येथील घटना



तिवसा/प्रतिनिधीः-
शहरातील सॉफ्ट कॉर्नर परिसरातील नादुरुस्त रोहित्र यंत्र दुरुस्ती करण्यासाठी गेलेल्या एका खाजगी मजुराला जबरदस्त शॉक लागल्याने गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी (दि.२३) सकाळी ११वाजता दरम्यान घडली.यात मजुराचा एक पाय भाजला असून दुसरा पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी अमरावती रुग्णालयात हलविण्यात आले आहे.ज्ञानेश्वर वामनराव इंगळे (वय ४८रा सुरवाडी, तिवसा) असे जखमी झालेल्या मजुराचे नांव आहे.

राष्ट्रीय महामार्गा लगत असलेल्या सॉफ्ट कॉर्नर हा नविन लेआऊट परिसर असून या परिसरातील एका रोहित्र यंत्रावरून येथील काही☞(पान २ वर)

संबंधित घटनेची कुठलीही माहिती नव्हती. यात जखमी व्यक्ती कुणाच्या सांगण्यावरून खांबावर गेले याची संपूर्ण चौकशी केली जाईल.जखमी व्यक्तीचे लेखी बयान घेऊन कर्मचारी दोषी आढळल्यास निश्चितच कारवाई करण्यात येईल.

-रमेश कुमार मिश्रा-
सहाय्यक अभियंता तिवसा.

धुक्यामुळे अमरावती-मुंबई फ्लाईट दुसऱ्या दिवशीही रद्द

अमरावती/प्रतिनिधीः- मुंबई-अमरावती-मुंबई फ्लाईट धुक्यामुळे सलग दुसऱ्या दिवशी रद्द करण्यात आली.यामुळे सोमवारी विमानतळावरील विमान सेवेला फटका बसला. बेलोरा येथील विमानतळावरून सकाळी ९.१५ वाजता होणारे उड्डाण रद्द करण्यात आले. यामुळे प्रवाशांचे चांगलेच हाल झाले. अमरावतीच्या विमानतळावर धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने विमानसेवा रद्द करण्यात आल्याचे विमानतळ व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे.



अलायन्स एअर कंपनीच्या मुंबई-अमरावती-मुंबई या विमानसेवा रद्द होण्याचा हा पहिलाच प्रसंग नाही. गेल्या वर्षीही याच कालावधीत अनेक दिवस विमानसेवा विस्कळीत झाली होती. अमरावती-मुंबई विमानसेवा सद्यस्थितीत आठवड्यातून चार दिवस सुरू आहे. दर रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी सकाळी ७.३० वाजता विमान मुंबईहून उड्डाण घेते आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहचते. त्यानंतर परतीचे विमान सकाळी ९.१५ वाजता मुंबईकडे झेपावते आणि सकाळी १०.३० वाजता मुंबई विमानतळावर पोहचते.

सकाळी अमरावती विमानतळावर धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्यामुळे विमान उतरण्याची शक्यता नसल्याने मुंबईहून येणारे विमान रद्द करण्यात☞(पान २ वर)

ग्रामस्थांच्या सूचनांवरून तयार होणार दुष्काळ निवारण आराखडा

राज्य शासनाकडे करणार पाठपुरावा!

-मोर्शीत तालुकास्तरीय दुष्काळ निवारण समितीची आढावा बैठक



मोर्शी/प्रतिनिधीः-
तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि जलसंधारणाच्या कामांना गती देण्यासाठी मा. आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली हिवरखेड येथे तालुकास्तरीय दुष्काळ निवारण समितीची महत्त्वपूर्ण आढावा सभा पार पडली. सायंकाळी ७:०० वाजता सुरू झालेल्या या बैठकीस प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

या बैठकीत तहसीलदार सागर ढवळे ☞(पान २ वर)

चांदूर रेल्वेत दुष्काळ, पाणी टंचाई निवारणाचा आढावा



अमरावती/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे उपविभागातील चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यांमध्ये संभाव्य दुष्काळ व पाणी टंचाईच्या काळात ग्रामीण भागात पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तालुकास्तरीय समन्वय समितीची आढावा सभा आज घेण्यात आली. आमदार प्रताप अडसड यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली.

या आढावा बैठकीत तिन्ही तालुक्यांतील विविध शासकीय विभागांच्या पूर्ण, प्रस्तावित आणि प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जलसंधारण व पाणीपुरवठ्याच्या कामांमध्ये नाला खोलीकरण, विहिर खोलीकरण व पुनर्भरण, विहिर दुरुस्ती, रेन वॉटर हार्वेस्टींग, सार्वजनिक विहिर अधिग्रहण, खासगी विहिर सर्वेक्षण, शेततळे निर्मिती व खोलीकरण तसेच ठिबक ☞(पान २ वर)

समान नागरी कायद्याबाबत रविवारी जनसुनावणी

अमरावती/प्रतिनिधीः- समान नागरी संहितेबाबत अमरावती महसूल विभागातील विविध हितसंबंधी गट, संस्था आणि नागरिकांच्या सूचना, हरकती, तक्रारी, अडीअडचणी व मते जाणून घेण्यासाठी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील समितीची विभागीय जनसुनावणी रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित करण्यात आली आहे. या जनसुनावणीच्या नियोजन, राजशिष्टाचार व कामकाज व्यवस्थेसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कार्यालयीन आदेश जारी केले आहेत.

समान नागरी कायद्याबाबत (युसीसी) विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समिती नागरिकांचे म्हणणे ऐकून घेणार आहे. विभागातील इतर जिल्ह्यांच्या नागरिकांसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय दूरदुष्य प्रणालीद्वारे जोडण्यात येणार आहे.

अमरावती विभागातील नागरिकांच्या जनसुनावणी रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी अकोला जिल्ह्यासाठी सकाळी ११ ते १२ वाजता, वाशिम जिल्ह्यासाठी सकाळी १२.३० ते ☞(पान २ वर)